
म. ग्रं. सं. ठाणे.
विषय
सं. क्र.

# मराठी प्रेमकविता



## कवितासंग्रह

अनुरागिणी

**बा. भ. बोरकर**

चिन्मयी

**बा. भ. बोरकर**

कैवल्याचे झाड

**बा. भ. बोरकर**

कळ्यांचे दिवस फुलांच्या राती

**शान्ता ज. शेळके**

यक्षरात्र

**अरुणा ढेरे**

अकस्मात

**केशव मेश्राम**

बोरकरांची प्रेमकविता

संपादक : **रा. चिं. ढेरे**

फकिराचे अभंग

**फ. मुं. शिंदे**

मराठी प्रेमकविता

संपादक : **शान्ता ज. शेळके**

**डॉ. अरुणा ढेरे**

**सुरेश एजन्सी, पुणे**

क्रमांक

# मराठी प्रेमकविता


संपादिका

प्रा. शान्ता ज. शेळके

डॉ. अरुणा ढेरे



सुरेश एजन्सी, पुणे

प्रकाशक
गुलाबराव मारुतीराव कारले
सुरेश एजन्सी
२०५ शुक्रवार पेठ
पुणे ४११००२

© सर्वाधिकार सुरक्षित

मुखपृष्ठ
सुभाष अवचट

प्रकाशन-दिन
कोजागरी पौर्णिमा,
७ ऑक्टोबर १९८७

मुद्रक
चिं. स. लाटकर
कल्पना मुद्रणालय
४६१/४ 'शिव-पार्वती'
टिळक रोड
पुणे ४११०३०

किंमत पन्नास रुपये

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

# मराठी प्रेमकविता

१८८५–१९७५

ऽ

ओठांशी भिडते रहस्य मनिचे,
  सांगू कुणाला परी ?
अश्रू हे नयनींहि–माळ करुनी
  घालू कुणाच्या गळा ?
आले हे भरुनी रिते हृदयही,
  देऊ कुणाच्या करी ?
आला दाटुनि कंठ–हाय ! रडुनी
  कोठे करू मोकळा ?
जी माझ्यास्तव, मी जिचे सकलही,
  आधार जी जीवनी,
देवा ! भेटवि–दाखवी तरि मला
  ती कोण देवी जनी ?

॥ गोविंदाग्रज ॥
॥ 'वाग्वैजयंती', पृ. ६५ ॥

## कवितानुक्रम


१. –प्रत / केशवसुत १
२. प्रीती / केशवसुत २
३. कुणास्तव कुणीतरी / ना. वा. टिळक ३
४. थारोळ्यावर / चंद्रशेखर ५
५. चाफा / बी ६
६. प्रीती निमाली तर– / विनायक ८
७. कुणि कोडे माझे उकलिल का ? / भा. रा. तांबे ९
८. घट भरे प्रवाही बुडबुडुनी / भा. रा. तांबे १०
९. वाटेच्या वाटसरा / भा. रा. तांबे ११
१०. भेटीचा पहिलाच प्रसंग / द. भि. रणदिवे १२
११. विरहगीत / न. शं. रहाळकर १३
१२. विसरशील खास मला / ज. के. उपाध्ये १५
१३. तनुवेल / वि. दा. सावरकर १६
१४. ती कोण ? / गोविंदाग्रज १७
१५. प्रेम आणि मरण / गोविंदाग्रज १८
१६. निर्दय बालेस / गोविंदाग्रज २२
१७. सोन्याचा खंजीर / श्री. रा. बोबडे २३
१८. फुलराणी / बालकवी २४
१९. प्रीति हवी तर / बालकवी २७
२०. तू तर चाफेकळी / बालकवी २८
२१. मोऱ्यांची मोहना / माधव २९
२२. गोड आठवण / गिरीश ३२
२३. प्रेम होईना तुझ्याने / माधव जूलियन ३३
२४. देवा, स्त्रीहृदयी मनोरमपणा / माधव जूलियन ३४
२५. संगमोत्सुक डोह / माधव जुलियन ३५
२६. मैना / अज्ञातवासी ३७
२७. नाविक / आनंद ३८
२८. अनुताप / मनोरमा ३९
२९. जादूगारीण / ए. पां. रेंदाळकर ४०

३०. पुस्तकातील खूण / केशवकुमार ४२
३१. तूच रमणी / यशवंत ४३
३२. फुलवात / अनिल ४५
३३. सायंतारा / अनिल ४६
३४. आणीबाणी / अनिल ४७
३५. पहिले प्रेम / निशिगंध ४८
३६. सारेच गोड / वा. ना. देशपांडे ५०
३७. तिरस्कृत / सी. बा. जोशी ५१
३८. गेले ! ते दिन गेले ! / भ. श्री. पंडित ५२
३९. प्रीतिची हूल फुकट ना तरी ! / अनंत काणेकर ५३
४०. हा कोण पुरुष ? / ग. ह. पाटील ५४
४१. पाह्यलं ग दारी / सोपानदेव चौधरी ५६
४२. उत्तररात्र / रॉय किणीकर / ५८
४३. संगीतपरिणती / दा. अ. कारे ५९
४४. जात्यावरलं गाणं / ग. ल. ठोकळ ६०
४५. दवात आलिस भल्या पहाटी / बा. सी. मर्ढेकर ६१
४६. भटकत फिरलो भणंग आणिक / बा. सी. मर्ढेकर ६२
४७. झाली चूक !—क्षमस्व ! / बा. सी. मर्ढेकर ६३
४८. नदी किनारी / ना. घ. देशपांडे ६४
४९. काळ्या गढीच्या जुनाट भिंतीकडे / ना. घ. देशपांडे ६५
५०. बकुलफुला / ना. घ. देशपांडे ६६
५१. स्मृती / बा. भ. बोरकर ६७
५२. मंद असावे जरा चांदणे / बा. भ. बोरकर ६८
५३. जपानी रमलाची रात्र / बा. भ. बोरकर ६९
५४. त्या तिथे, पलीकडे तिकडे / पु. शि. रेगे ७१
५५. त्रिधा राधा / पु. शि. रेगे ७२
५६. शेवगा / पु. शि. रेगे ७३
५७. शुभ्र पांढरी कापुसबोंडे / भा. रा. लोवलेकर ७४
५८. पालख्या / मनमोहन ७५
५९. पृथ्वीचे प्रेमगीत / कुसुमाग्रज ७६
६०. स्वप्नाची समाप्ती / कुसुमाग्रज ७८
६१. तरिहि केधवा / कुसुमाग्रज ८१
६२. त्या तरुतळी विसरले गीत / वा. रा. कांत ८३

६३. जोगी / वा. रा. कांत   ८५
६४. ते न तिने कधि ओळखिले / श्री. रघुनाथ   ८६
६५. आठवतं फक्त / पद्मा   ८७
६६. चंद्रकोर / इंदिरा   ८८
६७. कुब्जा / इंदिरा   ८९
६८. येतिल दोनच हिरवी पाती / इंदिरा   ९०
६९. विसरलेली ओळख / श्रीनिवास पाटणकर   ९१
७०. शांत सागरी कशास / संजीवनी   ९२
७१. तू उरतेस / वि. म. कुलकर्णी   ९३
७२. झपताल / विंदा करंदीकर   ९४
७३. प्रेम करावे असे, परंतु / विंदा करंदीकर   ९५
७४. मुक्तीमधले मोल हरवले / विंदा करंदीकर   ९६
७५. साताऱ्याची तऱ्हा / ग. दि. माडगूळकर   ९७
७६. या कातरवेळी / ग. दि. माडगूळकर   ९९
७७. निवांत / त्र्यं. वि. सरदेशमुख   १००
७८. अथ अरण्यकांड / कृ. ब. निकुंब   १०१
७९. तुले पाहून / मा. कृ. पारधी   १०२
८०. युगांच्या नंतर / शरच्चंद्र मुक्तिबोध   १०३
८१. तोच चंद्रमा नभात / शान्ता ज. शेळके   १०५
८२. वेळ-अवेळाच्या मेळी / शंकर रामाणी   १०६
८३. सुनीत / वसंत बापट   १०७
८४. लावणी चौरंगाची / वसंत बापट   १०८
८५. हसऱ्या डोळ्यांत / सदानंद रेगे   १०९
८६. तेव्हा एक कर ! / नारायण सुर्वे   ११०
८७. सत्य / नारायण सुर्वे   १११
८८. ओठ टेकते / अनुराधा पोतदार   ११३
८९. अभिषेक / शंकर वैद्य   ११४
९०. डहाळी / सरिता पदकी   ११५
९१. तुज आठवते का ? / मंगेश पाडगावकर   ११६
९२. जन्म / मंगेश पाडगावकर   ११७
९३. एका पावसाळ्यात / शिरीष पै   ११८
९४. जागृतीच्या वृक्षाखाली / म. म. देशपांडे   ११९
९५. दुभंगता उर / आरती प्रभू   १२०

९६. देहपूजा / आरती प्रभू   १२१
९७. सूर्यास्त / आरती प्रभू   १२३
९८. रंग / मधुकर केचे   १२४
९९. मग / सुरेश भट   १२६
१००. केव्हा तरी पहाटे / सुरेश भट   १२७
१०१. बाई-माणूस / आनंद यादव   १२८
१०२. लवत लवत घन / वसंत सावंत   १२९
१०३. याच दिशेने / अंजली ठकार   १३०
१०४. ओठांवरती कधी टेकले कळले नाही ओठ / दिलीप चित्रे   १३१
१०५. गझल / दिलीप चित्रे   १३२
१०६. सोन्याच्या मोहरा / ग्रेस   १३३
१०७. अर्थ / ग्रेस   १३४
१०८. फुलात न्हाली पहाट ओली / ना. धों. महानोर   १३५
१०९. वन ओथंबुन येती / ना. धों. महानोर   १३६
११०. पतझड / गुरुनाथ धुरी   १३७
१११. मनुष्यहीन किनाऱ्यावर / वसंत आबाजी डहाके   १३८
११२. पळस / प्रभा गणोरकर   १३९
० ० परिशिष्ट / कवि-काल-सूची   १४०

§ §

# आधुनिक मराठी प्रेमकविता

काव्य क्र. २५४८० २४१९९२८

आधुनिक मराठी प्रेमकवितेचे हे संकलन वाचकांना सादर करताना प्रथम काही गोष्टींचा खुलासा करणे आवश्यक वाटते: आधुनिक मराठी कवितेचा प्रारंभ केशवसुतांपासून झाला. आजच्या मराठी कवितेला जे स्वरूप प्राप्त झाले आहे, तिच्यात जे विविध प्रवाह निर्माण झाले आहेत, त्यांचा प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष उगम केशवसुतांच्या काव्यात झालेला आढळून येईल. मराठीतल्या प्रेमकवितेचा प्रथम आविष्कारही खऱ्या अर्थाने केशवसुतांनीच केला. म्हणून या संकलनाची सुरुवात केशवसुतांच्या कवितेपासून करणे उचित वाटले.

संकलनासाठी अठराशे पंच्याऐंशी ते एकोणीसशे पंचाहत्तर हा नव्वद वर्षांचा कालखंड डोळ्यांपुढे ठेवला आहे. हा विशिष्ट कालखंडच का निवडला, त्याचेही स्पष्टीकरण द्यायला हवे. अठराशे पंच्याऐंशी साली केशवसुतांचे काव्यलेखन सुरू झाले. रे. नारायण वामन टिळक हे केशवसुतांपेक्षा एक वर्षाने वडील. पण केशवसुतांचे काव्यविषयक क्रांतिपर कार्य आणि एकूण मराठी कवितेवर त्या कार्याचा झालेला निश्चित आणि मूलगामी परिणाम ध्यानात घेता, हा कालखंड केशवसुतांपासून सुरू झाला, असे मानणे युक्त होते. त्यामुळे तेवढ्यापुरता कवींचा जन्मानुसारी अनुक्रम बदलून या संकलनाचा प्रारंभ आम्ही केशवसुतांच्या कवितेने केला. हा एक अपवाद वगळता पुढे कवींच्या जन्मज्येष्ठतेनुसार कवींचा आणि त्यांच्या कवितांचा क्रम लावलेला आहे.

केशवसुत आणि त्यांचे समकालीन बालकवी–गोविंदाग्रजादि कवी यांची कविता, रविकिरण मंडळ–तांबे यांची कविता, अनिल–कांत–बोरकर–कुसुमाग्रज–इंदिरा यांची कविता, मर्ढेकरांनी पुन्हा एकदा मराठी कवितेत अंतर्बाह्य आणि समग्र परिवर्तन घडवल्यानंतर लिहिली गेलेली नवकविता, ना. घ. देशपांडे–मुक्तिबोध–रेगे- विंदा करंदीकर–बापट–पाडगावकर यांची कविता आणि आरती प्रभू–दिलीप चित्रे–नारायण सुर्वे–ग्रेस–महानोर इत्यादींची आजच्या काळाशी नाते सांगणारी कविता अशा सरणींतून मराठी कवितेचा प्रवाह वहात आलेला आहे. हे टप्पे अगदी काटेकोरपणे परस्परनिरपेक्ष आहेत, असे अर्थातच नाही. जवळ जवळ एक शतकाच्या कालखंडात ज्या कवींनी मराठी कवितेच्या विकासात लक्षणीय स्थान मिळवले, त्यांचा उल्लेख इथे केला आहे. या उपरिनिर्दिष्ट कवींचा ठसा आपआपल्या काळावर स्पष्टपणे उमटलेला असला, तरी त्या त्या वेळी चांगली कविता लिहिणारे इतरही अनेक कवी आहेत आणि त्यांनी आपापल्या परीने समकालीन कविता समृद्ध केलेली आहे. त्यांच्याही प्रेमकवितांचा अंतर्भाव आम्ही या संकलनात आवर्जून केला आहे.

संकलनासाठी विशिष्ट कालखंड आखून घेताना एकोणीसशे पंचाहत्तरपाशी आम्ही का थांबलो, सलग एका शतकातली मराठी कविता विचारात का घेतली नाही ' असा प्रश्न

कुणी सहज विचारू शकेल. त्याचे उत्तर असे आहे की, एकोणीसशे पंचाहत्तरनंतर मराठी कवितेला पुन्हा एकदा नवा रसरशीत बहर आला. तिच्या अनुभवविश्वापासून तो तिच्या आविष्कारपद्धतीपर्यंत आणि शब्दकळेपर्यंत या नव्या कवितेत मूलगामी बदल झाले. लक्षणीय कविता लिहिणाऱ्या कवींची संख्या तर एकदम वाढलीच; पण ग्रामीण कविता, दलित कविता, विशिष्ट प्रांतीय भाषेत लिहिली जाणारी कविता, महानगरातील यंत्रसंस्कृती व तिथे प्रत्ययाला येणारे माणसामाणसातले अमानुष तुटलेपण यांचे चित्रण करणारी कविता—असे विविध नवे प्रवाह जोमदारपणे आले आणि मूळच्या मराठी कवितेला त्यांनी अनेक अंगांनी समृद्ध केले. याच वेळी गझल हा रचनाबंध पुन्हा एकवार पुढे आला. नाट्य, चित्रपट, ध्वनिमुद्रिका या कला-माध्यमांसाठी भावगीत-लेखनही अधिक गांभीर्यपूर्णतेने, विशिष्ट कलात्मक दर्जा सांभाळून केले जाऊ लागले. या नव्या आविष्कारांना संपूर्ण न्याय द्यायचा, तर त्यासाठी वेगळे संकलन करणे आवश्यक आहे, असे वाटले. त्यांतले मोजके कवी प्रस्तुत संकलनात बसवण्याचा प्रयत्न केला, तर या वेगळ्या आविष्कारांवर अन्याय केल्यासारखे होईल, ही जाणीव झाली. इथेच आणखी एक गोष्ट नमूद करावीशी वाटते : ही नवी कविता पूर्वीच्या कवितेपेक्षा इतकी वेगळी आहे की, तिच्या मूल्यमापनासाठी निराळी अभिरुची, समीक्षेचे निराळे निकष सिद्ध होत आहेत. त्यांच्या प्रकाशात या कवितेचा विचार पूर्वींहून वेगळ्या पद्धतीने होणे आवश्यक आहे. म्हणून एकोणीसशे पंचाहत्तरपर्यंतच्या कवितेशी थांबावे, असा निर्णय आम्ही घेतला.

हे संकलन करताना प्रामुख्याने दोन उद्देश डोळ्यांसमोर ठेवले आहेत : विशिष्ट कालखंडातील उत्तम मराठी प्रेमकविता वाचकांना उपलब्ध करून द्यावी आणि त्या अनुषंगाने मराठी कवींचा प्रेमविषयक दृष्टिकोन कसकसा बदलत गेला, याचा एक आलेखही त्यातून उमटावा, हे ते उद्देश होते. ही निवड आम्ही कशी केली ? ज्यांच्या कवितांचे संग्रह प्रसिद्ध झालेले आहेत, तेच कवी आम्ही विचारात घेतले. वस्तुतः या काळातले असे अनेक कवी आहेत की, ज्यांनी गुणवत्तेच्या दृष्टीने अतिशय चांगली कविता लिहिली आहे. पण संग्रहाच्या अभावी ती नियतकालिकांत, दिवाळी अंकांत किंवा अन्यत्र अशी विखुरलेली आहे. त्यांतून त्या कवींच्या प्रेमकविता निवडणे आम्हाला अवघड होते. खेरीज संकलनातील कवितांच्या संख्येलाही बंधन पडणे अपरिहार्य होते. म्हणून संग्रहित न झालेल्या कविता नाइलाजाने बाजूला ठेवाव्या लागल्या. याला दोन-तीन जुन्या लोकप्रिय संकलनांचा अपवाद आम्ही केला आहे.

संकलन करताना शक्यतो निकोप आणि वस्तुनिष्ठ दृष्टिकोन ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. मात्र शेवटी संपादकांच्या व्यक्तिगत अभिरुचीचा, आवडीनिवडीचा स्पष्ट-अस्पष्ट ठसा अशा संकलनात उमटणे स्वाभाविक आणि अपरिहार्यही आहे.

केशवसुतांपूर्वीच्या मराठी कवितेत स्त्रीपुरुष-संबंधांविषयीचा, स्त्रीकडे बघण्याचा दृष्टिकोन काय होता? मराठी कवितेच्या आरंभकाळी संतकवींची कविता मोठ्या प्रमाणात दिसते. त्यांनी अध्यात्मावर आणि त्या अनुषंगाने आलेल्या वैराग्यावर आपल्या काव्यातून अधिक भर दिला. त्यामुळे त्यांच्या काव्यात स्त्री ही अध्यात्माच्या मार्गावरचा मोठा अडथळा ठरली. प्रापंचिक मोहांत गुरफटल्यामुळे माणूस आत्मप्राप्तीला मुकतो, त्यामुळे त्या मोहांकडे शक्य तो पाठ फिरवावी, ही भूमिका पाळली गेली. समकालीन महानुभाव कवींनी तर वैराग्य आणि प्रपंचविमुखता यांवर इतका भर दिला की, त्यांनी स्त्रीला 'पापाची उत्तरपेठ', 'नरकाची पायवाट' म्हटले आणि 'चित्रीचीही स्त्री न देखावी' असा कठोर दंडक घालून दिला.

तरीही ज्ञानदेव, तुकाराम, एकनाथ यांसारखे संत हे प्रतिभागुणांनी संपन्न असलेले श्रेष्ठ दर्जाचे कवीही होते. त्यामुळे स्त्रीपुरुष-स्नेहातले माधुर्य आणि त्याने जीवनाला येणारा गोडवा यांची जाणीव त्यांना न होणे अशक्य होते. म्हणून आत्मा-परमात्मा, भक्त भगवंत—यांतली परस्परांविषयीची ओढ, मीलनाची आतुरता ही व्यक्त करताना त्यांनी शृंगारिक रूपकांचाच अवलंब केला त्यातून विराणी (विरहिणी) आणि गौळण हे मधुर काव्यप्रकार निर्माण झाले.

आध्यात्मिक अनुभव मांडताना शृंगाराची परिभाषा संतांना स्वीकारावी लागली, याचे एक कारण प्रापंचिक जनांना त्यांच्या परिचित भावसृष्टीचा आश्रय घेऊनच अध्यात्म शिकवले पाहिजे, ही जाणीव त्यांना झाली असावी. पण त्याहीपेक्षा स्त्रीपुरुषांतील नैसर्गिक आकर्षणाचे प्रबळ सामर्थ्य त्यांच्याही मनाला तीव्रतेने झाले असावे. एकंदरीने संतकाव्याचा विचार केला, तर स्त्री ही विविध रूपांनी त्यात अवतरलेली दिसते. संतांनी कधी स्वतः माऊली होऊन ईश्वराच्या बाळरूपाची लडिवाळ चित्रे रंगवली; कधी आपण बाळ होऊन त्याला आई म्हणून आर्त साद घातली; कधी ईश्वराला स्त्रीरूपात पाहून त्याच्याशी प्रेमालाप केले; तर कधी स्वतःच प्रेयसीची व्याकुळता पांघरून त्या जगजेठीच्या भेटीसाठी होणारी जीवाची तळमळ व्यक्त केली. संतांच्या विराण्या, गौळणी, पदे म्हणजे त्यांच्या भक्तिभावनेचाच प्रणयाच्या रूपात झालेला नितांत सुंदर आविष्कार आहे. प्रेमाचे लौकिक पातळीवरचे शारीर रूप इथे अलौकिक मानसिक ओढीने असे दीप्त झालेले दिसते की, अध्यात्मभावनेच्या जोडीला प्रेमसंकल्पनेचा आत्माही संतांना गवसला होता, याची प्रतीती आल्यावाचून रहात नाही.

संतकवितेकडून पंडिती कवितेकडे वळले, म्हणजे स्त्रीपुरुषसंबंधाचा पुन्हा एक वेगळा आविष्कार दृष्टीस पडतो. एक तर पंडित कवी हे संतकवींप्रमाणे सर्वसंगपरित्यागी साधक नव्हते, की प्रपंचविमुख बैरागीही नव्हते. ते सर्वसामान्यांसारखेच कुटुंबवत्सल गृहस्थ होते. स्त्रीसहवासाची, स्त्रीसुखाची उत्कट जाणीव त्यांना होती. पंडिती काव्याभिरुची ही प्रामुख्याने संस्कृत काव्यनाटकांवर पोसलेली होती, हेही त्यांच्या काव्यातल्या शृंगार-

भावनेच्या मोकळ्या आविष्काराचे एक कारण आहे. पंडित कवींची काव्ये ही रामायण-महाभारतादि ग्रंथ आणि पौराणिक आख्याने कथन करणारी आहेत. मोरोपंतांसारखे ज्येष्ठ पंडित कवी हे पुराण सांगणारे होते. प्रापंचिक भावनांचा आविष्कार करून श्रोत्यांना रिझवावे, हाच त्यांचा प्रमुख उद्देश होता. अर्थात् पंडित कवींच्या काव्यात इतर रसांबरोबरच संयोगशृंगार आणि वियोगशृंगार यांना प्रमुख स्थान मिळावे, यात आश्चर्य नाही. तथापि या भावना त्यांना राम कृष्णादि देवादिकांच्या किंवा पौराणिक व्यक्तिरेखांच्या आश्रयाने प्रकट कराव्या लागल्या. याचे एक कारण, संतकवींनी घालून दिलेल्या दंडकानुसार ' आपण काही तरावया गावे,' हाच त्यांचा काव्यविषयक आदर्श बनला होता. आणि दुसरे म्हणजे तत्कालीन समाजात जे उघडपणे बोलणे उचित नव्हते, हाडामासाच्या स्त्रीवरचे प्रेम शारीर पातळीवरून चित्रित करणेही जिथे शक्य नव्हते, तिथे राधा-कृष्णांच्या प्रेमलीलांच्या निमित्तानेच शृंगारभावनेची मुक्त, क्वचित् अश्लील आणि बीभत्सही वर्णने करण्याची हौस त्यांना भागवून घ्यावी लागली असेल.

संत आणि पंडित यांच्या तुलनेने प्रणयभावनांचा खराखुरा वासनानिष्ठ आविष्कार शाहीर कवींनीच प्रथम केला. उत्तर पेशवाईच्या काळातील लावणी-वाङ्मय या दृष्टीने अतिशय संपन्न आहे. राधा-कृष्णाच्या पारंपरिक रूपकाचा आश्रय सोडून समाजात अवतीभोवती वावरणाऱ्या स्त्री-पुरुषांमधील प्रणयभावनेची जिवंत, अस्सल व धीट चित्रे लावणीकार कवींनीच प्रथम रंगवली. स्त्रीसौंदर्य, तिचे विविध विभ्रम यांचे सुंदर दर्शन लावण्यांमधून घडते. होनाजी, सगनभाऊ यांसारख्या लावणीकार कवींच्या काव्यात प्रणयभावनेच्या मानसिक सूक्ष्म छटाही क्वचित् रंगवलेल्या दिसतात. होनाजी, परशुराम, प्रभाकर या प्रतिभावंत शाहिरांनी आपल्या लावण्यांतून कोवळा प्रेमभाव व्यक्त केला आहे. पण हे खरे असले, तरी एकूण लावणी-वाङ्मयात प्रेमाची शरीरनिष्ठ आसक्त बाजूच अधिक स्पष्टपणे दृग्गोचर होताना दिसते.

अठराशे अठरा साली पेशवाई बुडाली आणि इंग्रजी राजवट या देशात आली. हा बदल केवळ राजकीय स्वरूपाचा नव्हता. तो सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, वैचारिक अशा अनेक दृष्टींनी मूलगामी आणि क्रांतिकारक ठरला. आजपर्यंत आध्यात्मिक आणि पारलौकिक उन्नतीवर भर देणाऱ्या आपल्या समाजाला प्रथमच इहवादी भूमिकेतून जीवनाकडे बघण्याची एक नवी नजर या नव्या राजवटीने दिली. इंग्रजी भाषारूपी ' वाघिणीचे दूध ' प्यालेल्या अनेक नवशिक्षित सुधारणावादी विचारवंतांनी समाजाला आलेली सुस्त मरगळ दूर करून त्यात चैतन्याचे, उत्साहाचे नवे प्रवाह खेळवले. नवी इंग्रजी विद्या, मुद्रणकला, तिच्या योगाने होणारा छापील पुस्तकांचा प्रसार यांमुळे एकूण मराठी जीवनच नव्हे, तर मराठी साहित्यही कात टाकू लागले. अभिजात, प्रौढ, प्रगल्भ, तसेच इंग्रजीच्या व्यासंगाने नवचैतन्यमय झालेले एक नवे ओजस्वी गद्य

समाजाच्या मनाला आता प्रभावित करू लागले.

या वेळची काव्यक्षेत्राची स्थिती कशी होती, हे जाणून घेतले पाहिजे केशवसुतपूर्व-कालीन, अव्वल इंग्रजी अमदानीतली मराठी कविता ही बहुतांशी परप्रत्ययी होती. या कालखंडाला 'भाषांतरयुग' म्हटले जाते, ते या दृष्टीने योग्य आहे. पेशवाईच्या अस्ताबरोबर उत्तर पेशवाईत लावणी-वाङ्मयाला आलेला बहर झपाट्याने ओसरला. पण संस्कृतचा पगडा पंडिती कवितेच्या रूपाने जनमनावर अजूनही बसलेला होता. नव्या इंग्रजी काव्याला, वाङ्मयाला प्रतिकार करावा, ही भूमिका घेऊनच की काय, संस्कृतचे गाढ अध्ययन केलेल्या अनेक विद्वान् शास्त्रीमंडळींनी संस्कृतकडे आपला मोहरा फिरवला आणि तिथल्या प्रसिद्ध काव्य-नाटकांची भाषांतरे करण्यास सुरुवात केली कृष्णशास्त्री चिपळूणकर, कृष्णशास्त्री राजवाडे, परशुरामपततात्या गोडबोले, गणेशशास्त्री लेले, इत्यादी रसिक आणि विद्वान् शास्त्रीमंडळींनी संस्कृत काव्य-नाटकांचे मराठी अनुवाद केले, तर इंग्रजी नवशिक्षित विद्वानांनी इंग्रजी काव्ये अनुवादित करण्यास प्रारंभ केला.

या पार्श्वभूमीवर अठराशे पंच्याऐंशी साली केशवसुतांनी आपली पहिली कविता लिहिली. प्रखर व्यक्तिवादी आत्मनिष्ठ जाणीव आणि सौंदर्यवादी दृष्टिकोन या दोन गोष्टी इंग्रजी साहित्यातून, विशेषतः इंग्रजीतील रोमँटिक प्रवृत्तींच्या कवींच्या काव्या-मधून केशवसुतांनीच प्रथम मराठीत आणल्या. स्वतःच्या कवित्वाचा रास्त अभिमान केशवसुतांना होता, त्याप्रमाणेच कवीच्या सामर्थ्यावरही त्यांची उदंड श्रद्धा होती. कविप्रतिभा ही एक स्वतंत्र, चैतन्यमय शक्ती आहे; तिला कुणीही व कसलेही आदेश देऊ नयेत, हे केशवसुत पुन्हा पुन्हा आग्रहाने सांगतात. आजवर अध्यात्माच्या अंत-राळात भराऱ्या मारणाऱ्या, पौराणिक कथा-आख्यानांत रंगून जाणाऱ्या मराठी कवितेला त्यांनीच प्रथम सर्वसामान्य माणसाच्या जगात आणले. त्यांची सुख-दुःखे, भाव-भावना, वासना-विकार यांना तिथे मानाचे, जिव्हाळ्याचे स्थान दिले आणि वास्तवाच्या भूमीवर त्या कवितेचे पाऊल स्थिर केले.

केशवसुतांनी मराठी कवितेत ज्या विविध नव्या जाणिवा आणल्या, त्यांत स्त्रीपुरुष-संबंधातून निर्माण होणारी उत्कट प्रीतिभावना आणि तिचा व्यक्तिविशिष्ट आविष्कार यांचा एक जिवंत, जोरकस प्रवाह आहे. व्यक्तिवादावर आणि इहवादावर भर देणारी इंग्रजी संस्कृती, साहित्य, विशेषतः इंग्रजीतले रोमँटिक काव्य या साऱ्यांचा मराठी सुशिक्षित समाजावर ज्या तऱ्हेने परिणाम होत होता, त्याचे सम्यक्, उचित आणि प्रतिभापूर्ण दर्शन केशवसुतांच्या कवितेत घडते. मराठी काव्यात 'माणूस' म्हणून स्त्रीचा विचार प्रथम केशवसुतांनी केला. हा विचार स्त्रीपुरुषसंबंधाच्या पार्श्वभूमीवर मुख्यत्वे आधारलेला आहे. शारीर धुंदीपेक्षाही खोल अशी प्रेमाची मानसिक उत्कटता त्यांनी सुसंस्कृत, अभिरुचिपूर्ण रूपात मराठीमध्ये प्रथम व्यक्त केली. स्त्रीपुरुषप्रेमाच्या अभिव्यक्तीतला संकोच त्यांनी बाजूला सारला आणि जीवनाच्या विकासाला मधुरता

आणणारी सहचारिणी, भाववृत्तींना फुलवणारी प्रेयसी म्हणून स्त्रीचा गौरव केला.

या काळात स्त्रियांकडे बघण्याचा शिक्षित समाजाचा दृष्टिकोन हळूहळू बदलत होता आणि एक आशादायक वातावरण निर्माण होऊ लागले होते. या बदलत्या दृष्टिकोनाचे वाङ्मयात पडलेले प्रतिबिंब काव्यातून अधिक उत्कटपणे पडलेले दिसते आणि त्याचा प्रारंभ निःसंशय केशवसुतांच्या प्रेमकवितांपासून झाला आहे.

'नैर्ऋत्येकडील वारा' या प्रसिद्ध कवितेत कोकणातील आपल्या घराच्या आठवणी काढताना, केशवसुतांनी त्यात केलेला पत्नीचा उल्लेख ओझरता असला, तरी तो फार हृद्य आहे :

श्वासांनी लिहिली विराम दिसती ज्यांमाजि बाष्पीय ते
प्रीतीचे बरवे समर्थन असे संस्पृह्य ज्यांमाजि ते,
कांतेची असली मला पवन हा पत्रे अता देतसे;
डोळे झाकुनि वाचिता त्वरित ती सम्मूढ मी होतसे !

असे केशवसुत या कवितेत जेव्हा म्हणतात, इतकेच नव्हे तर तिच्या 'गोड चुंबनां'-चाही पुढे ते जेव्हा उल्लेख करतात, तेव्हा या वर्णनांना प्रत्यक्षानुभूतीची बैठक आहे, हे जाणवल्यावाचून रहात नाही.

केशवसुतांनी प्रेमाचे चित्र रंगवताना स्त्रीचा देह गर्ह्य मानलेला नाही किंवा प्रीति-भावनेच्या शारीर आविष्काराकडे ओशाळगतीच्या भावनेने पाहिले नाही. शरीरवासनेचे विलोभनीय आविष्कार मानसिक जिव्हाळ्यात परिणत होतात, हे त्यांनी जाणले आहे.

प्रेमाचे विशिष्ट तत्त्वज्ञानही केशवसुतांनी फार सूक्ष्म रीतीने आणि प्रथमच मराठी कवितेत मांडले आहे. ती त्या काळाची गरजही होती. स्त्रीपुरुषप्रेमात गैर असे काही नाही, प्रेम केवळ वासनामय नसते, मानसिक आवड व ओढ यांचा त्यात मोठा भाग असतो, स्त्री ही जीवनाची प्रेरणा होऊ शकते, स्त्रीप्रेमामुळे आयुष्याला सौंदर्याचा आणि मार्दवाचा स्पर्श होतो, असे विचार केशवसुतांच्या प्रेमकवितांतून वारंवार येतात. 'प्रीती मिळेल का हो बाजारी !' या नितांत सुंदर कवितेत, हृदयस्थ प्रीती कोणत्याही बाह्य उपाधींपासून कशी दूर असते, प्रीती ही प्रीतीनेच कशी संपादिता येते, याचे वर्णन कवीने केले आहे. 'दो हृदयांच्या संगमसमयी कसल्या लौकिक रीती ?' हा त्यांचा प्रश्न तत्कालीन समाजाच्या प्रेमविषयक भूमिकेला उद्देशून केलेला आहे; त्याबरोबरच एकूण मानवी जीवनातले स्त्रीचे स्थान किती थोर आणि प्रेरणादायक आहे, हे सांगताना केशवसुतांनी 'भूपृष्ठस्थित आद्य दैवत' अशा अत्यंत गौरवपर भाषेत तिचे वर्णन केले आहे.

केशवसुतांच्या काही प्रेमविषयक कविता त्यांच्या कविप्रतिभेशी संलग्न झालेल्या आहेत. कवितेकडे प्रेयसी म्हणून बघणे हा संकेत तसा नवा नाही. अनेक संस्कृत कवींच्या काव्यात तो आढळून येतो. पण आधुनिक मराठी कवितेत प्रिया आणि प्रतिभा या

परस्परांत मिसळून जाऊन एकरूप झाल्या आहेत, हे चित्र केशवसुतांच्याच काव्यात प्रथम दिसते. ‘ जिने मला वेडा केले, तिच्यावरी ही फिर्याद ’ असे केशवसुत जिला उद्देशून लिहितात, ती त्यांची प्रिया आहे आणि कविप्रतिभाही आहे. ‘ रुष्ट सुंदरीस ’ किंवा ‘ क्षणात नाहीसे होणारे दिव्य भास ’ यांसारख्या कवितांमधूनही प्रिया आणि प्रतिभा यांचे हे एकरूपत्व जाणवते. हे एकरूपत्व पुढे अनेक कवींना स्फूर्तिप्रद ठरले आणि प्रतिभेला प्रेयसी कल्पून व स्वतःकडे प्रियकराची भूमिका घेऊन अनेकांनी प्रेयसीशी करावयाच्या त्या क्रीडा प्रतिभेशी केल्या. पण यात विकृत किंवा विचित्र काही नाही. केशवसुतांचे समकालीन असणारे रेंदाळकर ‘ जादूगारीण ’ या आपल्या कवितेत म्हणतात :

वद जादुगारिणी तेव्हा घातलीस फुंकर कसली ?
ओसाड माळ हा सारा पुष्पांनी भरुनी गेला !

त्यांच्या या अकृत्रिम आणि सुंदर काव्यपंक्तींमधून कवी आणि कविप्रतिभा यांचे अतूट नाते, प्रियेप्रमाणे कवीचे जीवन प्रफुल्लित करून टाकणारी प्रतिभेची अद्भुत जादू यांचा हृद्य प्रत्यय येतो. प्रतिभेच्या रूपाने प्रियेला आळवताना किंवा कविप्रतिभेवरच प्रेयसीचा आरोप करताना त्या काळातल्या कवींना कसले तरी खोल समाधानही लाभत असावे. कदाचित् सामाजिक नीतिकल्पनांच्या निर्बंधामुळे प्रत्यक्षात प्रियेला जे सांगता येत नसेल, त्याचा उच्चार प्रतिभेच्या संदर्भात करून काही कवींनी आपल्या मनाची एक अनामिक, पण उत्कट भूक भागवली असावी.

केशवसुतांनी प्रवर्तित केलेल्या प्रेमविषयक संकल्पनांच्या अनुषंगानेच मराठी प्रेम-कवितेने पुढे आपला मार्ग चोखाळलेला दिसतो. प्रेमभावनेच्या प्रांजळ, नितळ आणि सुंदर आविष्काराचा हा मार्ग केशवसुतांनी समकालीन आणि नंतरच्या कवींना मोकळा करून दिला. त्या वाटेने जाताना वेगवेगळ्या कवींनी आपली स्वतंत्र भर मराठी प्रेम-कवितेत टाकली. कित्येकांनी आपले वेगळे व स्वतंत्र परिमाण तिला दिले.

केशवसुतकालीन कविपंचकातले विनायक हे कवी प्रवृत्तीने इतर चारही कवींपेक्षा काहीसे वेगळे आहेत. विनायकांनी रूढ अर्थाने प्रेमकविता लिहिलीच नाही, असे म्हटले तरी चालेल. त्यांची दृष्टी सतत भूतकाळाकडे वळलेली होती. आणि विनायकांच्या कवितेतील स्त्री ही देखील इतिहासातलीच आहे. तिचे समकालीन वास्तव रूप चित्रित करण्याऐवजी भूतकालातील धूसर वातावरणात गुरफटल्यामुळे आणि त्याग, पराक्रम, पातिव्रत्य आदि गुणांच्या वलयामुळे अधिक आकर्षक पण कल्पनारम्य असलेली अशीच स्त्री विनायकांनी आपल्या काव्यांतून रंगवली. ऐतिहासिक स्त्रियांचे गुणवर्णन करताना त्यांच्यातले मानवीपण विनायक हरवून बसतात. त्यामुळे जिवंतपणाची, वास्तवतेची खूण त्यांच्यामध्ये पटत नाही. ‘ स्त्री आणि पुरुष ’ ही एके काळी फार गाजलेली विनायकांची कविता. तिच्यामध्ये पुरुषांच्या भ्रमरवृत्तीचे जे चित्रण केलेले आहे, ते आज फार सांकेतिक वाटते. काही कवितांतून विनायकांनी प्रेमाचे तत्त्वज्ञानही मांडले आहे.

'प्रीती' सारखी त्यांची कविता स्वतंत्रतः वाचनीय असली, तरी इतर समकालीन कवींच्या भावनेचा पुनरुच्चार करण्यापलीकडे ती विशेष काही साधते, असे दिसून येत नाही.

विनायकांच्या तुलनेने बालकवींच्या काव्यात येणारे प्रेमभावनेचे चित्रण अधिक सुंदर आणि अधिक जिवंत वाटते. विनायकांप्रमाणेच बालकवीही एका अर्थी वास्तवापासून दूर असणारा कवी. विनायक इतिहासात रमणारे, तर बालकवी निसर्गात आनंद शोधणारे. केशवसुतांनी ज्या अर्थाने वर्तमानाचे भान व अनुसंधान सतत राखले, त्या अर्थाने ती जाण या दोन्ही कवींना नव्हती. पण निसर्गात रमणाऱ्या बालकवींनी आपली प्रेमभावना निसर्गाच्या अनुषंगाने आणि निसर्गचित्रांच्या, निसर्गप्रतिमांच्या द्वारा अत्यंत आकर्षकपणे व्यक्त केली. 'अरुण' सारख्या कवितेत कल्पनीयाच्या पातळीवरून का होईना, सर्व निसर्गाला व्यापून राहिलेल्या प्रेमभावनेची मनाला भुरळ घालणारी सुंदर चित्रे बालकवींनी रंगवली.

या प्रेमाच्या लाटेखाली मस्तक नमवावे
हे आम्हाला, ब्रह्मांडाला, देवाला ठावे...
प्रेमावाचून फेड कशाने प्रेमाची व्हावी ?
हा बघ सविता प्रेमळ भूते प्रेमाने नटवी .

या ओळी वाचकाला त्याच्या परिचित जगापासून, मानवी व्यवहारापासून दूर घेऊन जातात आणि एका अद्‌भुतरम्य, अवास्तव, पण अत्यंत रम्य, परीकथासदृश अशा एका यक्षभूमीत त्याला प्रवेश मिळवून देतात. या यक्षभूमीची अधिदेवता म्हणजे बालकवींची 'फुलराणी'. मराठी कवितेतले हे एक अद्‌भुत प्रेमचित्र आहे. त्याचे तरल आणि निर्व्याज रूप इतके विलोभनीय आहे की, वास्तवाचे निकष त्याला लावण्यास मन धजत नाही व तसे ते लावूही नयेत. बालकवींनीही– कदाचित् अनुकरणाच्या मोहाने– प्रीतीचे तत्त्वज्ञान सांगणाऱ्या काही कविता लिहिलेल्या आहेत. उदाहरणार्थ, या ओळी बघाव्यात :

प्रीति हवी तर जीव आधि कर अपुला कुरबान
प्रीति हवी तर तळहातावर घे कापुनि मान

या ओळींतला भडक अतिरेकीपणा बालकवींच्या बालसदृश, कोवळ्या आणि हळव्या कविवृत्तीशी अगदी विसंगत आहे. बालकवींची, प्रेमभावनेचे चित्रण करण्याची खरी शक्ती जाणवते ती 'फुलराणी', 'तू तर चाफेकळी', 'संध्याराणी', 'तारकांचे गाणे' यांसारख्या त्यांच्या कवितांतून. इथे जी प्रेमभावना बालकवी रंगवतात ती मुग्ध, कोवळी, बरीचशी भाबडी आणि मुख्य म्हणजे शरीराच्या दुरन्त वासनांपासून सर्वस्वी अलिप्त असणारी अशी आहे. ही प्रीती बाल्य आणि तारुण्य यांच्या सीमेवर घोटाळणारी आहे. प्रौढ आणि परिणत अशी प्रेमभावना बालकवींच्या कवितेत कुठेच नाही. आणि त्यामुळे त्या भावनेच्या अनुषंगाने येणारे दाहक दुःख, वंचना, वेदना, निराशा, संघर्ष, उन्माद हे काहीच इथे नाही. आहे ती फक्त एक निर्मळ, आनंदमय, अम्लान तृप्ती.

केशवसुतकालीन कविपंचकातला ‘ प्रेमाचा शाहीर ’ समजले जाणारे कवी म्हणजे गोविंदाग्रज. ते स्वतःला केशवसुतांचे ‘ सच्चे चेले ’ म्हणवत असले, तरी गोविंदाग्रज केशवसुतांहून अनेक दृष्टींनी वेगळे आहेत आणि कवी या नात्याने त्यांची बलस्थानेही अगदी निराळी आहेत. गोविंदाग्रजांनी प्रेमकविता विपुल लिहिली आणि ती वेगवेगळ्या प्रेरणांमुळेही लिहिली. कल्पकता, बुद्धिमत्ता आणि भाषाप्रभुत्व या तीनही शक्ती गोविंदाग्रजांना प्रमाणाबाहेर लाभलेल्या होत्या. त्या कधी त्यांच्या कवितेच्या अंगी लागतात, तर कधी त्या एखाद्या कवितेच्या सौंदर्याला व प्रमाणबद्धतेला ढळ पोहोचवतात. गोविंदाग्रजांच्या ज्या कविता केवळ कल्पनाचमत्कृतीतून निर्माण झाल्या आहेत, त्यादेखील आपल्या निरुपम नावीन्याने वाचकाला घडीभर स्तिमित करून टाकतात. ‘ गुलाबी कोडे ’, ‘ गोड निराशा ’, ‘ पहिले चुंबन ’, ‘ मुरली ’ या काही कविता अशा प्रकारच्या आहेत.

तथापि प्रत्यक्ष प्रेमाचा अनुभव गोविंदाग्रजांना लाभला होता आणि प्रेमभंगाचे दारुण चटकेही त्यांनी अनुभवले होते, याची साक्ष त्यांच्या अनेक कवितांतून वाचकाला पटते. या कविता पुन्हा दोन प्रकारच्या आहेत : गोविंदाग्रजांच्या कल्पकतापूर्ण आणि चमत्कृतिप्रधान प्रतिभेला रूपकांचा आश्रय मानवत असे. अशा रूपकांतून त्यांनी प्रेमभावनेचे उत्कट, प्रभावी आणि वाचकांना थक्क करून सोडणारे चित्रण केलेले आढळते. ‘ प्रेम आणि मरण ’ ही त्यांची अशी एक गाजलेली प्रेमकविता. एका क्षणाच्या प्रेममीलनाच्या आनंदावरून उभे आयुष्य हसत हसत ओवाळून टाकणाऱ्या एका वृक्षाच्या रूपाने गोविंदाग्रजांनी प्रेमाचे एक उत्कट, अतिरेकी, अशक्यप्राय, पण मनाला झपाटून टाकणारे असे प्रेमाचे तत्त्वज्ञान अत्यंत प्रभावी रीतीने मांडले आहे. मराठी प्रेमकवितेतले हे एक शिखर आहे. ‘ ओसाड आडातील एकच फूल ’ ही गोविंदाग्रजांची कविताही अशीच रूपकाश्रयी आहे.

पण गोविंदाग्रजांना ‘ प्रेमाचे शाहीर ’ हे बिरुद मिळवून देणाऱ्या त्यांच्या अस्सल प्रेमकविता वेगळ्याच आहेत. इथे गोविंदाग्रज कल्पनारम्य शैलीचा आश्रय घेत नाहीत; भाषेचा लखलखता झळाळ प्रकट करीत नाहीत किंवा आपल्या बुद्धिवैभवाने रसिकांना दिपवूनही टाकत नाहीत. ज्या प्रेमनिराशेचा चटका त्यांनी प्रत्यक्षात अनुभवला होता, ती त्यांची जीवघेणी वेदना इथे अगदी साध्या, सरळ, पण विलक्षण परिणामकारक रीतीने शब्दरूप धारण करून प्रकटली आहे. दुःखाने द्रवलेले त्यांचे हृदय या कवितांतून जणू ओघळत आहे. या त्यांच्या कविता म्हणजे मराठी प्रेमकाव्याला लाभलेली मोठी विलोभनीय हृदयस्पर्शी देणगी आहे. ‘ ती कोण ’, ‘ गोफ ’, ‘ एका शब्दासाठी ’, ‘ फणसाचे पान ’ अशा गोविंदाग्रजांच्या किती तरी कविता त्यांच्या प्रेमभंगाची व्यथा उत्कट रीतीने व्यक्त करतात. त्यांतल्या किती तरी पंक्ती या मराठीत चिरस्थायी होऊन बसल्या आहेत.

जगावाचुनि लाभतीस तर जग मी केले असते
तुझ्यावाचुनि जग परि आता हो असल्याचे नसते...
केल्या ज्याच्या पायघड्या मी तुझ्या पावलांसाठी
त्या हृदयाला तुडवुनि गेलीस नटव्या थाटापाटी ! ...
डोळ्यांपुरते जग नच असते रूप जगाला पुरते
प्रेमळ हृदया परि निर्दय जग दगडाखाली पुरते...
होइल होइल वाटत होते तेच अखेरीस झाले
नाव घेतल्यावाचुन आता मनात झुरणे आले !

यांसारख्या ओळींतून व्यक्त झालेली प्रेमनिराशेची तडफड इतकी जिवंत, भेदक, प्रत्ययकारी आहे की, अशा अवस्थेतून गेलेल्या कुणालाही आपलीही व्यथा इथे सशब्द झाल्याचा प्रत्यय येतो.

मराठी प्रेमकवितेचा प्रारंभ केशवसुतांपासून झाला असला, तरी तिला आत्मप्रत्ययाची धार गोविंदाग्रजांनी दिली. या दृष्टीने ते अगदी खरोखरच 'प्रेमाचे शाहीर' या बिरुदाला पात्र ठरतात !

केशवसुतकालीन कविपंचकात समाविष्ट न झालेल्या, पण मनाने, वृत्तीने आणि काव्यरचनेनेही त्या रोमँटिक संप्रदायावर अधिकार सांगू शकणाऱ्या आणखी एका समकालीन कवीचा इथे विचार केला पाहिजे. तो कवी म्हणजे रेंदाळकर. रेंदाळकरांनीही विपुल प्रेमकविता लिहिली. पण वैपुल्य हेच त्यांच्या एकंदर काव्यरचनेला हानिकारक झाले आहे. शिवाय रेंदाळकरांचा नियमक रचनेचा आग्रह हाही समकालीन कवींच्या मनात त्यांच्याविषयी प्रतिकूल भाव निर्माण करण्यास कारण झाला असावा. पण त्याहीपेक्षा रेंदाळकरांनी समकालीन कवींचा व समीक्षकांचाही रोष ओढवून घेतला, तो त्यांच्या प्रेमविषयक भूमिकेमुळे. ही भूमिका समकालीनांना तर आक्षेपार्ह वाटलीच, पण आजही अनेकांना ती विचित्र, अनैसर्गिक वाटण्याचा संभव आहे. रेंदाळकर प्रपंचात असमाधानी होते. आपल्या संवेदनाशील हृदयाला, प्रतिभागुणांना अनुरूप अशी जोड जीवनात आपल्याला लाभली नाही, ही खंत त्यांना कुठे तरी जाणवत होती, त्यामुळे कदाचित् असे घडले असावे.

गुलाब ज्याला रुचला नव्हता
मालतीहि ज्या पसंत नव्हती
कोरांटीच्या फुलासंगती
कंठावे का जीवित त्याने ?

हे रेंदाळकरांचे तीव्र उद्गार या बाबतीतला त्यांचा असंतोष व्यक्त करतात. रेंदाळकरांनी काही सुंदर प्रेमकविता लिहिल्या आहेत. 'प्रबोधन' ही एक अशी कविता. नादमधुर शब्दरचना, निसर्गवर्णनाची रम्य पार्श्वभूमी आणि तीवर शोभून दिसणारे

एक मुग्ध प्रणयचित्र यांमुळे ही कविता लक्षणीय झाली आहे. अशा प्रकारच्या त्यांच्या आणखीही काही कविता आहेत. पण रेंदाळकरांची कविता त्यांच्या काळात चर्चेचा व टीकेचा विषय झाली, ती त्यांच्या 'प्लेटॉनिक लव्ह' संबंधीच्या कल्पनांमुळे. स्त्रीपुरुषांमध्ये देहासक्तिनिरपेक्ष असे शुद्ध प्रेम असू शकते, असा टोकाचा विचार त्यांनी मांडला. नाते नसतानाही स्त्रीपुरुषांत विशुद्ध बंधुभगिनीप्रेम असू शकते, असेही त्यांनी आग्रहपूर्वक प्रतिपादले. परंतु या प्रकारच्या कवितांमध्ये चुंबनालिंगनांचे उल्लेख मात्र सतत येत राहिले. इतकेच नव्हे, तर रेंदाळकरांच्या मित्रप्रेमविषयक कवितांतूनही अशा शरीरनिकटतेचे वर्णन आले आहे. अर्थात् ही कविता त्या काळात उपहासाला पात्र झाली नसती, तरच आश्चर्य.

§

कालक्रमाने केशवसुतांच्या समकालीन असणाऱ्या तांब्यांच्या कवितांचा विचार रविकिरण मंडळाच्या जोडीने केला जातो. वाङ्मयाच्या इतिहासात तांबे-रविकिरण मंडळ असाच कालखंड मानलेला आहे. म्हणून तांबे यांच्या प्रेमकवितांचा विचारही इथेच केला पाहिजे. 'कौटुंबिक प्रेमाचे कवी' म्हणून तांबे यांची ख्याती आहे व ती बऱ्याच अंशी खरी आहे. तांबे यांना सुदैवाने आपल्या संसारातच प्रीतिसाफल्य लाभले होते. या साफल्याची व तृप्तीची सुंदर चित्रे त्यांनी रंगवली आहेत. 'जन म्हणति सावळी तुज सगळे', 'कुणि कोडे माझे उकलिल का?', 'डोळे हे जुलमि गडे', 'सहज तुझी हालचाल' यांसारख्या कविता प्रणयजीवनातील तृप्तीने ओथंबलेल्या आहेत. नाट्यगीतांतूनही तांब्यांनी प्रेमभावनेचा उत्तम आविष्कार केला आहे. 'राजकन्या आणि तिची दासी' यासारख्या कविता याची साक्ष देतील. विधवांची दुःखे तांब्यांनी तन्मयतेने रेखाटली; पण तिथे सामाजिक सुधारणेपेक्षाही स्त्रीमनाचे दुःख दूर व्हावे, ही तळमळ अधिक होती. सुधारणावादाचा प्रचारकी अभिनिवेश नसल्यामुळे तांब्यांच्या विधवेवरील कविता या साध्या पण हृदयंगम प्रेमकविताच झाल्या आहेत. 'विधवेचे स्वप्न', 'बघुनि तया मज होय कसेसे', 'हिंदु विधवेचे मन' यांसारख्या कविता या दृष्टीने लक्षणीय आहेत. तरुण प्रेमासक्त मुलींचीही आकर्षक चित्रे तांबे रंगवतात.

तांब्यांच्या अनेक प्रेमकवितांना आध्यात्मिक रूपकाची बैठक आहे. अद्वैताच्या पातळीवर जाणारे आत्मा-परमात्मा यांचे मीलन तांबे अनेक कवितांतून प्रेमाच्या, क्वचित् शृंगाराच्या परिभाषेत वर्णन करतात. तांब्यांच्या एकूण सर्व प्रेमकवितांचा विचार केला, तर प्रणयाबद्दलची निकोप निःसंकोच स्वागतशील वृत्ती, प्रणयातील अनेक सूक्ष्मतरल भावविभ्रमांचे रुचिर प्रत्ययकारी दर्शन आणि प्रेमी जनांबद्दलचा जिव्हाळा हे त्यांचे विशेष प्रामुख्याने नजरेत भरतात.

या काळापर्यंत आपल्याकडे स्त्रीशिक्षणाची– काही प्रमाणात का होईना– प्रगती झाली होती. सुशिक्षित, बुद्धिमान, कलासक्त, क्रीडापटु, संभाषणचतुर अशी स्त्री समाजात,

एखादी-दुसरी का होईना, दिसत होती. स्त्रीस्वातंत्र्याचा पुरस्कार करणारी, टेनिस खेळणारी, धीटपणे सभेत भाषण करणारी, राजकारण-समाजकारणादि विषयांत पुरुषांशी हिरीरीने वाद घालणारी स्त्री आता समाजाबरोबर साहित्यात – काव्यातही अवतरू लागली होती. अशा स्त्रीबरोबरच्या बौद्धिक सहवासाचा एक वेगळा आनंद लुटावा, ही इच्छा सुशिक्षित तरुणांना होती. त्या आनंदाचे अपरूपही त्यांना वाटत होते. स्त्रीविषयीच्या या बौद्धिक आकर्षणाचे, तिच्या सहवासाच्या आगळ्या आनंदाचे कौतुककुतूहलपूर्ण चित्रण रविकिरण मंडळाच्या– त्यातही विशेषेकरून माधव जूलियन यांच्या कवितेत आढळून येते.

माधव जूलियन म्हणजे डॉ. माधव त्र्यंबक पटवर्धन हे मराठी कविपरंपरेतले एक विलोभनीय, वादळी, पण अतिशय वेधक असे व्यक्तिमत्त्व आहे. गोविंदाग्रजांना 'प्रेमाचे शाहीर' हे विरुद सन्मानपूर्वक दिले गेले; पण प्रीतीच्या धुंद, उत्कट, स्वप्नाळू वेहोषीच्या कविता लिहिणारे माधव जूलियन 'प्रणयपंढरीचे वारकरी' या काहीशा उपहासपर पदवीला पात्र ठरले ! तथापि मराठी प्रेमकवितेच्या विकासक्रमात माधव जूलियन यांच्या कवितांचे स्थान वैशिष्ट्यपूर्ण आहे, यात शंका नाही. फारसी हा विषय कॉलेजात अभ्यासावा लागल्यामुळे त्या काव्यातली प्रणयाची धुंद उत्कटता, स्त्रीला अधिदेवता मानून तिला सर्वस्वाने शरण जाण्याची समर्पणशील वृत्ती, तिच्यासाठी आत्मनाश पत्करण्याची सिद्धता— हे सारे माधव जूलियनांच्या काव्यात आले. त्याबरोबरच इंग्रजी काव्याच्या परिशीलनाने 'प्लेटॉनिक लव्ह'ची म्हणजे शरीरनिरपेक्ष प्रेमाची ओढही त्यांच्या कवितेत प्रकट झाली. प्रेम म्हणजे प्रेयसीवर सक्ती करणे नव्हे, तर तिची अनन्य भक्ती करणे आहे. प्रेम म्हणजे त्याग, प्रेम म्हणजे निष्ठा, प्रेम म्हणजे निःस्वार्थ वृत्तीची पराकोटी— हे तत्त्वज्ञान माधव जूलियन यांच्या प्रेमकवितांइतके उत्कटतेने व परिणामकारकपणे मराठीत यापूर्वी कधीही प्रकट झाले नव्हते.

> जर उन्नती तव चिंतने
> जर सद्गती तव दर्शने
> तर का भवास वृथा भिणे ?
> दडणे कुठे गिरिकंदरी ?

हा एका कवितेत त्यांनी काढलेला उद्गार याच तत्त्वज्ञानाचा निदर्शक आहे. मानवी जीवनातले प्रणयभावनेचे महत्त्वाचे स्थान, पुरुषाच्या जीवनाला अर्थ प्राप्त करून देण्याचे तिचे अलौकिक सामर्थ्य यांचे वर्णन माधव जूलियन यांच्याइतक्या उत्कटतेने कुणीही केले नसेल. प्रेमातील त्यागभावनेचाही माधव जूलियनांनी सातत्याने पुरस्कार केला आहे.

> प्रेम होईना तुझ्याने प्रेम माझे राहू दे
> आचरू ये धर्म तूझा आणि मी माझा मुदे

अशा शब्दांत ही भावना वारंवार व्यक्त झालेली दिसते.

स्त्रीचित्रणात माधव जूलियनांनी वास्तवता आणली. त्यांनी स्त्रीचे रूप, तिचे विभ्रम, तिच्या नसानसात सळसळणारे चैतन्य यांची अत्यंत जिवंत सूक्ष्म रसिकतेने रेखाटलेली प्रत्ययकारी चित्रे अनेकदा रेखाटली आहेत.

मात्र एकीकडे स्त्रीशरीराची, तिच्या रूपविभ्रमांची अत्यंत तीव्र संवेदनातून निर्माण झालेली जाणीव आणि दुसरीकडे त्याच शरीराबद्दलचे भय या द्वंद्वामुळे माधव जूलियनांच्या अनेक कवितांत एक प्रकारचा आंतरिक ताणही जाणवतो. रविकिरण मंडळाच्या कवितांचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे त्यांच्या काव्यातली प्रेमभावना अनेकदा सामाजिक सुधारणावादाशी निगडित होऊन येते. ‘ विरहतरंगा ’ची नायिका इंदू आणि गिरीशांच्या ‘ अभागी कमल ’ मधली कमल या विधवा आहेत. ‘ विधवा रागिणी ’-सारखी माधव जूलियनांची कविता याच विषयातून स्फुरलेली आहे. रविकिरण मंडळातच आधुनिक जाणिवांनी प्रेरित झालेली, स्त्रीस्वातंत्र्याचा निर्भय पुरस्कार करणारी आणि स्त्रीपुरुषसमतेचे सातत्याने समर्थन करणारी मनोरमा रानडे यांसारखी कवयित्री होऊन गेली. स्त्रीने मुक्तपणे व निःसंकोच वृत्तीने आत्मनिष्ठ भूमिकेतून आपली प्रीतिभावना वर्णन करावी, याचा प्रारंभ इथे झालेला दिसतो. नव्याने सुशिक्षित झालेल्या स्वातंत्र्याचे मोकळे वारे प्रथम अनुभवणाऱ्या, क्रीडाप्रेमी, भाषणचतुर, रसिक आणि रूपसौंदर्याबरोबर आपल्या बुद्धिसौंदर्यानेही पुरुषाला प्रभावित करणाऱ्या स्त्रीची अत्यंत मनोज्ञ चित्रे रविकिरण मंडळातल्या कवींनी रंगवली.

उर्दूच्या घनिष्ठ परिचयाने मराठीत माधवरावांनी गझल हे नवे वृत्त आणले. प्रेयसीला ‘ न्यायासनीची देवता ’ मानून तिच्यापुढे प्रणयाराधन करणे आणि इष्काच्या धुंदीत आयुष्य झोकून देणे, तिने ठोकरल्यावर हृदयाच्या जळत्या जखमा सांभाळत-तो ‘ दर्द ’ही प्रेमाचा प्रसाद म्हणत झेलणे या उर्दूतल्या प्रेमरीतीशी मराठी कवितेचा परिचय झाला. त्याच्या खुणा कवितेच्या रचनेत आणि शब्दकळेत दिसल्या, तरी त्यात आशयाची धुंदी आणि बेहोषी आजवरच्या मराठी कवितापरंपरेत नसल्यामुळे सहज मुरून जाणारी नव्हती. गझलांची नवी लाट येईपर्यंत—अगदी अलीकडच्या दहा वर्षांपर्यंत तरी आशयाचे हे अंग गझल-तंत्राने प्रभावी केल्याचे दिसत नाही.

ॐ

तो धागा अगदी वेगळ्या पद्धतीने परंपरेतूनच उचलला बा. भ. बोरकरानी. त्यांनी तांब्यांची गायकी शिरोधार्य मानून सुरवातीच्या काळात आपली वाट शोधली. संत-कवींच्या रचना लहानपणापासून कानामनांत मुरल्या आणि लौकिक-अलौकिकाची सांगड घालण्याची संतशैली त्यांना आपलीशी झाली. परंपरेतून चालत आलेल्या प्रेमाविष्काराचे समृद्ध संदर्भ जेवढे बोरकरी प्रेमकविता मिरवते, तेवढे दुसरी कोणतीच कविता नाही. समृद्ध निसर्ग आणि गोव्यातल्या संस्कृतीतले स्त्रीपुरुषप्रेमाचे मोकळेपण या दोहोंच्या योगाने बोरकरांची प्रणयभावना कोणत्याही अटकावाशिवाय रसरशीत शारीर अंगाने

मोहरली. देहमीलनाची धुंदी बोरकरांनी अगदी मुक्तपणे आणि सूक्ष्मपणे प्रकट केली आहे; पण त्याचबरोबर या देहमीलनातून मनांच्या मिळणीकडे जाण्याची एक सततची ओढही त्यांच्या कवितेत दिसते.

भुले जो केवळ देहसुखा
स्पर्शे का तो शकेल उजळू हृदयातिल अलका ?

ह्या प्रश्नाचे पडसाद त्यांच्या प्रेमवृत्तीच्या घुमटात सतत उमटताना दिसतात.

पोटातुन गंध सुटे ओठांतुन ध्वनि उमटे
तेजाने मन विनटे निटिलि फुले दीपकळी

असा रसमधुर तेजस्वी शृंगार बोरकरांनी परोपरीने वर्णन केला. देहाच्या मातीचे सगळे धर्म त्यांना प्रिय होते, पण त्या मातीच्या घटात प्रेम एक दिव्य ज्योत लावू शकते, यावर त्यांचा विश्वास होता. त्या विश्वासाची विविध रूपे त्यांच्या प्रेमकवितेत बहारीने प्रकटली आहेत. जवळपणाची फार हृद्य चित्रे त्यांच्या काही कवितांमधून उमटली आहेत. लौकिकाला लागलेली अलौकिकाची ओढ त्यांच्या प्रेमकल्पनेच्या गाभ्याशी आहे आणि त्यामुळे शारीर सुखाच्या सगळ्या तपशिलांना एक वेगळीच झळाळी चढली आहे. गडकऱ्यांची प्रेमाची बेहोषी अगदी वेगळीच जन्मून पुन्हा बोरकरांमध्ये प्रकटली; ती अशा वैभवाने की, उर्दू गझलांमधून मराठीत यायला कचरणाऱ्या त्या उन्मनीपणाने लाजून मागे सरावे. गडकऱ्यांचा प्रीति-भक्ति मुक्तीचा प्रेमयोग बोरकरांनी आत्मीय केला आणि त्याला संतकवितेसारखी एक तेजाची आभा दिली, तरी त्यातल्या शारीर सौंदर्याचे अंग कुठेही डागाळू दिले नाही; त्याचा रसरशीतपणा कुठेही उणावू दिला नाही.

ना. घं. ची प्रेमकविता आणखीच निराळी. अंगभूत लयीने धुंदावलेली. तिने प्रेमाच्या राज्यात गावशिवारांचा गंध आणला. ग्रामीण वातावरणातले, किशोरवयीन अकृत्रिम प्रेम ना. घं. नी चित्रित केले– बोरकरांसारख्याच, आशयाशी एकजीव शब्द-कळेने चित्रित केले. धीट आणि मोकळे प्रेम करणारा त्यांचा थोडा रंगेल प्रेमिक आणि रानवाऱ्यासारखी ओढाळ प्रेयसी यांचा शृंगार मराठी कवितेत अपूर्वाईचा आहे. ना. घं.-नी विपुल प्रेमकविता लिहिली. प्रेमाच्या गाभ्याला झिणझिणत राहणारी ही कविता. प्रेमा-तली ओढ, मोकळे ताजेपण आणि सौंदर्य यांच्या किती तरी बारकाव्यांनी ती नटली आहे.

आपल्याजवळ रंगरूप नसतानाही प्रियकराला आपण कसे आवडलो, याचे नवल कर-णारी किंवा एका प्रेमापोटी प्रियकराचा सगळा त्रास सोसणारी ना. घं. ची प्रेयसी आणि

आज तुझ्याविषयीचे गाणे,
अनुचित झाले आहे सजणे
हृदय अनावर हे नाही तर मी म्हटले नसते, सखे ग ऽ

अशी ऊर भरून प्रेमाची कबुली देणारा प्रियकर यांनी हृदयजुळणीच्या फार मनोज्ञ कळा उलगडून दाखवल्या आहेत.

अनिलांची प्रेमकविता काव्यगत प्रेमसंकल्पनेचा पुढचा टप्पा गाठते. प्रेमकल्पनेचा सूक्ष्म आणि निश्चित विकास अनिलांच्या कवितेने केला. रविकिरण मंडळाच्या कवितांमध्ये अनेकदा आढळणारा शब्दबंबाळपणा, वरवरपणा अनिलांनी दूर केला आणि साध्या पण खोल अशा शैलीत आपली प्रतीतिवादी कविता लिहिण्यास प्रारंभ केला.

जुन्या कवींच्या शृंगारापासून दूर जाऊन हृदयाच्या समरसतेकडे प्रेमसंकल्पनेची जी वाटचाल मराठी कवितेतून होत होती, तिला अनिलांनी महत्त्वपूर्ण हातभार लावला. अतिशय सूक्ष्म तपशिलांनी आणि नितळ शैलीतून त्यांनी ही मानस स्थित्यंतराची प्रक्रिया आपल्या कवितेत घडवली आहे. अपयशात, आनंदात, उदासीनतेतही हृदयांचा एकवटलेपणा अभंग ठेवताना होणाऱ्या मनाच्या विविध अवस्था आणि तो एकवटलेपणा अभंग राहिल्यामुळे जिवाला मिळणारा दिलासा, शांती—यांची निर्मळ प्रतिबिंबे अनिलांच्या कवितेत दिसतात.

शिवाय परस्परसहवासातली ही सुखदुःखेही शेवटी समष्टीच्या सुखदुःखाशी जोडलेली असतात. ती तशी जोडलेली आहेत, हे उमगणे आणि स्वीकारणे— हा प्रेमसंकल्पनेचा विकासच आहे. अनिलांनी तो एकाग्रपणे साधला.

प्रीत तुझी माझी नाही निराळेपणाची
जगातल्या सुखदुःखी मिळालेपणाची,

ही भावना प्रेमसंकल्पनेच्या संदर्भात निश्चितपणे विकासाच्या पुढच्या टप्प्यावरची आहे. समाज हा प्रेमविरोधी आहे, अशाच अनुभवांचा उच्चार आजपर्यंतच्या कवितेत सतत होत आला. अनिलांनी व्यक्तीचे समाजाशी असलेले बंध आणि मानवतेच्या छत्राखाली त्यांनी सहज साधावयाची हृदयाची जोड यांचे भान व्यक्त केले.

कुसुमाग्रजांच्या कवितेने सामाजिकतेचे असे भान आणखी वेगळ्या अंगाने व्यक्त केले. विशुद्ध प्रेमाच्या उपासनेसाठी आडकाठी होते, ती नेहमी समाजाचीच असते, असे नाही, तर व्यक्ती म्हणून तुमची वैयक्तिक आणि सामाजिक अशी जी जबाबदारी असते, जी कर्तव्ये असतात, त्यांचा प्रेमभावनेशी संघर्ष अटळ आहे. प्रेम आणि कर्तव्य यांचे असे द्वंद्व कुसुमाग्रजांच्या कवितेत प्रकर्षाने आढळते. मुळातच नाट्यात्म अशा त्यांच्या प्रतिभेला हा संघर्ष आव्हानकारक वाटला.

नवतीचा तव गंध असा जर रेंगाळत राहिला
हाहि इशारा व्यर्थ, बांधतिल माझ्या मज शृंखला

किंवा—

स्वप्नांची किमया सरे, क्रमित मी मार्गास जागेपणी
का येऊन पुनः पुन्हा वितरसी हे मोह जे मोह ना

असा त्यांचा प्रेमिक प्रणयिनीला या द्वंद्वाची जाणीवही देताना आढळतो. या द्वंद्वाची अतिशय नाट्यात्म आणि प्रभावी चित्रे कुसुमाग्रजांच्या कवितेत उमटली आहेत.

प्रेमाच्या क्षणभंगुरतेची जाणीवही त्यांच्या प्रेमकल्पनेला झालेली आहे. क्षणकाल येऊन हे प्रेम आयुष्याला दिव्य धुंदीचा स्पर्श करून जाते आणि त्याने आयुष्याची वाटचाल कधी दुःसह होते, तर कधी तेवढ्याच स्मृतीच्या बळावर सुकरही होते. उभे मानवी जीवनच जर अशाश्वत आहे, तर प्रीती चिरंजीविनी कशी असणार ?

माझ्या प्रीतित दिव्यता न असली ती मानवी सर्वथा
आहे ती तुझियावरी नि रमते ती वर्तमानामधे

असे सांगून ते आपल्या प्रेयसीला विचारतात :

आहे एकचि सत्य, तेहि तुजला व्हावे दिलासा न का
चाले जो क्षण त्यावरी विहरते गे नाममुद्रा तुझी !

पण कुसुमाग्रजांनी प्रेमाचे सौंदर्य मात्र– त्याची क्षणभंगुरता जाणूनही– दुःखार्त केले नाही; उलट त्यातले सगळे कोवळे भाव मनःपूर्वक टिपले. अगदी शुद्ध कामवासनेपासून सगळ्या ओढी त्यांनी निखळपणे व्यक्त केल्या.

कुसुमाग्रजांच्या प्रतिभेला असलेले भव्यदिव्याचे वेड त्यांच्या प्रेमसंकल्पनेच्या संदर्भातही स्पष्ट दिसते. ' बाजीराव ', ' पृथ्वीचे प्रेमगीत ' किंवा ' येशिल का आज दुपारी '- यांसारख्या कविता त्याचे उदाहरण आहेत. ' शरमेत कोंदली प्रीती, शंकेत भावना सारी ' हा कोंडमारा असह्य होऊन, रात्रीच्या अंधाराऐवजी दुपारच्या लखलखीत उजेडात प्रीतीने वावरावे म्हणून तळमळणारी, जीवनाला सर्वदूर व्यापणारी शक्ती म्हणून प्रत्ययाला येणारी, आग, वादळ, दुःख यांचा स्वाभाविक स्वीकार करणारी त्यांची प्रेमभावना मराठी प्रेमकवितेत आपला अलग ठसा उमटवणारी आहे.

ऽ

केशवसुतांनंतरची मराठी प्रेमकविता आता मर्ढेकरांपर्यंत येऊन पोचते. प्रेमसंकल्पनेला माणसांच्या जगात आणले ते केशवसुतांनी ! अशरीरी प्रेमाचे अस्वाभाविक वळण पार करून केशवसुतांनंतरची प्रेमकविता हाडामांसाच्या माणसांच्या प्रकृतिविकृतींशी अधिक नाते सांगू लागली. मर्ढेकरांनी जीवनातल्या अशाश्वताचे आणि दुःखदैन्याचे भान प्रेमाला तीव्रपणे आणून दिले. प्रेमावरची सगळी रोमँटिक आवरणे त्यांनी अत्यंत निर्ममपणे दूर केली. ज्या शारीर सौंदर्याचे गोडवे कवी वर्षानुवर्षे गात आले, त्याचे वर्णन—

हाडबंडले अशा बायका,... विणीत बसल्या चिमणे जीवन

अशा भेदक शब्दांत केले गेले. महायुद्धोत्तर जीवनाने मानवी मूल्यांबाबत जसे प्रश्न निर्माण केले, तसा मानवी भावनांबाबतही नव्या दृष्टिकोनाला जन्म दिला. जीवनाच्या प्रखर संघर्षात माणसाला मूल्य काय, अशा मूलभूत स्वरूपाच्या प्रश्नानेच एवढे उग्र स्वरूप धारण केले होते की, प्रेम, माया यांसारख्या मानवी भावना तिथे दुय्यम होत गेल्या. मर्ढेकरांच्या, ' शिशिरागमा 'तल्या कवितांमध्ये प्रेमाचा जो हळवा, मृदू सूर

आढळतो, तो पुढच्या कवितांमधून अगदी क्वचित् ऐकायला मिळतो, याचे हेही एक कारण आहे.

अर्थात् प्रेम ही माणसाच्या आयुष्यातली एक जपण्याजोगी, मूल्यवान भावना आहे, हे मर्ढेकरांनी नाकारले नाही. उलट त्या प्रेमाला—सौंदर्याला लाडाने जपण्यासारखी परिस्थितीच माणसासाठी उरली नाही, याची एक तीव्र खंत त्यांना जाणवते.

प्रेमाचे लव्हाळे सौंदर्य नव्हाळे
शोधू ?– आसपास मुडद्यांची रास

असे उद्‌गार त्या खंतीपोटीच निघतात. पूर्वकवींनी परोपरीने वर्णन केलेल्या शृंगाराचे रंग मर्ढेकरांच्या भोवती त्यांना कसे खुणावणार ? अगदी विपरीत मानवी जीवनाचे दर्शन त्यांना होत होते. म्हणून कामवासनेलाही रंग नव्हता. ‘ जागा आहे तरी आता मेल्या इच्छा सावकाश ’ अशा रात्रीचे दर्शन किंवा ‘ केसांचे वळ गालावर, ढिल्या बोटांचे तळ स्तनांवर ’ अशा दयनीय शृंगाराचे वर्णन या प्रेमकवितेने विदारकपणे केले ‘ काय हलाखी स्त्रीत्वाची ही, माणुसकीचे काय विडंबन ! ’ या प्रत्ययाने अस्वस्थ झालेली मर्ढेकरांची कविता प्रेमाला वास्तवाचे असे एक उग्रकठोर दर्शन घडवत गेली की, त्यातली सगळी मंगलता, दिव्यता आणि अद्‌भुतता नष्ट व्हावी.

आणि तरीही या सनातन भावनेचा आदर त्यांच्या लेखी माणसाने आयुष्यात केव्हा तरी सुंदरपणे— त्याच्या वितीच्या आयुष्यातले सगळे कडू गोड पणाला लावून केलेला असतो– करायचा असतो :

येशिल तेव्हा जपून ये तू
कारण माझ्या ठिसुळ बरगड्या

या प्रत्ययाने आलिंगन-चुंबनातली सगळी प्रणयरम्यता नष्ट होत असली, तरी त्याआधी कधी तरी हृदयातील प्रेमाच्या उदयाने मनोभाव पालवण्याचा एक ताजा क्षण येतोच. ‘ दवात आलिस ’ किंवा ‘ अभ्ररम्य पश्मिनी मोकळ्या... ’ यांसारख्या कविता अगदी मोजक्याच आहेत, पण धीरगंभीर संघर्षरत माणसाच्या मनातला हळवा कोपरा कधी अचानक क्षणभर दिसावा, तसे त्यांचे रूप मनाला चकित करणारे सुख देऊन जाते.

मर्ढेकरांना स्त्रीचे रूप सर्वांत सुंदर दिसले ते तिच्या गर्भारपणात ! मानवी जीवनाचे सातत्य राखण्याची तिची क्षमता आणि सर्जनापूर्वीची तिची भरलेली अवस्था यांचा आनंद व्यक्त करणाऱ्या दोन प्रसन्न कविता मर्ढेकरांनी लिहिल्या आहेत : ‘ पोरसवदा होतीस— ’ आणि ‘ बाळगुनी हा पोटी इवला— ’ या दोन्ही कवितांचे सौंदर्य केवळ अपूर्व असेच आहे.

महायुद्धाने जीवनाच्या सगळ्याच क्षेत्रांत लक्षणीय क्रांती केली. जगण्याचा रोखच बदलला. माणसाचे आयुष्य क्षणभंगुर आहे, याची कधी नव्हे इतकी जबरदस्त जाणीव

झाली. जीवनातला जगण्यासाठीचा, अस्तित्वासाठीचा झगडा तीव्र झाला. तसे मग शाश्वत असे काय आहे ? कशाला धरून ठेवायचे ? कोणाचा दिलासा मिळणार ?– याचा नव्याने शोध घेतला गेला. श्रद्धेसारखाच हा प्रेमाच्याही कसोटीचा काळ आला. पण प्रेम तरले. चोख उरले. झाले एवढेच की, ते पूर्ण माणसाचे, माणसासाठी, माणसामधून आले. माणसाच्या सगळ्या गुणदोषांमध्ये मिसळून-हिसळून आले. माणसाला जे भोगावे लागते, त्यापासून त्याला दूर उंच कुठे तरी रहाता आले नाही. ते सगळे भोगणे त्याचेही झाले. त्याच्यातले रहस्य, त्याच्यातली अद्‌भुतता, अतार्किकता, गूढता नष्ट झाली नाही; पण तिचे स्वरूप मात्र जराही पूर्वीचे राहिले नाही. माणसाच्या मनाचा शोध घेणाऱ्या मानसशास्त्रज्ञांनी प्रेमाचाही शोध घेतला. कुणी त्याची मुळे Sex मध्ये शोधली, तर कुणी स्त्री-पुरुषांच्या आदिबंधामध्ये. या योगे प्रेमातल्या गूढतेचे आणि अद्‌भुतरम्यतेचे पूर्वी होते ते वलय फिटले. ती अंतराळातली दिव्य ज्योती न रहाता मनाच्या मातीतली एक शास्त्रचर्चित घटना झाली. तरीही शास्त्रज्ञांच्या विश्लेषणानंतरही जे स्पष्टीकरणा-पलीकडचे मनोभावांचे खेळ कायम उरले, त्यांत ही अद्‌भुतता उरलीच, पण ही नक्कीच पूर्वीची नव्हती. कारण माणसाला त्याचे जीवन ज्या तऱ्हेने चिरपरिचित, तरीही नित्य नव्या कळेने भेटणारे असते, तसेच या प्रेमभावनेचे स्वरूप बनले.

जीवनाशी ही भावना इतक्या दृढपणे बद्ध झाल्यामुळे आणि तिची सर्व मानवजाती-इतकी व्यापकता लक्षात आल्यामुळे स्त्री-पुरुष-आकर्षण ही नव्याने तरफदारी करावी, अशी गोष्ट उरली नाही. तिच्यासाठी भांडावे, सामाजिक नीतीविरुद्ध काही केल्याचा अपराधी भाव बाळगावा किंवा संकोचाने ते लपवावे, याला कारण उरले नाही. प्रेमाचे तत्त्वज्ञान सांगणाऱ्या कविता मर्ढेकरपूर्व काळात जशा वारंवार आढळतात, तशा मर्ढे-करोत्तर काळात आढळत नाहीत, हे लक्षणीय आहे. आता स्त्री-पुरुषांमधली ओढ, आकर्षण ही स्वाभाविक गोष्ट म्हणून स्वीकारली गेली. क्वचित् ‘ पुनर्निर्मितीसाठी इतर प्राण्यांसारखेच नैसर्गिक ओढीने जवळ येणे ’ अशा अगदी जैविक (biological) पातळीवर प्रेमाला आणून, त्यातला भावनेचा भाग पूर्ण नाकारलाही गेला.

पण ते क्वचितच. एरवी प्रेम हाडामांसाइतके सत्य आणि स्वाभाविक झाले, ही मात्र महत्त्वाची प्रक्रिया. अर्थात् मानवाला जशी, ज्या अर्थाने ‘ अलौकिका ’ची ओढ असते–आहे, त्या अर्थाने प्रेमालाही मानवी जीवनाला एक सुंदर अर्थ प्राप्त करून देण्याची ओढ–तहान उरली. देहातून देहापलीकडचे काही मिळवण्याची इच्छा उरली.

या इच्छेचे परंपरासमृद्ध रूप पु. शि. रेग्यांच्या कवितेत दिसते. रेग्यांची सगळी कविता प्रामुख्याने स्त्रीच्या आत्मतत्त्वाचा शोध घेणारी आहे. त्यांनी सर्वंध आपेलाच एक भोगते-भोगविते रूप प्राप्त करून दिले आणि त्या द्वारा दिला स्त्रीशरीराचा आणि प्रेमाचा एक उत्कट अनुभव. या प्रयत्नांत त्यांची सांकेतिकतेकडून नवतेकडे झालेली वाटचाल अतिशय अर्थपूर्ण रीतीने आपल्याला प्रत्ययास येते.

रेग्यांच्या प्रेमकवितेत त्यांचा कामभाव अगदी तीव्रपणे प्रकट झाला आहे. अतिशय निकोप, अत्यंत ओढाळ असा हा कामभाव स्त्रीदेहाविषयी अखंड कुतूहल बाळगणारा आहे. स्त्रीदेहाचे पुरुषमनाला असलेले आकर्षण अशा तीव्रतेने, अशा विविधतेने आणि अशा निर्मळ कुतूहलाने मराठी प्रेमकवितेत इतर कुठेही प्रकटलेले नाही.

'पुष्कळ पुष्कळ अंग तुझं पुष्कळ पुष्कळ मन' या त्यांच्या उद्‌गाराप्रमाणे स्त्रीच्या मनाचा नि अंगाचा अपारपणा त्यांनी अखंड शोधला. स्त्रीशक्तीचा शोध हाच त्यांच्या कवितेचा आणि कथा-कादंबऱ्यांचा विषय बनला. परंपरेतले स्त्रीचे प्रकटीकरण ह्या शोधामागे दिव्यासारखे उभे राहिले आणि त्याच्या प्रकाशात रेग्यांच्या कवितेतली स्त्री-प्रतिमा उजळून निघाली.

रेग्यांच्या कवितेतून जी स्त्रीप्रतिमा दिसते, ती वैयक्तिक अनुभवांच्या लिताळ्यातली नव्हे. ती बव्हंशी सार्वत्रिक, सार्वकालिक आहे. सनातन स्त्रीत्वाचेच प्रकटीकरण घडवणारी आहे. त्यांची शहनाज, उर्वशी, मस्तानी वा बदामीच्या लेण्यातली शिल्पित सहेलीही 'सनातन स्त्री' आहे. कधी कठोर, निर्मम, तर कधी तीच विलक्षण वेल्हाळ, मायाळू! कधी उग्र प्रलयंकर, तर कधी सुकुमार, नवसर्जनाला सिद्ध! युंगने ज्याला Anima Archetype म्हटले, तो स्त्रीत्वाचा आदिबंध, ज्यात आयुष्यात कराव्या लागणाऱ्या सर्व भूमिकांसहचे स्त्रीत्व सनातनपणे सामावले आहे, त्या आदिबंधाचा शोध म्हणजे रेग्यांची प्रेमकविता! सर्जनाबद्दलचे अपार कुतूहल आणि स्त्रीच्या जीवनदायी सामर्थ्याचे भान यांची पुरुषमनाला असलेली चिरंतन ओढ आणि त्यातून त्याचा घडणारा आंतरिक विकास यामुळे रेग्यांची प्रेमकविता मराठी कवितेतून प्रकटणाऱ्या प्रेमसंकल्पनेचे एक सर्वस्वी निराळे अंग बनून राहिली आहे.

मुक्तिबोधांच्या कवितेचे लक्ष्य वेगळे, उमाळा वेगळा. प्रखर समाजवादाने उजळून निघालेली ही कविता मराठीतली अत्यंत सकस, जीवनोत्सुक, कणखर कविता आहे. जीवनाचा क्षोभ आवरू न शकणाऱ्या या कवितेने प्रेम कसे आपले म्हटले, ते पहाण्यासारखे आहे.

> माझी सर्वांवरी प्रीत माझा सर्वांवरी लोभ
> परी तो ना बांधू शके अशा जीवनाचा क्षोभ

असे सांगून उरीची कोमल बंधने दूर करीत, प्रीतीची पुण्याई पिऊन हा कवीचा जीवनलोट पुढे धावतो अन् विश्वसुंदरीचे तमपटाआडचे रूप उघड करतो. गौतम बुद्धासारखा हा सततप्रवासी प्रेयसीला मध्यरात्रीच्या झोपेत सोडून जाण्याची भाषा बोलतानाही 'आज तुला मी, मला तूच गे' अशी प्रीतीची एकात्मता अनुभवतो. गत-स्मृतींनी जिवाला लावलेली हुरहूर वातावरणाच्या रसायनात कशी ठिबकत राहते, याचा वेध त्यांच्या किती तरी कवितांमधून जसा त्यांनी घेतला आहे, तसा आत्ताच्या संघर्षा-नंतर उद्या पुन्हा प्रीतीला सुखाची पहाट दिसेल, असा आशावादही व्यक्त केला आहे.

धडपड, त्यातली अक्षमता व असहायता यांची अतिशय भेदक चित्रे या कवींच्या कवितांतून उमटली आहेत. या साऱ्यांवर मृत्यूची छाया व नियतीचा करडा पहारा आहे. त्यातून प्रत्ययाला येते ते केवळ एकाकीपण. हे एकाकीपण या कवींच्या प्रेम-कवितांमधून विशेष तीव्रतेने अधोरेखित झालेले दिसते.

माणसाचे मूलभूत एकाकीपण ही जाणीव अलिकडची नाही. एकाकीपणाची, दुरा-वलेपणाची, तुटलेपणाची ही संकल्पना नव्याने आपणांकडे आलेली असली, तरी संवे-दनाक्षम, विचारी आणि चिंतनशील माणसाला फार पूर्वीच्या काळापासून ते जाणवत आलेले आहे. त्याबरोबरच माणसाची मर्त्यता, एकूण जीवनाची अर्थशून्यता, माणसाच्या साऱ्या धडपडीला मिळालेला वैफल्याचा शाप– या गोष्टीही सनातन आहेत. ज्ञानदेव-रामदासांसारखे संतही जीवनाची दुःखमयता आणि जीवांचे एकटेपण यांचा प्रभावी उच्चार करून गेले आहेत.

प्रेमाच्या पाशासाठी जीवमात्राची चाललेली धडपड आणि त्या पाशाविना त्याला येणारी मृतप्राय जडता यांचे चित्र केशवसुतांपासून अनेकांनी काढलेले आपणांस दिसून येते. आत्यंतिक निकटता आणि तिथेही न संपणारे एकाकीपण यांची जास्तीत जास्त भेदक जाणीव स्त्रीपुरुषसंबंधातच होणार. मर्ढेकरांच्या कवितेतही ही जाणीव स्त्री-पुरुषसंबंधाबाबतच प्रकटली आहे.

आणि हीच जाणीव पुढल्या अनेक कवींच्या प्रेमकवितांमध्ये अधिक प्रखर होऊन आलेली दिसते. दिलीप चित्रे यांच्या कवितेत ' न इथे कुठे न तिथे कुठे न जलाशया-तहि सावली ' किंवा ' गळतो अनामिक बहर गे हा आपुल्या हातांमधे ' यांसारख्या ओळींमध्ये हा दुरावा आहे. आरती प्रभूंच्या काव्यात शहरीं कार्यमग्न जीवनामध्ये प्रत्यक्ष पत्नीच्या सहवाससुखाचा आनंद घेता येत नाही, ही जाणीव अनेकदा व्यक्त झाली आहे.

सेवेकरी मुद्रा असो नये बाशी
पहाटेस नेमे कातरावी मिशी
फाइलीची फीत रक्ताहून लाल
बाईलेची प्रीत सेकंदाशी तोल

असे म्हणणारे आरती प्रभू यंत्रयुगीन शहरी संस्कृतीत माणसाच्या वाट्याला आलेले हे एकाकीपणच सांगत असतात. ' रेताच्या प्रत्येक थेंबात एका प्रेताचा जन्म असतो,' अशासारख्या त्यांच्या ओळींत कामवासनेचे एक भयाण पर्यवसान दाखवून दिलेले आढळते. डहाके, धुरी यांच्या कवितांत हा दुरावा वारंवार आणि अत्यंत प्रखरपणे प्रकट होताना दिसतो. ' तुझे हे हात माझे झाले, तरी हे एकाकीपण का संपत नाही ? ' असा भेदक प्रश्न डहाके एके ठिकाणी विचारतात. गणोरकर यांच्या कवितेतही माणसा-माणसांतल्या या अ-संबंधांचे, एकूण मानवी जीवनाच्या संदर्भरहिततेचे आणि

अर्थशून्यतेचे चित्रण वारंवार येते.

या कवितांमधून स्त्रीकडे बघण्याची दृष्टी पुन्हा एकवार बदललेली दिसते. इथे स्त्री ही कामसखी किंवा प्रेमसखी नाही. जिच्यापाशी आपली सारी दुःखे निरवून निश्चिंत व्हावे, असा तो जीवनाचा एक महत्त्वाचा आधारही नाही. ती फक्त एक माणूस असते आणि माणसाची सारी अगतिकता तिच्या ठायीही आढळून येते. या कवितांतले स्त्री-पुरुषसंबंध हे दोन माणसांमाणसांतले संबंध असतात व ते संबंध जोडणेही अवघड असते. दोन एकाकी, दुःखी माणसांनी एकमेकांचा आधार शोधू जावे आणि तोही त्यांना मिळू नये, मिळाल्यास फार काळ टिकू नये, अशी ही मानवी संबंधांचीच शोकान्तिका आहे. त्यातून येणारी विषण्णता या कवितांतून सर्वत्र आढळते यामुळे या कवितांचे स्वरूपच पालटलेले दिसते. रूढ अर्थाने यांना प्रेमकविताही म्हणता येईल की नाही, याची शका वाटते. कारण प्रेमातली शारीरिक निकटता, त्या निकटतेतून होणारे दोन मनांचे, दोन आत्म्यांचे मीलन आणि त्या मीलनातून शेवटी सर्व समाजाशी, किंबहुना सर्व विश्वाशी एकात्मता साधता येते हा अनुभव, हे काहीच या नंतरच्या प्रेम-कवितांत आढळत नाही. 'विरले उभयांतील ब्रघ्र अंतर । तू आणिक मी जवळ निरंतर' हा गाढ विश्रब्धतेचा भाव इथे नाही. 'तुझी माझी प्रीत नाही निराळेपणाची। जगातल्या सुखदुःखी मिळालेपणाची' ही सामाजिक स्तरावरून होणारी विश्वैक्याची तृप्तीही इथे नाही. अफाट अंतराळातून फिरणारे दोन ग्रह आपापल्या एकाकी पथावरून भ्रमण करीत असावेत; एखाद्या क्षणासाठी ते एकमेकांजवळ यावेत आणि एकमेकांच्या संगतीत धीर, आधार, स्नेहभाव शोधत असतानाच ते पुन्हा एकदा परस्परापासून दूर फेकले जावेत, असे काहीसे या प्रेमकवितांतील स्त्रीपुरुषसंबंधाचे स्वरूप आहे. त्या कवितांत गाढ विश्वास, आधाराची जाणीव, मनोमीलनाचा उल्हास या कशाचाच आढळ होत नाही. एकूण मानवी भावसंबंधांतली अशाश्वती, तुटलेपण आणि माणसाच्या वाट्याला आलेले, सिंदबादला भेटलेल्या कुबड्याप्रमाणे त्याला घट्ट पकडून ठेवणारे अपार एकाकीपण यांचीच इथे पुन्हा पुन्हा जाणीव होत रहाते.

आतापर्यंतच्या विवेचनात मराठी प्रेमकाव्यामध्ये ज्यांचे कर्तृत्व विशेष लक्षणीय आहे, ही प्रेमकविता वेगवेगळ्या अंगांनी समृद्ध करण्यास ज्यांनी महत्त्वाचा हातभार लावला आहे, त्या कवींच्या काव्याचा अपरिहार्यपणे थोडा तपशिलात विचार केला आहे. तरीही या कवींबद्दल लिहितानासुद्धा विशेष भर हा मराठी प्रेमकवितेतील बदलत जाणाऱ्या आणि विकास पावणाऱ्या प्रवृत्तींवर दिलेला आहे. मूळ संकलनाचा उद्देशही तोच आहे. त्यामुळे आणि विषयाच्या एकूण व्यापामुळे काही कवींवर कदाचित् थोडे लिहिले गेले असेल; काहींचा केवळ नामनिर्देश झाला असेल, तर काही कवींचा उल्लेखही करणे शक्य झाले नसेल. तथापि, यात कुणाचा अवमान करावा किंवा कुणाचे महत्त्व नाकारावे, अशी भूमिका मुळीच घेतलेली नाही. वेगवेगळ्या काल-

खंडातले प्रमुख व महत्त्वाचे कवी इथे आहेतच. पण केवळ त्यांनीच मराठी प्रेमकविता समृद्ध केली आहे, असे नाही. कवितेच्या प्रवाहाला दिशा देणारा किंवा तिचा मूळचा ओघ सर्वस्वी बदलून टाकणारा कवी जेव्हा आपले काव्य लिहीत असतो, त्या वेळी त्याच्या मार्गाने जाणारे व त्याने आणलेल्या नव्या प्रवृत्तींचा जोराने पुरस्कार करणारे इतर कवीही त्या काव्याला आपापल्या परींनी अधिक परिपुष्ट व समृद्ध करीत असतात. केशवसुतांनी मराठी कवितेला जे नवे वळण दिले, त्यातले विविध प्रवाह पुढे वेगवेगळ्या कवींच्या काव्यातून अधिक जाणीवपूर्वक आणि अधिक सूक्ष्मतेने परिपुष्ट होत गेले. मर्ढेकरांनी मराठी कविता पुन्हा एकदा अंतर्बाह्य बदलून टाकली. कवितेचा आशय, तिची भाषा, तिची प्रतिमासृष्टी —साऱ्यांतच त्यांनी क्रांतिकारक पालट घडवून आणला. नवकाव्याचा प्रारंभ झाला. पण हे नवकाव्य अधिक विकसित करण्यात शरच्चंद्र मुक्तिबोध, पु. शि. रेगे, विंदा करंदीकर, नारायण सुर्वे अशा कवींचा मोठा हातभार लागलेला आहे, हे नाकारता येणार नाही. हीच गोष्ट नंतरच्या काळातल्या कवितेबद्दलही खरी आहे. बोरकर-कुसुमाग्रजांची अभिजात कविता, ना. घ. देशपांडे-महानोर यांची निसर्गप्रतिमांतून साकार होणारी गेय कविता, चित्रे-डहाके-धुरी यांची संपूर्ण मानवी अस्तित्वाचाच अर्थ लावू बघणारी कविता हे वेगवेगळे प्रवाह या कालखंडातल्या काव्यात एकत्रितपणे नांदताना दिसतात.

८

अठराशे पंच्याऐंशी ते एकोणीसशे पंचाहत्तर या काळातल्या मराठी प्रेमकवितेचा प्रवास इथवर आपण पाहिला. या काळात ही प्रेमकविता उत्तरोत्तर समृद्ध होत गेली आहे. बदलत्या काळाबरोबर अनुभवाचे नवनवे अविष्कार तिच्यातून झाले आहेत. आणि वेगवेगळ्या कवींनी आपापली स्वतंत्र परिमाणेही तिला देऊन तिचे सौंदर्य वाढवले आहे. मर्ढेकरांनंतर एकूणच मराठी कविता फार मोठ्या परिवर्तनातून गेली. आशयापासून आविष्कारापर्यंत, शब्दकळेपासून प्रतिमासृष्टीपर्यंत तिच्यामध्ये अंतर्बाह्य बदल झाला. या बदलत्या जाणिवा आत्मसात् करून मराठी प्रेमकविता अधिक समर्थ झाली. जुन्या परंपरा, जुने छंद, रचनाबंध न सोडता त्यांना नवे रूप देणारे, त्यांत नवा आशय व चैतन्य भरणारे अनेक कवी या काळात दिसून येतात. मर्ढेकरांनी अभंग आणि ओवी या पारंपरिक छंदांत अनेक प्रेमकविता लिहिल्या. तांबे परंपरेचा वारसा घेऊन आणि गोमंतकीय निसर्गसौंदर्याची त्याला जोड देऊन बोरकरांसारख्या समर्थ कवीने आपली अभिनव प्रेमकविता लिहिली. एकीकडे जुन्या परंपरेशी तिचे नाते आहे, तर दुसरीकडे सुंदर निसर्गप्रतिमांनी आणि प्रेमाच्या ऐंद्रीय जाणिवांनी तिला निरुपम नावीन्य, ताजेपणा व टवटवी लाभली आहे. अनिलांसारखा कवी प्रतीतिवादी भूमिकेतून जवळ जवळ आध्यात्मिक पातळीवरचे प्रीतीचे अद्वैत आपल्या कवितांतून व्यक्त करतो. 'दशपदी' सारखा एक वेगळा रचनाबंधही निर्माण करून तो समर्थपणे

वापरतो. माधव जूलियनांनी फारशीमधून आणलेला गझल हा रचनाप्रकार सुरेश भट, पाडगावकर यांसारख्या कवींनी पुसरुज्जीवित केला, तर विंदा करंदीकर, आरती प्रभू यांनी गझल छंदात खास स्वतःची अशी वैशिष्ट्यपूर्ण काव्यनिर्मिती केली. सुनीत, कणिका, जीवनलहरी, रुबाया असे जुने रचनाप्रकार अगदी आजच्या कवींपर्यंत कायम वापरले जात आहेत, तर त्यांच्या जोडीलाच मुक्तच्छंद आणि मुक्त कविताही आपले स्वतःचे स्थान निर्माण करून मराठीत आता दृढमूल झाली आहे. माडगूळकर, वसंत बापट यांसारखे बहुरंगी आविष्कार करू शकणारे सिद्धहस्त आणि रचनाकुशल कवी लावणीसारख्या पारंपरिक व लोकप्रिय रचनांना आपला स्वतंत्र नव्या निर्मितीचा बाज किती ताकदीने देतात, हे पाहिले म्हणजे नव्याजुन्याच्या व्याख्याच आपल्याला बदला-व्याशा वाटतात. हीच गोष्ट ना. धों. महानोर यांच्यासारख्या कवीची. महानोरांनी खानदेशातील जुन्या पारंपरिक लोकछंदांत, ओव्यांत, लावण्यांत आपल्या सर्जनशील प्रतिभेचे रंग भरले, तर ग्रेससारख्या कवीने अत्यंत गूढ आणि अनाकलनीय अशा आपल्या संवेदनाविश्वाच्या अभिव्यक्तीसाठी पुन्हा एकदा जुन्या वृत्तबद्ध रचनेचा अवलंब केला आहे.

केवळ भाषाशैलीच्या दृष्टीने विचार केला, तरी या प्रेमकवितेत किती विविधता आढळते! माधव जूलियनांची फारसी, संस्कृत, देशी अशा एकमेळातून सिद्ध झालेली लोकविलक्षण पण अत्यंत वेधक भाषा, मर्ढेकरांची यंत्रयुगीन जीवनातून सिद्ध झालेली इंग्रजी-मराठी मिश्रित भाषा, पु. शि. रेगे यांची संतकाव्य, अभिजात संस्कृत काव्य आणि बोलीभाषा या सर्वांतून घडवलेली आणि पुन्हा खास त्यांच्या स्वतःच्या शब्दकळेने संस्कारित झालेली भाषा, बोरकर–कुसुमाग्रज यांची अभिजाततेशी नाते जोडणारी भाषा, नारायण सुर्वे यांची खास मुंबईच्या कामगार-विश्वातली भाषा, खास खानदेशी बोलीभाषेचा वारसा घेऊन आलेली महानोरांची भाषा—आजच्या मराठी प्रेमकवितेने भाषाशैलीचे किती वेगवेगळे प्रवाह स्वतःत मुरवून घेतले आहेत, हे पाहिले म्हणजे आश्चर्य वाटल्याखेरीज रहात नाही.

या प्रेमकवितेतली आविष्कारपद्धतीही हळूहळू पालटत गेली आहे. ‘ फुलराणी ’, ‘ प्रेम आणि मरण ’, ‘ संगमोत्सुक डोह ’ अशा रूपकांतून एके काळी प्रेमभावनांचा आविष्कार झालेला दिसतो. निसर्गाच्या पार्श्वभूमीवर रसरसून फुलणारी प्रेमकविता विपुल प्रमाणात लिहिली गेली. आणि नंतरच्या काळात निसर्गप्रतिमांतूनच प्रेमभावना आविष्कृत होऊ लागली. पु. शि. रेगे, इंदिरा, बोरकर यांच्या अनेक प्रेमकविता या निसर्गप्रतिमाच आहेत. इथे प्रेम आणि निसर्गप्रतिमा ही इतकी एकजीव एकरस झाली आहेत की, त्यांना एकमेकांपासून वेगळे काढणे अशक्य आहे. विंदा करंदीकर, दिलीप चित्रे, आरती प्रभू, ग्रेस यांनी तर अगदी वेगळी प्रतिमासृष्टी मराठी कवितेत निर्माण केली. मनाच्या अबोध पातळीवर, कधी अर्धजागृत, तर कधी स्वप्नमय अवस्थेत,

भावनेच्या धगीने मनाच्या मुशीत वितळणाऱ्या विकारांतून स्फटिकाप्रमाणे तयार होणारे विचित्र शब्दबंध अनाकलनीय प्रतिमा या कवींच्या काव्यामध्ये विपुलतेने आढळतात आणि कवितेच्या ठोस, सुस्पष्ट अर्थाबद्दलच्या आपल्या पूर्वस्वीकृत कल्पना व अपेक्षा यांचा त्या नव्याने विचार करायला लावतात.

याच काळाच्या अखेरीअखेरीस मराठी साहित्यात अस्तित्ववादी जाणीव आली. ही जाणीव नाटक-कादंबऱ्या-कथा यांच्यातल्याप्रमाणे कवितेतूनही व्यक्त झालेली दिसते. ही कविता आधीच्या सर्व परंपरांहून वेगळी, आपले एक स्वतंत्र विश्व निर्माण करणारी आणि आपले एक वेगळे तत्त्वज्ञान मांडणारी अशी आहे. माणसांमाणसांतले तुटलेले भावसंबंध, माणसाचे मूलभूत एकाकीपण, नियतीची अतर्क्यता, जीवनाची दुःखाधीनता आणि व्यर्थता या जाणिवांना या कवितेत महत्त्वाचे स्थान आहे.

अशा विविध जाणिवा, आविष्काराच्या वेगवेगळ्या परी, विचारांचे अनेक प्रवाह आणि जुन्यानव्या रचनासंबंधांची लवचिक स्वरूपे, भिन्न भिन्न प्रकारची भाषाशैली या साऱ्यांना स्वतःमध्ये मिसळून घेत, जुन्याचा आदर करीत आणि नव्याचा स्वागतशील स्वीकार करीत या कालखंडातली मराठी प्रेमकविता केवळ संख्येनेच भरदार झाली आहे असे नाही, तर आशयानेही ती समृद्ध व सकस बनली आहे. याच प्रेमकवितेला— इतकेच नव्हे तर एकूणच मराठी कवितेला— एकोणीसशे पंचाहत्तर सालानंतर पुन्हा अनेक धुमारे फुटले. नव्या दमाचे अनेक कवी लक्ष्यवेधी कविता लिहू लागले. समकालीन वास्तवाचे प्रखर भान तिच्यात प्रकट झाले आणि स्त्रीपुरुष-संबंधांची जाणीवही अधिक सूक्ष्म, समंजस, विस्तृत बनली. पण तो पुन्हा पुढच्या टप्प्यावरचा विचार आहे आणि तो खरोखरी एका नव्या संकलनाचाही विषय आहे.

—संपादिका

# कृतज्ञता

मराठी प्रेमकवितांचे हे प्रातिनिधिक संकलन प्रकाशित करण्याची कल्पना श्री. बाळासाहेब कारले आणि प्राचार्य वसंतराव देसाई यांची. श्री. कारले यांनी विश्वासाने हे काम आमच्यावर सोपवले; एवढेच नाही, तर स्वतःच्या खाजगी संग्रहातील संदर्भ-साहित्यही आम्हाला उपलब्ध करून दिले.

आम्ही ज्या कविता निवडल्या, त्यांचा समावेश या संकलनात करण्यासाठी विद्यमान कवींनी आणि दिवंगत कवींच्या वारसदारांनी उदारपणे संमती देऊन आम्हाला हार्दिक सहकार्य केले. या संदर्भात श्रीमती अंजना मर्ढेकर ( नवी दिल्ली ) आणि श्री. स. कृ. पाध्ये (व्हीनस प्रकाशन, पुणे) यांच्या सहकार्याचा विशेष उल्लेख करायला हवा.

मौज प्रकाशन ( मुंबई ), श्री. सुभाष नाईक, श्री. माधव नावडीकर, श्री. रमण रणदिवे आणि महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या सौजन्यशील ग्रंथपाल श्रीमती इंदुताई गोखले यांनी आपुलकीने संदर्भ-सहाय्य दिले. श्री. रवीन्द्र खोपकर यांनी या कामात शेवटपर्यंत तत्परतेने मदत केली. चित्रकार श्री. सुभाष अवचट आणि मुद्रक श्री. अण्णासाहेब लाटकर यांच्या आस्थेमुळे ' मराठी प्रेमकविता 'चे हे प्रातिनिधिक दर्शन देखण्या रूपात वाचकांच्या हाती पडत आहे. या सर्वांविषयी आम्ही मनःपूर्वक कृतज्ञता व्यक्त करतो.

—संपादिका

— प्रत

**केशवसुत**

सिद्ध झालो मी दूर जावयाला
कंठ तेंव्हा तव फार भरुनि आला;
मला म्हटले तू गद्‌गद स्वराने
" खुशालीचे ते वृत्त लिहित जाणे ! "

" लिहिन " म्हटले मी तुला आश्वसाया,
पुढिल केला मी मुळी नच विचार;
करी घेता परि पत्र हे लिहाया,
खुशालीचे क्षीणत्व दिसे फार !

लोचनांना या होसि तू प्रकाश,
मदीयात्म्याचा तूच गे विकास;
नाडि माझी तव करी वाहताहे,
हृदय माझे तव उरी हालताहे !

करा अपुल्या तू पहा चाचपून,
उरा आपुलिया पहा तपासून;
प्रकृति माझीही तिथे तुज कळेल
विकृति माझी तुज तिथे आढळेल !

## प्रीती

**केशवसुत**

प्रीती मिळेल का हो बाजारी ?
प्रीती मिळेल का हो शेजारी ?
प्रीती मिळेल का हो बागात ?
प्रीती मिळेल का हो शेतात ?
        प्रीतिची असे अशि ग मात
        पहा शोधुनी हृदयात !
नंदनवनामधी आला
कल्पलतेला बहर भला
तिची हृदयि बीजे पडली
प्रीति त्यातुनी अवतरली !
        प्रीतिची असे अशि ग मात
        पहा आपुल्या हृदयात !
प्रेमळ फुल्यांची माळ
प्रियजनकंठी तू घाल;
द्विगुणित मग तो प्रीति तुला
देइल, न धरी शंकेला
        प्रीतिचा असा असे ग सौदा—
        प्रीतिने प्रीती संपादा !
हृदयी आलिंगन पहिले,
चुंबन मुखकमली वहिले
आणिक रुचतिल ते चार
प्रीतिला होती उपचार
        प्रीति वाढली, गडे ग सतत
        पहा तू प्रियजनहृदयात
प्रीती असेल का ग बाजारी ?
वेडे ! प्रीती मिळेल का ग शेजारी ?

ग्रंथालय क्रमांक २५६ २५५ २५६ २५७२ शाखा

## कुणास्तव कुणीतरी

**ना. वा. टिळक**

सरोष घन वर्षती, तरुलतांशि वारा झुजे
विराम नच ठाउका क्षणहि नाचताना विजे
भयानकचि संचरे सकल सृष्टि हो घाबरी
कुणास्तव कुणीतरी सभय वाट पाहे घरी !

रवप्रतिरवामुळे बधिर जीव सारे जरी,
निनाद करिते अहा ! श्रवण चाहुलीचा तरी;
उठे दचकुनी तडित् दुसरि नर्तनाला करी,
कुणास्तव कुणीतरी कितिक येरझारा करी !

खुशाल कर वृष्टिला, तुज न तो भिणारा घना !
पिशाचसम तू खुशाल कर गे विजे नर्तना !
महीधर समीरणा ! धरुनि लोळवी भूवरी,
कुणास्तव कुणीतरी निघत जावयाला घरी !

घनप्रसर माजला, नभि न एक तारा दिसे,
परंतु हसरा सदा सुखद चंद्र गेही वसे;
अहा द्रवविता कुणा सहज चंद्रकांताप्रती
कुणास बघुनी कुणीतरि हसेल हर्षे किती !

अहा चरणधावना कलशपूर्ण उष्णोदके
रुचिप्रद वरान्न जे करिल हो सुधेला फिके !
फुलांहुनि मऊ असे शयन रम्य मंचावरी
कुणास्तव कुणीतरी घरि अशी तयारी करी.

रसाळ वचनावली विविध तोंडि लावावया
मिळेल, उपमा उरे न मग भोजनाला तया
पडेल मग विस्मृती सकलही श्रमांची क्षणी,
कुणाप्रति कुणीतरी निरखिता प्रसन्नेक्षणी !

तया प्रणयनिर्झरा, प्रणयनिर्झरीला तिला
सदा सुखद भोवरा विहरण्यास ऐशा मुलां
बळेच उठवी कुणी ! उभयतांस आलिंगुनी
कुणीतरि धरील तैं विषय अन्य कैंचा मनी !

तमास अपसारुनी उन पडेल त्या मंदिरी,
तशात पडतील हो मधुनि पावसाच्या सरी,
कुणीतरि धरोनिया कर करी कुणाचा तरी,
स्तवील परमेश्वरा जलद, सूर्य ज्याच्या करी !

## थारोळ्यावर

**चंद्रशेखर**

थारोळ्यावर खबूतरांचं पायलं होतं जुळं
म्या प्रीतीच्या त्येंच्या गमती बगीतल्या वाढुळ.
गळ्यामंदी त्ये गळा घालती, चोचीनं टोचिती,
'गुटुरगुङ् गुटुरगुङ्' असा ह्येतुचा सादच जनु घालिती !
लटकत माना, घालित वळसे, मारिति मुरके कसे,
पुडं पुडं ती ढकलुन तोंडं मुकेच घेती जसे !
अन् तोंडावर तोंड ठिवुन त्ये न्यहाळिती फिरफिरुन,
येकजीव त्ये असं बगुन ह्यो ऊरच आला भरुन.
मनात म्हटलं व्हंतं माजं असंच ना पाकरू ?
घास तोंडचा ग्येला ! देवा, अता कसं मी करू ?
काय सांगु ग प्रीत ग्वोड ती, निव्वळ साकर जशी !
पन कर्मानं व्होवुन गेली राळच तीची कशी ?
घडी बसल का पुना सुकाचा ह्योच पिकल का मळा !
असं पाकरू मला मिळल का हीच कराया लिळा !
का ग रंगू लाजतीस तू ? जुळवू अपलं जुळं !
इयेलारांचं हाये दुधानं चोखट धुतलं कुळ !
भांगरवाडी पाटिलकीची हायेच अमच्या कुळी,
पिडीजातचं जुनं वतन जनु ती हरळीची मुळी !
संताजीचं पडतच न्हाइत बोल तितं खालती
पाडा आले जनु आंबे ते झेल्यानं झेलती.
सोनं पिकतंय कच्चं सोनं बागाइत त्ये असं,
'कोरडवाहू' नावाला पन सत्त्व गवाचं जसं !
घर वी हाये पुना बांदलं त्ये बंगल्यासारकं
लक्शमीवाचुन सुनाट पन त्ये रंगूवाचुन फिकं !

## चाफा

**बी**

चाफा बोलेना, चाफा चालेना,
चाफा खंत करी काही केल्या फुलेना !

गेले आंब्याच्या वनी
म्हटली मैनांसवे गाणी
आम्ही गळ्यांत गळे मिळवून.

गेले केतकीच्या बनी
गंध दर्वळला वनी
नागासवे गळाले देहभान.

आले माळ सारा हिंडुन
हुंबर पशूंसवे घालुन
कोलाहलाने गलबले रान.

कडा धिप्पाड वेढी
घाली उड्यावर उडी
नदी गर्जून करी विहरण.

मेघ धरू धावे
वीज चटकन लवे
गडगडाट करी दारुण.

लागुन कळिकेच्या अंगा
वायु घाली धांगडधिंगा
विसरुनी जगाचे जगपण.

सृष्टी सांगे खुणा
आम्हा मुखस्तंभ राणा
मुळी आवडेना ! रे आवडेना !!

चल ये रे ये रे गड्या
नाचू उडू घालू फुगड्या
खेळु झिम्मा झिम्-पोरी झिम्-पोरी झिम् !

हे विश्वाचे आंगण
आम्हा दिले आहे आंदण
उणे करू आपण दोघेजण.

जन विषयांचे किडे
यांची धाव बाह्याकडे
आपण करू शुद्ध रसपान.

दिठी दीठ जाता मिळुन
गात्रे गेली पांगळुन
अंगी रोमांच आले थरथरून.

चाफा फुली आला फुलुन
तेजी दिशा गेल्या आटुन
कोण मी– चाफा ? कोठे दोघे जण ?

## प्रीती निमाली तर –

**विनायक**

नादे मंजुळ आपुल्या रिझविते जी मन्मना नेहमी
ती एका निमिषात रम्य मुरली भंगून टाकीन मी !
अंगाते जडवून पंख उसने जाईन की सत्वर –
मी येथून उडून उंच गगनी प्रीती निमाली तर !

माझी कोण करील उत्सुक मने मार्गप्रतीक्षा घरी
प्रेमे बालक कोण सुंदर वदा देईल माझ्या करी
आता भासतसे मला भवन जे सर्वस्व चेतोहर –
त्या येईल खरोखरीच वनता प्रीती निमाली तर !

काव्याला अनुरूपसा विषय तो कोठून राहे जनी
स्फूर्तीच्या उठतील नित्य लहरी कैशा कवीच्या मनी
वाहावी कवणास काव्यसुमने त्याने वदा भूवर ?
कोठूनी जगती उरे रसिकता प्रीती निमाली तर ?

अस्ता जाइल सूर्यतेज वितरी विश्वास जे जीवन
तेणे व्याप्त समस्त होइल जगत् दु:खांधकारे घन;
सौख्याचा लवलेशही न मनुजा लाभेल हो दुर्धर
भीतीने मरतील मानवकुले, प्रीती निमाली तर !

## कुणि कोडे माझे उकलिल का ?

**भा. रा. तांबे**

कुणि कोडे माझे उकलिल का ?
कुणि शास्त्री रहस्य कळविल का ?

हृदयि तुझ्या सखि, दीप पाजळे,
प्रभा मुखावरि माझ्या उजळे;
नव रत्ने तू तुज भूषविले,
   मन्मन खुलले आतिल का ?

गुलाब माझ्या हृदयी फुलला,
रंग तुझ्या गालांवर खुलला;
काटा माझ्या पायी रुतला,
   शूल तुझ्या उरि कोमल का ?

माझ्या शिरि ढग निळा डवरला,
तुझ्या नयनि पाउस खळखळला;
शरच्चंद्र या हृदयि उगवला,
   प्रभा तुझ्या उरि शीतल का ?

मद्याचा मी प्यालो प्याला,
प्रिये, तयाचा मद तुज आला;
कुणी जखडिले दोन जिवांला
   मंत्रबंधनी केवळ ? का ?

## घट भरे प्रवाही बुडबुडुनी

### भा. रा. तांबे

घट भरे प्रवाही बुड्बुडुनी–
न दिसे तुज का न पडे श्रवणी ?

पदर गळाला, उडे वायुवर,
कुरळे उडती केसहि भुरभुर,
प्रमदे, बघ त्यां सावर, आवर –
का उभी प्रवाही शून्य मनी ?

स्वैर गार या झुळका वाहति,
मातीचा ये वास सभोवति,
क्षितिजी बघ ढग वर वर चढती,
बघ घरा निघाल्या सोबतिणी.

सळ डोळ्यांवर, काय पाहशी ?
कान देउनी काय ऐकशी ?
अचंचळ उभी व्याकुळ दिसशी –
का उचलिल घट येवोनि कुणी ?

पाउल नच ते शेत सळसळे;
शब्द न मानवि, तारा बोले;
शीळ न, वायुच वंशी खेळे,
का विरघळशी भ्रमि फिरफिरुनी ?

कवळुनि पद जल थरारुनि हले;
स्पर्शुनि शरिरा वारा वरळे,
वेलि हसति तुज फुलुनि बघ फुले,
डोलती विनोदे तरु बघुनी !

## वाटेच्या वाटसरा

**भा. रा. तांबे**

या, या हो, या हो रसिका, येथे लपा,
जो शब्द बाळपणी गेला त्याचा हा तोटानफा.
ती काय बोलते ऐका चोरुनि जरा
त्या तिऱ्हाईत पांथस्था जो आला तीच्या घरा.

“ जिवाचे लागेबांधे ठाव नाही सख्या भावा
वाटेच्या मुशाफिरा जाई जाई दुज्या गावा.
जन्मोजन्मीचं ते तळा गेलं आता पाप;
गुहेच्या अंधारात लोपलं रे आपोआप,
चाळवोनी आता ओढीशी का वर वर ?
वाटेच्या वाटसरा दृष्ट जादूची आवर.
बिळात झोपे नाग, नको घालू रे फुंकर;
चाळवून त्याला नको ओढू वर वर.
असावधपणी शब्द गेला कधी काळी;
भरल्या संसारात नको फोडू रे किंकाळी !
झालं गेलं आता नाही त्याचा मागमूस,
माझे आई गंगे का रे उकरिशी कूस ?
सांज झाली तरी जाई जाई दुज्या गावा;
वाटेच्या वाटसरा नको साधू पुरा दावा.
कालवू विष नको भरलेल्या आता ताटी;
झालं गेलं त्याची कशासाठी आटाआटी ?
जन्मजन्मीच्या रे तुझ्या ऋणानुबंधाची
गोष्ट लांब गेली, वाट पुढील जन्माची.
पुढील जन्मी आता तुझा हिशेब करीन;
गहाण जीव माझा, मी या जन्मी पराधीन. ”

## भेटीचा पहिलाच प्रसंग

### द. भि. रणदिवे

येइल कोणी गडे
जाउ द्या, काळिज मम धडधडे !

शिकवायाच्या मिषे आणिले मजसी एकीकडे
तुमचे असले पुरे जाहले मुलखाविरहित धडे.

गोकुळापरी घर भरलेले, भावोजी पलिकडे
सासुबाइही मामंजींना लावुन देती विडे.

माउबाइसम जाउबाइची दृष्टि चपल चहुकडे
हुडकित हुडकित वन्संहि येउन उभ्या राहतिल पुढे !

मावससासूबाइ घरामधि जणु बिजली कडकडे
फिरविल बाई कोण तयांच्या नजर ग ! नजरेकडे ?

बसाल आपण खुशाल येथे घेउन पुस्तक पुढे
परि माझ्या निंदेचे झडतिल घरोघरी चौघडे.

नका आवळू मनगट इतुके फुटतिल बिलवर गडे
अग बाई ? ये कुणि तरि इकडे, पळु आता कुणिकडे ?

## विरहगीत

**न. शं. रहाळकर**

हुरहुर लागे तुझ्यामुळे
ती तुजलागी काय कळे ?
चालतसे मी बोलतसे
हासतसे मी गात असे
    हे परि वरती
    नयनी कढती
    विरहाश्रु अति
आत दाबितो जनी बळे
शून्यी कोसळती सगळे !

तव सहवासी दिवस मला
क्षणापरी बघ जो गमला
तो तव विरही युगाहुनी
भासे मोठा अता मनी
    कधि मज दर्शन
    दृढ आलिंगन
    प्रेमे चुंबन
देशिल तू मन म्हणुनि खुळे
चिंतनि या घेई दोले.

सरल नासिका तव न जरी
कुरळ केश जरि तव न शिरी
नसति नेत्र जरि मृगापरी
गौर पूर्ण तू नससि तरी
    रूप सावळे
    परी प्रेमळे
    मज तव सगळे

फार आवडे, तुजपुढती
रूप जगातिल मज माती !

प्रेमपूर्ण ती निरीक्षणे
हालचाल लडिवाळपणे
प्रेमळ अकपट मंजु हसे
गोड गोड तव बोल तसे
यांचे स्मरणी
मी दिनरजनी
तुजवाचोनी
कंठी क्षण हे जड सखये
अंत न पाही सत्वर ये.

## विसरशील खास मला

**ज. के. उपाध्ये**

विसरशील खास मला दृष्टिआड होता
वचने ही गोड गोड देशि जरी आता !

दृष्टिआड झाल्यावर सृष्टि ही निराळी
व्यवसायहि विविध, विविध विषय भोवताली
गुंतता तयांत कुठे वचन आठवीता ?

स्वैर तू विहंग अंबरात विहरणारा
वशहि वशीकरण तुला सहज जादुगारा
लाभशील माझा मज केवि जसा होता ?

अंतरिची आग तुला जाणवू कशाने ?
बोलवे न वेदनांत वचन दु:ख नेणे
यापरता दृष्टिआड होउ नको नाथा !

## तनुवेल

**वि. दा. सावरकर**

सकाळीच तू तोडित असता जाइजुईच्या फुलां
माडीवरुनी सुंदर कन्ये, पाहियली मी तुला

उंचविता कर छातीवरि ये चोळी तटतटुनी
कुरळ केश रुळताति गोरट्या मानेवरि सुटुनी

पदर खोवला पातळ गेले कटितटिला लगटुनी
स्मृति सखये तव मनी माझिया संगतिच्या उठुनी

बघसि चोरटे मी तुज दिसतो वरती का कुठुनी
दिसताची मी हसू उषेसम मुखि तव ये फुटुनी

अशी सकाळी फुले तोडिता पाहियली जैं तुला
फुलवेलीहुनि तनुवेलचि तव मोहक दिसली मला !

## ती कोण ?

**गोविंदाग्रज**

दूरस्था जलधीकडे स्वहृदया नेते नदी वाहुनी,
शोधाया रसिकास नित्य कविता हिंडे, न आशा तुटे !
भूलोकावर राहते कुमुदिनी चंद्राकडे पाहुनी,
रात्रीमागुनि धावतो दिवसही, की भेट व्हावी कुठे ?

जीवाचे जगणे असेच असते सापेक्ष प्रेमावरी !
डोळेभेट दुरून; भाव अथवा आशाहि त्याला पुरे !
मी हे पाहुन जीवबंधन असे शोकार्त होतो परी
का ? की या मम लक्ष्यशून्य हृदयी काही न आशा स्फुरे !

ओठांशी भिडते रहस्य मनिचे– सांगू कुणाला परी ?
अश्रू हे नयनीहि– माळ करुनी घालू कुणाच्या गळा ?
आले हे भरुनी रिते हृदयही– देऊ कुणाच्या करी ?
आला दाटुनि कंठ– हाय रडुनी कोठे करू मोकळा ?

जी माझ्यास्तव, मी जिचे सकलही, आधार जी जीवनी
देवा ! भेटवि– दाखवी तरि मला– ती कोण देवी जनी ?

## प्रेम आणि मरण

### गोविंदाग्रज

जगी सांगतात प्रीत पतंगाची खरी
झडप घालून प्राण देतो दीपकाचे वरी
—श्री होनाजी बाळ

कुठल्याशा जागी देख
मैदान मोकळे एक पसरले
वृक्ष थोर एकच त्यात
वाढला पुऱ्या जोमात सारखा
चहुकडेच त्याच्या भवते
गुडघाभर सारे जग ते तेथले
झुडुपेच खुरट इवलाली
मातीत पसरल्या वेली माजती
रोज ती कैक उपजती आणखी मरती नाहि त्या गणती
दादही अशांची नव्हती त्याप्रती

त्यासाठी मैदानात
किति वेली तळमळतात सारख्या
परि कर्माचे विंदान
काही तरि असते आन चहुकडे
कोणत्या मुहूर्तावरती
मेघात वीज लखलखती नाचली
त्या क्षणी त्याचिया मनी तरंगति झणी गोड तरि जहरी
प्रीतीच्या नवथर लहरी नकळता

तो ठसा मनावर ठसला
तो घाव जिव्हारी बसला प्रीतिचा
वेड पुरे लावी त्याला
गगनातिल चंचल बाला त्यावरी

जातिधर्म त्याचा सुटला
संबंध जगाशी तुटला   त्यापुढे
आशाहि   कोठली काहि  राहिली नाहि   सारखा जाळी
ध्यास त्यास तीन्ही काळी   एक तो

मुसळधार पाउस पडला
तरि कधी टवटवी त्याला   येईना
जरि वारा करि थैमान
तरि हले न याचे पान   एकही
कैकदा कळ्याही आल्या
नच फुलल्या काही केल्या   परि कधी
तो योग   खरा हटयोग  प्रीतिचा रोग   लागला ज्याला
लागते जगावे त्याला   हे असे

ती त्याची स्थिति पाहुनिया
ती दीड वितीची दुनिया   बडबडे
कुणि हसे कुणी करि कीव
तडफडे कुणाचा जीव   त्यास्तव .
कुणि दयाहि त्यावर करिती
स्वर्गस्थ देव मनि हसती   त्याप्रती
निंदती   कुणी त्याप्रती  नजर चुकविती   भीतिही कोणी
जड जगास अवजड गोणी   होइ तो

इष्काचा जहरी प्याला
नशिबाला ज्याच्या आला   हा असा
टोकाविण चाळू मरणे
ते त्याचे होते जगणे   सारखे
हृदयाला फसवुनि हसणे
जीवाला नकळत जगणे   वरिवरी
पटत ना   जगी जगपणा  त्याचिचा मना   भाव त्या टाकी
देवातुनि दगडचि बाकी   राहतो

या परी तपश्चर्या ती
किति झाली न तिला गणती   राहिली
इंद्राच्या इंद्रपदाला
थरकाप सारखा सुटला   भीतिने
आश्चर्ये ऋषिगण दाटे
ध्रुवबाळा मत्सर वाटे   पाहुनी
तो स्वत:   तपोदेवता  काल संपता   प्रकटली अंती
" वरं ब्रूहि " झाली वदती   त्याप्रती

" तप फळास आले पाही
माग जे मनोगत काही   यावरी
हो चिरंजीव लवलाही
कल्पवृक्ष दुसरा होई   नंदनी
प्रळयीच्या वटवृक्षाचे
तुज मिळेल पद भाग्याचे   तरुवरा "
तो वदे   " देवि सर्व दे  हेच एक दे–   भेटवी मजला
जीविच्या जिवाची बाला   एकदा ! "

सांगती हिताच्या गोष्टी
देवांच्या तेतिस कोटी   मग तया
" ही भलती आशा बा रे
सोडि तू वेड हे सारे   घातकी
स्पर्शासह मरणहि आणि
ती तुझ्या जिवाची राणी   त्या क्षणी
ही अशी   शुद्र राक्षसी  काय मागसी   माग तू काही
लाभले कुणाला नाही   जे कधी "

तो हसे जरा उपहासे
मग सवेच वदला त्रासे   त्यांप्रती
" निष्प्रेम चिरंजीवन ते
जगि दगडालाही मिळते   धिक् तया

क्षण एक पुरे प्रेमाचा
वर्षाव पडो मरणांचा   मग पुढे "
निग्रहे   वदुनि शब्द हे  अधिक आग्रहे   जीव आवरुनी
ध्यानस्थ बैसला फिरुनी   वृक्ष तो

तो निग्रह पाहुनि त्याला
निरुपाय सर्व देवांचा   जाहला
मग त्याला भेटायाला
गगनातिल चंचल बाला   धाडिली
धावली उताविळ होत
प्रीतीची जळती ज्योत   त्याकडे
कडकडे   त्यावरी पडे  स्पर्श जो घडे   वृक्ष उन्मळला
दुभंगून खाली पडला   त्या क्षणी

दुभंगून खाली पडला
परि पडता पडता हसला   एकदा
हर्षाच्या येउनि लहरी
फडफडुनी पाने सारी   हासली
त्या कळ्या सर्वही फुलल्या
खुलल्या त्या कायम खुलल्या   अजुनिही
तो योग   खरा हठयोग  प्रीतिचा रोग   लागला ज्याला
लाभते मरणही त्याला   हे असे

स्मरणार्थ तयाच्या ही बोलांची रानपालवी
मराठी रसिकांसाठी 'गोविंदाग्रज' पाठवी

## निर्दय बालेस

### गोविंदाग्रज

अखेर झाली आता घे हा प्रणाम जाता जाता

जिंकुनि तुजला प्रेमे होइन दास तुझा जन्माचा
या आशेवर जीव टांगला होता या दीनाचा

नजर जराशी तुझी बदलता थोडा थोडा होई
वेडा माझा जीव बुडविला तू शोकाच्या डोही

होते नव्हते त्याची केली तुझ्या ठिकाणी पोच
जीवाच्या जाळ्यात झेलला शब्द न पडला तोच

रूप मनोहर असले बुद्धिहि तीव्र लाभली तुजला
खऱ्या गुणाची पारख काही असेल तव हृदयाला

वेडी आशा अशी धरुनिया धडा जिवाचा केला
भल्याबुऱ्याचा भेद न तुजला अनुभव भलता आला

केल्या ज्याच्या पायघड्या मी तुझ्या पावलांसाठी
त्या हृदयाला तुडवुन गेलिस नटव्या थाटापाठी

जग सगळे हे डोळ्यांपुरते, रूप जिवाला पुरते
उदार हृदया परि निर्दय जग दगडाखाली पुरते

ज्या देवाने जग हे केले, ज्या प्रेमे हे चाले
त्या देवाला, त्या प्रेमाला जाळिन आता बाले

जगावाचुनी लाभतीस तरि जग मी केले असते
तुझ्यावाचुनी जग हे आता असून झाले नसते

दिला तिलांजलि अश्रूंचा हा त्या प्रेमाच्या नावा
परतायाचे नाही आता त्या प्रेमाच्या गावा

होइल होइल वाटत होते तेच अखेरिस झाले
नाव घेतल्यावाचुन आता मनात झुरणे आले

# सोन्याचा खंजीर

**श्री. रा. बोबडे**

सोन्याचा खंजिर उरी, सोसु किति तरी, किती धरु धीर ?
कधि येइल माझा पर्यंकीचा वीर ?

राजहंस राजसमणी, गुंतला गुणी, उडुनि कसा गेला
जा आण लावु दे कंठि फुलांचा झेला.

श्रीमंत सत्राइ सरदार, गळ्याचा हार, हृदयिचा राणा
मज टाकुनि गेला माझा मोतीदाणा

हा अनंत विरहावधी, सरेल का कधी ? धीर धरवेना
मदनाचा जहरी तीर तनुस सहवेना.

हो नाजुक मृदु कोवळी, फुलाची कळी, कामिनी काया
या गोऱ्या गाली उठली पिवळी छाया

हा कुसुमसमय संप्रती, वायु वाहती मलयगिरिवरचे
संताप तशातहि देति किरण चंद्राचे

नयनांत नीर दाटते, हृदय फाटते, प्राण जड झाले
देहाचे सारे बंध तटातट तुटले

प्राणेशा जिवलग जिवा ! अता केधवा द्याल दर्शन ?
या दीनदयाळा त्वरित सख्या धावून

जा जा ग सखे ! जा त्वरे, तनु स्मरशरे होइ व्याकूळ
जा आण प्रियकरा नको लावु गे ! वेळ

संदेश कथुनि अत्रचिता, पडलि मूर्च्छिता धरणिवर कांता
उठवील कसा तिज कोण प्रियाविण आता ?

# फुलराणी

**बालकवी**

हिरवे हिरवे गार गालिचे हरित तृणाच्या मखमालीचे;
त्या सुंदर मखमालीवरती फुलराणी ही खेळत होती.
गोड निळ्या वातावरणात अव्याज मने होती डोलत;
प्रणयचंचला त्या भ्रूलीला अवगत नव्हत्या कुमारिकेला.
आईच्या मांडीवर बसुनी झोके घ्यावे, गावी गाणी;
याहुनि ठावे काय तियेला साध्या भोळ्या फुलराणीला ?

पुरा विनोदी संध्यावात डोलडोलवी हिरवे शेत;
तोच एकदा हासत आला चुंबुन म्हणे फुलराणीला –
" छानी माझी सोनुकली ती कुणाकडे ग पाहत होती ?
कोण बरे त्या संध्येतून हळुच पाहते डोकावून ?
तो रविकर का गोजिरवाणा आवडला अमुच्या राणींना ? "
लाजलाजली या वचनांनी साधी भोळी ती फुलराणी !

आंदोळी संध्येच्या बसुनी झोके झोके घेते रजनी;
त्या रजनीचे नेत्र विलोल नभी चमकती ते ग्रहगोल !
जादूटोणा त्यांनी केला चैन पडेना फुलराणीला;
निजली शेते, निजले रान निजले प्राणी थोर लहान
अजून जागी फुलराणी ही आज कशी ताळ्यावर नाही
लागे ना डोळ्याशी डोळा काय जाहले फुलराणीला ?

या कुंजातुन, त्या कुंजातुन इवल्याशा या दिवट्या लावुन,
मध्यरात्रिच्या निवांत समयी खेळ खेळते वनदेवी ही.
त्या देवीला ओव्या सुंदर निर्झर गातो; त्या तालावर
झुलुनि राहिले सगळे रान स्वप्नसंगमी दंग होउन !
प्रणयचिंतनी विलीन वृत्ती कुमारिका ही डोलत होती;
डुलता डुलता गुंग होउनी स्वप्ने पाही मग फुलराणी –

'कुणी कुणाला आकाशात
हळुच मागुनी आले कोण
प्रणयखेळ हे पाहुनि चित्ती
तो व्योमीच्या प्रेमदेवता
हळूच आल्या उतरुन खाली
परस्परांना खुणवुनि नयनी

प्रणयगायने होते गात;
कुणी कुणा दे चुंबनदान !"
विरहार्ता फुलराणी होती;
वाऱ्यावरती फिरता फिरता –
फुलराणीसह करण्या केली
त्या वदल्या, ही अमुची राणी !

स्वर्भूमीचा जुळवित हात
खेळुनि दमल्या त्या ग्रहमाला
आकाशीची गभीर शांती
विरू लागले संशयजाल
शुभ्र धुक्याचे वस्त्र लेवुनी
स्वप्नसंगमी रंगत होती

नाचनाचतो प्रभातवात;
हळुहळु लागति लपावयाला
मंद मंद ये अवनीवरती;
संपत ये विरहाचा काल.
हर्षनिर्भरा नटली अवनी;
तरीहि अजुनी फुलराणी ती !

तेजोमय नव मंडप केला
जिकडे तिकडे उधळित मोती
लाल सुवर्णी झगे घालुनी
कुणी बांधिला गुलाबि फेटा
आकाशी चंडोल चालला
हे थाटाचे लग्न कुणाचे ?

लख्ख पांढरा दहा दिशांला,
दिव्य वऱ्हाडी गगनी येती;
हासत हासत आले कोणी;
झगमगणारा सुंदर मोठा !
हा वाङ्‌निश्चय करावयाला;
साध्या भोळ्या फुलराणीचे !

गाउ लागले मंगल पाठ
वाजवि सनई मारुतराणा
नाचु लागले भारद्वाज,
नवरदेव सोनेरी रविकर
लग्न लागते ! सावध सारे !
दवमय हा अंतःपट फिटला

सृष्टीचे गाणारे भाट,
कोकिळ घे तानांवर ताना !
वाजविती निर्झर पखवाज,
नवरी ही फुलराणी सुंदर !
सावध पक्षी ! सावध वारे !
भेटे रविकर फुलराणीला !

वधूवरांना दिव्य रवांनी
त्यात कुणीसे गुंफित होते

कुणी गाइली मंगल गाणी;
परस्परांचे प्रेम ! अहा ते !

आणिक तेथिल वनदेवीही दिव्य आपुल्या उच्छ्वासांही
लिहीत होत्या वातावरणी फुलराणीची गोड कहाणी !
गुंगत गुंगत कवि त्या ठायी स्फूर्तीसह विहराया जाई;
त्याने तर अभिषेकच केला नवगीतांनी फुलराणीला !

# प्रीति हवी तर

**बालकवी**

प्रीति हवी तर जीव आधि कर अपुला कुरबान;
प्रीति हवी तर तळहातावर घे कापुनि मान !
तलवारीची धार नागिणी लसलसती प्रीत,
याद ठेव अंगार जगाला लाविल निमिषात !

प्रीति निर्मिली तुला वाटते का दुबळ्यासाठी ?
प्रीतिदेवि जगदेकवीर जो जाय तयापाठी
नव्हे प्रीतिला रंग लाविला लाल गुलाबांचा,
परि रुधिराचा, धडधडणाऱ्या जळत्या जीवाचा.

गुल गुल बोले प्रीति काय ती ? काय महालात ?
प्रीति बोलते काळ घालिता कलिजाला हात !
स्त्रैणपणाच्या चार भावना नच पचती ज्याला
हीन जिवाने घेउ नये त्या हा जहरी प्याला !

सह्य जिवाला होय जाहला जरि विद्युत्पात,
परी प्रीतिचा घात भयंकर दुसरा कल्पान्त !
जीवंतपणी मरण घेउनी फिरणे जगतात,
साठविली ब्रह्मांडदाहिनी दाहकता यात !

## तू तर चाफेकळी

**बालकवी**

‘ गर्द सभोती रान साजणी तू तर चाफेकळी !
काय हरवले सांग शोधिशी या यमुनेच्या जळी ?’

ती वनमाला म्हणे, ‘ नृपाळा, हे तर माझे घर;
पाहत बसते मी तर येथे जललहरी सुंदर.

हरणी माझी, तिला आवडे फारच माझा गळा
मैना माझी गोड बोलते तिजला माझा लळा.

घेउनि हाती गोड तिला त्या कुरणावरती फिरे –
भाऊ माझा, मंजुळवाणे गाणे न कधी विरे. ’

‘ रात्रीचे वनदेव पाहुनी भुलतिल रमणी ! तुला
तू वनराणी, दिसे न भुवनी तुझिया रूपा तुला.

तव अधरावर मंजुळ गाणी ठसली कसली तरी,
तव नयनी या, प्रेमदेवता धार विखारी भरी !

क्रीडांगण जणु चंचल सुंदर भाल तुझे हे गडे
भुरु भुरु त्यावर नाचत सुंदर कुंतल कुरळा उडे.

अर्धस्मित तव मंद मोहने, पसरे गालावरी
भुलले तुजला हृदय साजणी, ये चल माझ्या घरी.’

सांज सकाळी हिमवंतीचे सुंदर मोती घडे
हात लाविता परि नरनाथा ते तर खाली पडे

ती वनबाला म्हणे, ‘ नृपाळा सुंदर मी हो खरी ’–

( अपूर्ण )

## मोऱ्यांची मोहना

**माधव**

ज्यावरि अपुले रूप पहाया ओथंबे जांभुळ
घालुनि कुटरू थकला कवडा प्राशी ज्याचे जळ.
त्या डोहाच्या दक्षिणतीरी उभी लोललोचना
शीरगावच्या मानकऱ्यांची मोऱ्यांची मोहना !

डाव्या बाजुस वाघजाइचे झाकेवर देउळ,
उजव्या बाजुस हाकेवरती खेमाचे राउळ;
मागे ' पोकी धोंड ' विस्मये पसरी निज आनना !
कवडेकोंडावरी सांवळी मोऱ्यांची मोहना !

जिला पाहता चित्त आपुले कष्टाने आवरी,
शीरगावचा सत्ताधारी कृष्णाजी आवरी.
पंचक्रोशीतला जियेचा तरुण न आला मना,
कवडेकोंडावरी आज ती मोऱ्यांची मोहना !

न कळे होती काय निरीक्षित डोहापैलीकडे,
जेथे हासत उभी पांढऱ्या पानांची खावडे;
तिकडुनि बालेभोक पाखरू करी तियेला खुणा !
अर्थ तयांचा परंतु नेणे मोऱ्यांची मोहना !

निरखित होती आतुरतेने तथापि पैलीकडे,
भेणे बालेभोक पाखरू एकाएकी उडे !
दुरुनी आली ' टी ! टी ! ' ऐशी टिटव्यांची सूचना,
अधिकच तेणे उत्सुक झाली मोऱ्यांची मोहना !

शब्द जांभळीमागुन आले अवचित दुसऱ्या क्षणी
मोहनेस अनुलक्षुन बोले वृक्षाआडुन कुणी
" पंचक्रोशीतला जियेच्या तरुण न आला मना
कुणाकारणे आज इथे ती मोऱ्यांची मोहना ? "

पाहु लागली जांभळीकडे बाला न्याहाळुनी;
आला पुढती युवा एक तो त्या वृक्षामागुनी !
वदे, " तुझा मी मोहन, माझ्या ओळखुनी घे खुणा ! "
ओळख पटली; आणि कापली मोऱ्यांची मोहना !

" भये कापसी ! " म्हणे तिला तो " पिशाच मज मानुनी ! "
मरणाची मम परंतु वार्ता सत्य नसे साजणी !
असती ज्यांच्या जित्या वासना मरणे त्यांना मना !
कशी न जाणे चतुर शहाणी मोऱ्यांची मोहना ?

" जिला माणके म्हणुनि ओपिली वाळीची मी फुले,
' घे तानिवडे ! ' म्हणुनि घातली कानी सोनावळे;
करमत नव्हते घडी एकही जिला माझियाविना,
जिती वासना, ती मज व्हावी मोऱ्यांची मोहना !

" बारा वावा सुंभ सोडिले तरि न गावला तळ,
साळकाइतिल काळडोहिचे अथांग काळे जळ !
झटती तेथे सात आसरा रिझवाया मन्मना,
रिझे न मन परि जिथे न माझी मोऱ्यांची मोहना !

" इथे पातलो तुला न्यावया अपुल्या जलमंदिरी,
फणशीखाली वारु उभा मम, चल तिकडे सुंदरी !
कशास अथवा चालायाच्या तुज द्याव्या यातना ? "
बोलुनि त्याने उचलुनि नेली मोऱ्यांची मोहना !

फणशीपाशी नेउनि बसवी वारूवरती तिला,
धरुनि करी तिज तिचियामागे आपणही बैसला.
सुटला वारू वेगामध्ये टाकित मागे मना !
क्षणात पाहे साळकाइला मोऱ्यांची मोहना !

बारा वावा सुंभ सोडिले तरि न गावला तळ,
साळकाइतिल काळडोहिचे अस्थिर गहिरे जळ;

वारु शिरे त्या जळी धऱ्याची पुरवाया कामना !
जळी बुडाली मोहन आणिक मोऱ्यांची मोहना !

काळडोहिच्या जळी बुडाली वारूसह ती जिथे,
दुसऱ्या दिवशी दिसू लागले जुवे मनोहर तिथे
अजुनि तयावर विहरे रात्री घेउनि निज मोहना
शीरगावच्या मानकऱ्यांची मोऱ्यांची मोहना !

## गोड आठवण

### गिरीश

ठेविले दारी न जो पाऊल तुझ्या, मंजुळे !
गोड गाणे ऐकिले, जे तू स्वत:शी गुंजिले

पाठमोरी बैसुनी बागेमधे तू अंगणी
आपुल्याशी रंगशी, होते जरासे सांजले
गुल्मुशीचा हार हाती झरझरा गे गुंफुनी
सावरोनी अंचळाते वायुला तू शासिले
नारळी रंगात शोभे, रेशमी पाठीवरी, –
शुभ्रता आतील किंचित् रंग रंगाने खुले
सैल अंबाड्यावरी शोभे कडेची लोकर
की सुरंगी इंद्रचापा कृष्णमेघी निर्मिले ?
गाठल्या केसांवरी गे पाच मर्वा घालुनी
सोनचाफ्याचे टपोरे फूल होते खोविले
थांबलो–नि:शब्द गेलो–सन्निधी ठेलो जरा
मोहनी घालून कोणी गे कळेना ओढिले
रंगले गाणे ! लकेरीसंगती मी गुंगलो
मोडवेना त्वत्समाधी–त्या सुरांनी मोहिले
‘ गुंफिताना हार, गावे तू असे गोड स्वरे
चोरुनी ऐकून मीही गे रमावे– ’ वाटले
तोच आली हाक–गानाची समाधी भंगली !
नीट तू गेलीस–मागे ढुंकुनी ना पाहिले

गुंफताना सांडलेली वेचिली हाती फुले
तीच आता हुंगताना अंतर प्रेमे उले

## प्रेम होईना तुझ्याने

**माधव जूलियन**

प्रेम होईना तुझ्याने, प्रेम माझे राहु दे !
आचरू ये धर्म तूझा तू नि मी माझा मुदे.

प्रेम होईना तुझ्याने, दोष हा नाही तुझा,
स्वस्थ राही तू सुखे, ठेवी न चित्ती किंतु, जा.

प्रेम होईना तुझ्याने, प्रेम होई का हटे ?
प्रेम द्या अन् प्रेम घ्या काऱ्यीच हा सौदा पटे.

प्रेम होईना तुझ्याने, दैव ही क्रीडा करी,
वारिभासाची मजा ती वालुकेच्या सागरी !

प्रेम होईना तुझ्याने, मी न दैवाला गणी,
स्वप्नवत् राहील चित्ती गोड माझी लागणी.

प्रेम होईना तुझ्याने, स्वर्ग थांबे स्वस्थली,
भूतलीची संपदा नाही अजूनी संपली.

प्रेम होईना तुझ्याने, राख का घालू शिरी ?
का श्मशानाची कळा आणू मनाच्या मंदिरी ?

प्रेम होईना तुझ्याने, जाउ दे ते बापुडे !
मत्स्मृतीला माळ तू घालू नको वाया पुढे !

## देवा, स्त्रीहृदयी मनोरमपणा

**माधव जूलियन**

देवा, स्त्रीहृदयी मनोरमपणा केव्हा कुणी ओतिला ?
गंगौघापरि भूवरी वरुनि ये ओढाळ ओढा कसा ?
भूमीते पहिल्या रसे सजविता हा सार्थ होई रसा;
हा दिव्याभिमुखी करी उजळुनी चेतोभवज्योतिला.

नेत्रे ती वळता उठे प्रथम त्या वृष्टीतले वादळ,
गालीची अरुण स्मिते झळकता प्रीती त्वरे अंकुरे,
एकाकी फुलताच वाक्सुमन ते वेडा पतंग स्फुरे,
त्या आलिंगन-चुंबनात पहिली एकी पटे मंगल.

कैशी घेत अनेक रम्य वळणे जाई वरी हा पथ,
भासे मंदिर न्हाणिले गिरिशिरी की सोनियाच्या रसे !
प्रीतीची अधिदेवताच वसशी तू त्या स्थळी राजसे,
देवी, अंतर तोडुनी तव पदी आलोच मी धावत.

म्हातारी म्हणु देत की भवपथी काटेकुटे मातले
काट्यांची क्षिति का गुलाब फुलता हे ध्येयलोकातले ?

## संगमोत्सुक डोह

**माधव जूलियन**

मराठी ग्रंथ संग्रहालय
३५५६
काव्य २५४८०
११७९१२
संदर्भ शाखा (स्थळ

एकत्र गुंफून जीवितधागे
प्रीतीचे नर्तन नाचलोमागे
एकटा उभा मी तेथे
भोवती शोधी प्रियेते
न दिसे कोठे; का सोडून गेली ?
लोपते का कधी प्रीती उदेली !

दृष्टीस पडे हे भयाण मात्र
रेताड कोरडे उथळ पात्र !
प्रिया न जर संगती
तर हो कुंठित गती.
प्रीती या हृदयी अथांग खोल
तुडुंब भरली परंतु फोल.

कोणी ये, हिणवी, " भावना-मेली
हासेना, बोलेना, करी ना केली ! "
खट्याळ वादळी वारा
दौडत येता भरारा
उठती चंचल बाह्य तरंग
अंतरी जडता न पावे भंग.

जीवनज्योत न माझिया गेही
म्हणून हे कृष्ण वसन देही;
एकली कौमुदी हासे,
ढगात खिन्नच भासे,
स्तिमित नजर लाविती तारा,
मावळे उत्साह नाचाचा सारा.

खाऊन रवीचा प्रखर ताप
कष्टून, लागून जीवांस धाप,
प्रदोषसमयी येती
क्षणैक विसावा घेती,
घरास वळती माणसे गुरे,
अन् माझे अंतर निःशब्द झुरे.

अंबरी इंद्राची दुंदुमी वाजे
भीषण सुवर्णसुंदरी साजे,
मेघांत हासत खेळे,
लवत नाचे ते वेळे
देवांचा भरून येऊन ऊर,
सहस्रनयनी ओसंडे पूर !

नाचेल मयूर अवनीतली,
मंडूक ते द्विज गातील जली,
होऊन धुंद त्या क्षणी
धावून प्रिय साजणी
देशील ना मज कसून खेव ?
बांधितील वर तोरण देव.

म्हणत मंगल जंगलगान,
कड्याहून खाली लोटून प्राण,
होऊन काषायरंग,
संगात पूर्ण निस्संग,
पावू गे समाधिसागरी अंत !
— अजून संपेना वैशाख हंत !

## मैना

**अज्ञातवासी**

तुझ्याच नजरेमधे साठली इतुकी जादू कशी ?
नकळत गेले भारुन म्हणुनी ओढ लागली अशी

कातरते रे राया ! माझे अंतर वेडेपिसे
कळेल जर का तुज, मज वाटे होइल माझे हसे.

रोज पाहते तुला, न्याहळिन झटकन्, म्हणते मनी
परंतु माझी मीच लाजते, तुजला बघता क्षणी.

अम्ही मराठी सरदारांच्या थोर कुळातिल मुली
गडमाथ्यावर स्वैर हिंडणे शोभत नाही मुळी.

रोज तुझी घोडीवर चाले दौड, इथुन पाहते
सोन्याच्या पिंजऱ्यात मानी मैना झुरते इथे.

भाग्यवंत कुलदैवत अंबा, पडेल तिज साकडे
याच गडावर, तुझ्याचसाठी झडतिल मग चौघडे.

तोवर लोटू कशा, निष्ठुरा ! दिवस आणि यामिनी
उगाच काहीबाही भकती भवताली मैत्रिणी.

जखम जाहली उरी माझिया, औषध तुझिया करी
दूर गडावर मैना झुरते, ठेव आठवण तरी.

# नाविक

**आनंद**

आजच पुनवा चल ग नाव, नभात चंद्रम डुले डुले
सवार झाली भरती पुरती थडीथडीने झुले झुले.

मंगशिराचा मादक महिना शेंग तळपते भरी भरून
नाविक मी तू नाव ! येउ चल रंग रोजगारिचा करून.

अस्मानातुन दर्यावरती ओघळती चांदिण्या कशा ?
चवल्यापावल्यांचा जणु पाउस भोवताल ओसरे असा.

चिनई चांदी रस फैलावे वल्हे मारता जलामधून
हिंदुळ्यापरी नाव नाचते झुके अंग चालिच्या वरून

मतलय खारी मच्छीमारी हेच गोडगोडसे जिणे
तीन तालच्या पलंगावरले लोळणही त्यापुढे उणे.

जलात असताना मज दुनिया दिसे सारखी असून नसून
जन्मापुन मी तुझ्या जिवावर केला नाविकपणा कसून

बुडत्याला भगवानावाणी हात कैकदा दिला असे
तुझ्या सहेलीवाचुन असले भाग्य मात्र लाभणे नसे

रानावयला जसा पारधी, नाविक मी सागरातला
बिजलीवाणी तुझी चुणुक वारुणीतील वारुणी मला.

तुझ्याच नादी मग्रापून मी ! थांब बये फेकितो जरा –
सोनेरी पागळे जलावर, धंदा तर होउ दे पुरा.

“ सागावाणी ताठ होउनी पिस्कारी पागळे धरून
आसमंत भागात तयाची निश्चलता राहिली मुरून. ”

## अनुताप

**मनोरमा**

जेधवा करिसि तू मजसह वादविवाद
मम वृत्ति वळतसे करण्या तव अनुवाद
मीपणा लोपतो, दुर्बलता मन वरते;
तुज विरोध करण्या मनातही नच येते !
मृदु भाषणौघि वाहोनी जातसे
स्वत्वास विसरुनी मागे येतसे
बोलशील त्याला माना तुकविते
जादूचे जाळे पसरुनि माझ्यावरती
का असा गाजविसि प्रभाव अबलेवरती !

अनुताप देतसे स्मृति अता तेव्हाची
का धनीण नव्हते तेव्हा मम हृदयाची
मम चित्तवृत्तिची रम्य फुले जी फुलती
का मीच टाकिली चुरगाळुनि तव हाती !
आता न होउ देणार मी असे
निर्धार मनी फिरफिरुनी करितसे
जीवास कष्ट परि फार होतसे
डोळ्यांनी देखिल बोलु नको माझ्याशी
मज विचार करु दे स्वतंत्र मम हृदयाशी !

## जादूगारीण

**ए. पां. रेंदाळकर**

वद जादुगारिणी तेव्हा मारिलीस फुंकर कसली ?
ओसाड माळ हा सारा पुष्पांनी भरुनी गेला !
या रुक्ष टेकड्यांवरती सर्वत्र दिव्यरस भरला !
हे साधे फत्तर परि या गीतांचा पाझर फुटला !
जळलेल्या आशावेली
त्यांना नव पुष्पे फुलली !
सुकलेली झाडे हसली !
चिंतांचा सरुनी काळ भरले स्मित रानोमाळ !

लाजरी वन्य कुसुमे जी खबदडीत फुलुनी सुकली,
शब्दही मुखातुन ज्यांना काढाया छाति न झाली,
त्यांनीच गाउनी वसुधा फेकिली जणू आंदोली !
जड नीरस माझी गाने
भरुनिया नवोत्साहाने
कोंदिली तयांनी गगने !
हा प्रभाव गे कोणाचा तुजवाचुनि वद इतरांचा ?

प्रत्येक दगड काव्याने या माळावरला भरला !
अणुरेणु मुके बसलेले लागले पहा गायाला !
संगीततरंगी त्यांच्या विसरलो बाह्य जगताला !
रविकरस्पर्श होताच
रत्नापरि चमके काच
तव दृष्टि तेवि पडताच—
स्वर्गच जड जग हे झाले ! ही त्वदीय मोहनजाले !

पण हाय ! लपुनि बसलीस   रुसवा की राग धरून,
स्थिति सर्व एकदम गेली   बदलुनिया तैंपासून !
अस्तास दिनश्री जाता   किति दिसते विश्व भयाण !

गानोत्सव सरला आता
प्रेमाच्या नुरल्या वार्ता
जाहली सृष्टि शोकार्ता

गीत हे ! गीत पण कसले ? हे शोकक्रंदन उसळे !

## पुस्तकातील खूण

**केशवकुमार**

वाचनाला सुरवात कुठे केली,
दोन पाने वाचून जो न झाली;
तोच हासत मागून कुणी आले,
आणि पुस्तक तात्काळ जप्त केले !

" पुरे गोष्टी वाचणे ! करा गोष्टी ! "
म्हणे, " फिरवा क्षणभरी वरी दृष्टी ! "
झणी शिरिची काढून तिने पात –
केवड्याची घातली पुस्तकात !

दिवस झाले त्याजला किती आता
सहज पुस्तक ये आज तेच हाता;
केवड्याची त्यातली बघुन खूण
सुखस्मृतिने मन जात गहिंवरून !

जिथे वाचन एकदा थांबले ते
अडुनि बसले आहेच अजुनि तेथे !
फिरुनि फिरुनि उघडितो तेच पान
आणि प्रेमे हुंगितो तीच खूण !

## तूच रमणी

**यशवंत**

कशाला अव्यंग स्वरुप इतुके लोक भजती ?
कुठे थोडी पावे उणिवहि पुढे गोड महती !

' मृगाक्षी ' तूते मी म्हणुन हिणवू काय हरिणे ?
तुझ्या नेत्री तैशी फुलति म्हणु का चंद्रकिरणे ?
उषा संध्या आणू सखि तव कपोली उगिच का ?
तुझी नाही दंतावलि तुज गणाया रदनिका

तुळाया नाकाशी मुळिच नलगे चंपककळी
शशीच्या बिंबार्धा उगिच भिडवू काय निटिली ?
कशासाठी ओठी हुडकु तुझिया विद्रुमगुणा ?
वृथा संबोधू का ' कमलनयना ! पद्मवदना ! '

स्तवाया रूपा का हवि तरि करायास तुलना ?
कशाला धुंडाळा वन, गगन, खाणी, उपवना ?

विनावैशिष्ट्याने विलसत तुझे नाक असुनी
रुचे त्याचे माते स्फुरण अथवा कंपन मनी
खऱ्या खोट्या रोषे मुरडि कधि त्याच्या सुरकुत्या.
कितीदा झाल्या गे मज चिडवित्या वा खुलवित्या.

उन्हातान्हामाजी अविरत जिने कष्ट करणे
तिच्या गाली पद्मासम कुठुन लाली बहरणे ?
जरी छाया, ग्वाही मिळतहि तिथे ताम्रपटशी
बगीच्यापेक्षा ती जमिन बरवी बावनकशी.

तुझ्या कांते ! दंतावलिमधिल तो एक तिरपा
दुज्याचा गेला तो कधि उडुन बारीक टवका
तयांच्या हे शोभेमधिल मज वैगुण्य खुपले
खुपावे त्यांनी, -ते सुखकर तसे सेव्य ठरले.

तुझ्या ओठांमाजी जरि न इतुका रेखिवपणा
जरी त्यांच्या ठायी फिकटपण ते आणि करुणा
रुचे होता त्यांची उकल कधि संकोचहि तसा
तृषार्ता या तेथे विमल सलिलाचा भरवसा

कपाळी चिंतेचे ध्वज सतत तूझ्या फडकती
कपाळी कष्टांचे ढग सतत तूझ्या डवरती
असो ते चिंचोळे, प्रिय मज तरी; फुंकर सखे
तया घालायाला, कवळुनि उरी, मानस भुके.

तुझ्या काळ्या डोळ्यांभवति वलये काळसर ती
कशी केव्हा आली कुठुनि, मजला ज्ञात पुरती.
मृगाक्षी, पद्माक्षी नसलिस तरी हीच वलये
स्फुरे चुंबायाची म्हणुनि हृदयी ओढ सखये !

कितीही सौंदर्योद्धत झळकल्या मूर्ति भुवनी
तुझ्या व्यंगानेही मज सहचरी, तूच रमणी !

## फुलवात

**अनिल**

हृदयीच्या अंधारात
        लावियेली फुलवात

तुवा आपुलिये हाती
        उजळली दिव्य ज्योती

कोनाकोनी खुले कांती
        सरे जीवनाची भ्रांती

तेज पसरे प्रशांत
        हृदयीच्या मंदिरात

अनंताचे द्वार खुले
        सांतामधूनीया झाले

तमातुनी ये प्रकाश
        व्यापी हृदय-आकाश

मूर्तीमधून प्रचीती
        अमूर्ताची होई चित्ती

फुटे शब्द निःशब्दाला
        हृदयीच्या जिव्हाळ्याला

हृदयीच्या मंदिरात
        लावियेली फुलवात

# सायंतारा

**अनिल**

गगनि उगवला सायंतारा
मंद सुशीतल वाहत वारा

हाक तुझी मज स्पष्ट ऐकु ये
येइ सखे, ये बैस जवळि, ये
घाल गळा मम तव कर कोमल
पसरू दे श्वासाचा परिमल
घेई मम हृदयात निवारा
गगनि उगवला सायंतारा !

बैस जवळ ये, बघ ही पश्चिम
कोमल रंगी खुलली अनुपम
ये नेत्री ते घेउ साठवुनि
गालावरती गाल ठेवुनी
उदासीनता विसर जगाची
तुझाच मी, तू माझि सदाची
विरले हृदयांतरि बघ अंतर
तू आणिक मी जवळ निरंतर
सरे एकसरि भेदपसारा
गगनि उगवला सायंतारा !

## आणीबाणी

**अनिल**

अशा काही रात्री गेल्या, ज्यात काळवंडलो असतो
अशा काही वेळा आल्या, होतो तसे उरलो नसतो.

वादळ असे भरून आले, तारू भडकणार होते
लाटा अशा घेरत होत्या, काही सावरणार नव्हते.

हरपून जावे भलतीकडेच, इतके उरले नव्हते भान
करपून गेलो असतो, इतके पेटून आले होते रान.

डाव असे पडत होते की, सारा खेळ उधळून द्यावा
विरस असे झाले होते, जीव पुरा विटून जावा.

कसे निभावून गेलो, कळत नाही, कळत नव्हते
तसे काही जवळ नव्हते — नुसते हाती हात होते !

## पहिले प्रेम

**निशिगंध**

कितीक दिन गेले होते –
 होतो वाट पहात;
गाठ तुझी माझी पडली
 जेव्हा एकान्तात.
केला मग निश्चय पुरता
 बोलायाचे आता
आला क्षण आजवरी मी
 केले तप ज्याकरिता.
'मी तुजवर– ' 'तुजवर माझे– '
 येई वच इतकेच.
त्यापुढचा काही केल्या
 शब्द न येइ मुळीच.

काय मला बोलायाचे
 होते तुज कळलेच;
नसते का भाषा पहिल्या
 प्रेमाची असलीच.

रक्त तुझे झाले वदन
 होती खाली मान,
पदराशी खेळत होत्या
 हस्तांगुलिही दोन;
होते तंव जिकडे तिकडे
 क्षणभर अगदी शांत,
हृदयाचे ठोके माझ्या
 मजला ऐकू येत.

काहितरी वदलीस तदा
    ऐकूहि न मज आले;
काय म्हणायाचे होते
    तुज, ते परि मज कळले.
कळते हे तुम्हां आम्हां
    शब्दांवाचूनीच;
कोण रुसे शब्दांसाठी,
    पहिले प्रेम असेच.

ती अर्धी अर्धी वाक्ये,
    शब्दहि अर्धोच्चारित
भीत भीत बाहिर येई
    ते अर्धे निःश्वसित;
अर्धे स्मित, अर्धे हसणे,
    अर्धोन्मीलित अक्ष;
मृदु असुनी हृदयी शिरती
    ऐसे अर्धकटाक्ष;
अर्धे वर, अर्धे खाली
    केलेले मुखकमल
कुण्या सहृदयाचे सखये !
    कसे न हृदय हरील ?

मना हत्रे वाटे अजुनी
    हे सारे अर्धेच;
कारण की गोडी पहिल्या
    प्रेमाची तसलीच.

## सारेच गोड

**वा. ना. देशपांडे**

ऐकाया रात्री गोड
जेधवा रातकिडे
गातात चोहोकडे
जनी-वनी !

ऐकाया रात्री गोड
निनाद घंटिकांचा
गाईचा-वासरांचा
गोठ्यामधे !

ऐकाया रात्री गोड
आवाज तान्हुल्याचा
झोपेत हासण्याचा
पाळण्यात !

ऐकाया रात्री गोड
जेधवा परिचित
कंकणे वाजतात
शेजेपाशी !

## तिरस्कृत

**सी. बा. जोशी**

तुजला जग लोटिते दुरी म्हणुनी मीहि तसेच का करू ?
घडिला अपराध हा जरी अपुल्या प्रीतिस काय विस्मरू ?

जरि मोहक यौवनामधे चळले पाउल एकदा तव
अनुताप मनास जाळितो जननिंदा टळते न यास्तव !

भवती भडकून आग ही, जळती, मोहविले तुझे गुण,
जगता परि काय ते ? व्यथा बघुनी क्लेश मनास दारुण !

स्मित नाचतसे मुखावरी, परि पोटी दडले हलाहल
करुनी तिमिरात पापही, जन हे दूषिति चित्त निर्मळ !

जग वागतसे जरी असे म्हणुनी मीहि तसेच का करू ?
असहाय तमात लोटुनी तुज, मी प्रीतिस काय विस्मरू ?

## गेले ! ते दिन गेले !!

**भ. श्री. पंडित**

वेगवेगळी फुले उमलली
रचुनी त्यांचे झेले
एकमेकांवरी उधळले
गेले ! ते दिन गेले !!

कदंबतरुला बांधुन दोला
उंच-खालती झोले
परस्परांनी दिले-घेतले
गेले ! ते दिन गेले !!

हरित विलोरी वेलबुटीवरि—
शीतरसांचे प्याले
अन्योन्यांनी किती झोकले
गेले ! ते दिन गेले !!

निर्मलभावे नव देखावे
भरुनी दोन्ही डोळे
तू मी मिळुनी रोज पाहिले
गेले ! ते दिन गेले !!

## प्रीतिची हूल फुकट ना तरी !

**अनंत काणेकर**

' तू माझी अन् तुझा मीच ' ही खातर ना जोवरी,
प्रीतिची हूल फुकट ना तरी !

गालाला पडते खळी मला पाहुनी
ही नजर पाहते धरणी न्याहाळुनी
भयभीत प्रीत थरकते लीन लोचनी
ओठांची थरथरत पाकळी,— बोल गडे झडकरी
प्रीतिची हूल फुकट ना तरी !

जिवाजिवाची अभंग जडली जोड असे ही जरी
भीति मग कोणाची अंतरी ?

ही गाठ भिडेची तांत गळ्या लाविल
हिरव्यांची पिवळी पाने ही होतिल !
प्रीतिच्या फुलाचा वास उडुनि जाइल;
फसाल पुरत्या बसाल गाळित घळघळ अश्रूझरी
प्रीतिची हूल फुकट ना तरी !

## हा कोण पुरुष ?

**गणेश हरी पाटील**

हा कोण पुरुष ग माझ्या दारावरून
बेलगाम गेला दौडत वारूवरून ?

टक लावुन माझ्याकडे पाहिले हसून
अन् बिजलीवाणी गेला दृष्टीपुढून
जाताना बाई बघून मजला फिरून
स्वाराने नेले मानस माझे हरून
टपटपल्या टापा ऐकू येती अजून
धुरळ्यानं गेली पायवाट ही बुजून
मी डोळांभरुनी नाही पाहिला
हा जीव भुकेला बाई राहिला
हा कोण पुरुष ग माझ्या दारावरून
बेलगाम गेला दौडत वारूवरून ?

हे स्वप्न घडीचे पडून गेले उडून
आठवता येई पुरते नच आठवून
आंधळी जाहल्ये कशि पाहू न्याहळून
गत कशी करू, मी गेल्ये ग गोंधळून !
दडपली संधि ती येइल कैशी फिरून ?
धुरळ्याविण काही न दिसे मजला दुरून
हा असा पुरुष ग बाई मोहरा
मी नीट पाहिला नाही चेहरा
जीवाला चटका लावुन दारावरून
बेलगाम गेला दौडत वारूवरून !

ती मूर्ति मनातुन कधी न जाइल पुसून
गालीच्या गाली हसता हसता मधून

उमलले हासरे ओठ, शोभली खुलून
ती छटा गुलाबी फुगीर गालांवरून
चमचमले पाणी विशाल डोळ्यांमधून
जादूने भुलल्ये भोळी, गेल्ये दिपून
आठवते मजला बाई येवढे
मज ध्यान राहिले नाही यापुढे
हा कोण पुरुष ग माझ्या दारावरून
बेलगाम गेला दौडत वारूवरून ?

जाताना पाठीमागे दिसल्या दुरून
जर्तारि झिरमिळ्या फेट्याच्या भुर्भुरून
सर्वांग हले स्वाराचे बैठक ढळून
त्यासवे ताल दे ढाल पाठिवर डुलून
पण हेहि दिसाया कुठनं मजला उजून ?
धुरळ्यानं गेली पायवाट ही बुजून
मज दिशा शून्य या बाई भासती
मावळे न मनिची काही आस ती
की पुन्हा पुरुष तो माझ्या दारावरून
माघारा येइल दौडत वारूवरून !

## पाह्यलं ग दारी

**सोपानदेव चौधरी**

पाह्यलं ग दारी का हसूनि खुदकन् तरी ?
काल दुपारी विहिरीवरी
होती एकटी तू सामुरी
पाणी प्याया आलो परी
तोच सुकुमारी
पाण्याची चरवी
तुझिया करवी
पडली धरणीवरी !

गावरानच्या आम्राईत
पिकला आंबा तू चाखित
पहात होतिस ना जम्मत ?
फिरुनि माघारी
आंब्याचा सगळा
रस ओघळला
तुझिया पदरावरी !

बसलो होतो वरुळीवरी
आभाळ वरती गडगड करी
पाउस आला सरिवर सरी
चमचमणारी
ती वरची विजली
तूच भासली
मजला भ्गरीवरी !

परवा येइल पोळा सण
आणिन परधान्या सजवुन

मुळिही येउ नको गे पण
 पुढल्या दारी
 मी येइन मागुन
 हळूच सांगिन
 गुपित तुला सुंदरी !

होइल ना मग व्हावे तसे ?
ना तरि होइल माझे हसे
त्यातुनि शेजारी हे असे
 संशयी भारी
 का मन बावरते ?
 खळबळ उडते
 सखये हृदयांतरी !

## उत्तररात्र

**रॉय किणीकर**

मृद्‌गंध उमलला आले मृगनक्षत्र
चालली अवेळी ओलेती अपरात्र
वाकली जरा पिळताना ओला पदर
आतून जरासे हलले अर्धे दार

चांदणे सांडले गालावरती चित्र
पदरात झिरपले पुनवेचे प्रतिबिंब
दे भरुनि आणखी, पुन्हा भरू दे पेला
एकदाच आला क्षण गेला तो गेला

हा असा राहु दे असाच खाली पदर
हा असा राहु दे असाच ओला अधर
ओठांत असू दे ओठ असे जुळलेले
डोळ्यांत असू दे स्वप्न निळे भरलेले

ही रात्र आजची पुन्हा न भेटायाचे
हे दार आतुनी पुन्हा न लागायाचे
मिटु नकोस डोळे अर्ध्यावर मिटलेले
पुसु नकोस ओघळ स्वप्नांचे फुटलेले

काळोख खुळा अन् खुळीच काळी राणी
संकोच मावला मिठीत सुटली वेणी—
अंजिरी चिरी विस्कटे, सुटे निरगाठ
ओठांत चुंबने भरली काठोकाठ

## संगीतपरिणती

**दा. अ. कारे**

निःस्तब्ध रहा क्षणि या, प्रणया
मौनात बोलु दे निज हृदयां !

पुसट दूर गिरि क्षितिजी दिसती
तरुतळि छाया अचल पहुडती
खुले सृष्टिची अस्फुट नव्रती
चांदण्यात एकांतामधि या !

भिडव नयन तव मदीय नयनी
हृदयज्योतिचे तुझ्या त्यातुनी
स्निग्ध तेज मम नयनि बिंबुनी
ते स्तिमित डोलु दे गुंगुनिया !

कर दे राहू मम करयुगुली
झुळुकांनी तनुवेल थरकली
पुलकफुलांनी क्षणात फुलली
ही केवि कुणी केली किमया ?

जन्म जन्म दुर्मिळ, ये घडि ती
हृदये अपुली द्रुत धडधडती
काय वदाया गुज धडपडती ?
भाषा कळुनी न कळे उभयां !

मौन न हे संगीतपरिणती
हृदयकलशि हो स्वरजलभरती
उसव न आता उद्गारांप्रति
स्वरकंप नसनसी अनुभवु या !

## जात्यावरलं गाणं

**ग. ल. ठोकळ**

झुंजु मुंजु झालं, सुकदेव वर आला
पहाटंचं वारं कसं झोंबतं अंगाला

परसात माझ्या आरवतंय कोंबडं
लई वक्त झाला, आता फुटंल तांबडं

केधुळ वढत्ये बाई जातं घरघर
पारुसं ग काम माझं पडलं घरभर

देवळीत जळे पणती ग मिणमीण
भळभळ गळे पीठ कसं जात्यातून

अवंदाचं साल न्हाई आलं पीकपाणी
दूरदेशी गेला बाई माझा घरधनी

दूरदेशी गेला मला एकली टाकून
तिठं न्हाई त्येला जीव लावायला कोण

राया, डोळ्यांमंदी तुझ्या मोतीयाचं पाणी
राया, तुझा रंग जवसाच्या फुलावाणी

तुझ्या डोईवर अक्षी पागूटं कुसुंबी
तुझं वठ बाई जशी फुलली दाळिंबी

राया, तुझं दात जसं धुतलं तांदूळ
तुझ्यासाठी मला जणू भरलंया खूळ

तुझ्या बिगर रे, मला घासही जाईना
तुझ्या बिगर रे, मला पाणीही घोटंना

तुला आवडतो हुळा भुजून ठीवला
कसं करू बाई, सम्दा वाळून चालला

कवाशीक याल माझ्या कुडीतल्या जीवा ?
कवाशीक याल माझ्या देवाच्या बी देवा ?

## दवात आलिस भल्या पहाटी

**बा. सी. मर्ढेकर**

दवात आलिस भल्या पहाटी
शुक्राच्या तोऱ्यात एकदा;
जवळुनि गेलिस पेरित अपुल्या
तरल पावलांमधली शोभा.

अडलिस आणिक पुढे जराशी
पुढे जराशी हसलिस,— मागे
वळुनि पाहणे विसरलीस का ?
विसरलीस का हिरवे धागे ?

लक्ष्य कुठे अन् कुठे पिपासा,
सुंदरतेचा कसा इशारा;
डोळ्यांमधल्या डाळिंबाचा
सांग धरावा कैसा पारा !

अनोळख्याने ओळख कैशी
गतजन्मांची द्यावी सांग;
कोमल ओल्या आठवणींची
येथल्याच जर बुजली रांग !

तळहाताच्या नाजुक रेषा
कुणि वाचाव्या, कुणी पुसाव्या;
तांबुस निर्मल नखांवरी अन्
शुभ्र चांदण्या कुणि गोंदाव्या !

दवात आलिस भल्या पहाटी
अभ्रांच्या शोभेत एकदा;
जवळुनि गेलिस पेरित अपुल्या
मंद पावलांमधल्या गंधा.

## भटकत फिरलो भणंग आणिक

**बा. सी. मर्ढेकर**

भटकत फिरलो भणंग आणिक
मिळेल तेथे पाणी प्यालो;
जुळेल तेथे खूण जुळविली
तरि होतो हा तसाच उरलो.

शिंपित आलिस तीच माधुरी
सहज नाचऱ्या डोळ्यांमधली,
सांडावी जशि थेंबाची सर
चांदण्यात कुणि झाडावरली.

आणि कालची तहान मेली
गळ्यात कोरड दुसरी आज;
व्यर्थ नव्हे का ओंजळ जेथे
शरीर सारे म्हणते पाज !

ओठ वाळला कालचाच जरि
आज निराळी लाही त्यावर;
शब्दांचे कुणि करोत चमचे,
'आ' बनले हे सारे अंतर !

## झाली चूक ! – क्षमस्व !

**बा. सी. मर्ढेकर**

झाली चूक ! -क्षमस्व ! वेड असले जन्मातुनी लागते,
तेही एकच वेळ ! नेत्र उघडे ठेवून ना दोनदा
मौर्ख्याचा जगणे कलंक न असा लावून घेता कदा,
सर्वांनाच कुठे शहाणपण हे देवाघरी लाभते !

ज्यांना संकट, दु:ख, भीति अथवा चिंता, निराशाच ना,
ज्यांचे खोल न जीवनानुभव गे, ज्यां भावना वावडी,
टक्के वा नच टोणपे पचविले, – प्रज्ञा तयांची बडी ! !–
त्यांनी योग्यच हासणे, हिणविणे, संतप्त कष्टी जनां

बेमालूमपणे बनावट अशा नाण्यांतुनी संपदा
घ्यावी साठवुनी अचूक ! शिकलो नाही परी ही कला
घामाने भरले कपाळ, सुकली ही जीभ ! शोधी जला
आशेने, हळु ओठ लागति जरी.शेवाळल्या फत्तरा !

प्रीतीची नच आंच !–सावधपणे सांभाळणे कातडी,
सर्वांनाच अशी करामत कुठे ! जाती जळूनी मढी.

## नदी किनारी

**ना. घ. देशपांडे**

नदी किनारी, नदी किनारी, नदी किनारी, गऽ !
अवतीभवती नव्हते कोणी;
नाचत होत्या राजसवाणी —
निळ्या जळावर सोनसळीच्या नवथर लहरी, गऽ !

जरा निळ्या अन् जरा काजळी
ढगात होती सांज पांगली
ढवळी ढवळी वर बगळ्याची संथ भरारी, गऽ !

दुसरे तिसरे नव्हते कोणी;
तुझेच हसले डोळे दोन्ही :
अवखळ बिजली भरली माझ्या उरात सारी, गऽ !

सळसळली, गऽ, हिरवी साडी;
तिनेच केली तुझी चहाडी :
फडफडल्या पदराच्या पिवळ्या लाल किनारी, गऽ !

वहात होते पिसाट वारे;
तशात मी उडविले फवारे :
खुलून दिसली तुझ्या उराची नवी थरारी गऽ !

कुजबुजली भवताली राने,
रात्र म्हणाली चंचल गाणे :
गुडघाभर पाण्यात दिवाणे दोन फरारी, गऽ !

नदी किनारी, नदी किनारी, नदी किनारी, गऽ !

## काळ्या गढीच्या जुन्या ओसाड भिंतीकडे

**ना. घ. देशपांडे**

काळ्या गढीच्या जुन्या ओसाड भिंतीकडे
आलीस तू एकटी बांधून सारे चुडे

वारा किती मंद, गऽ!
होते किती कुंद, गऽ!
होता किती धुंद, गऽ, अंधार मागेपुढे

काळी निनावी भिंती
होती उभी भोवती;
वाटेत होते किती काटेकुटे अन् खडे!

होऊन वेडीपिसी
आली अवेळी अशी :
नाजूक प्रीती तुझी : धारिष्ट्य हे केवढे!

माझी तुझी चोरटी
जेव्हा मिळाली मिठी
झाले जगाचे कडे माझ्यातुझ्याएवढे

हुंकारला पारवा :
तेजाळला काजवा;
हातून गेला जरा काळोख चोहूकडे!

## बकुलफुला

**ना. घ. देशपांडे**

सात जन्मांची निनावी आशा धरून मनात
बकुलफुला, कधीची तुला धुंडते बनात !

टाकून दूर नदीच्या पार
उघडे माझ्या घराचे दार
सदैव पिशी हिंडते अशी निःसंगपणात :
बकुलफुला, कधीची तुला धुंडते बनात !

टाकून सारा शृंगारसाज
तुझ्याचसाठी फिरते आज
होईल कसे : झाले रे हसे सगळ्या जनांत !
बकुलफुला, कधीची तुला धुंडते बनात !

श्रावणघनगर्जन वाजे :
दिपव दोन्ही नयन माझे—
एका आंधळ्या गहन निळ्या सोनेरी क्षणात
बकुलफुला, कधीची तुला धुंडते बनात !

## स्मृती

**बा. भ. बोरकर**

लोचनी ये आज पाणी त्वत्स्मृतीने साजणी
भैरवी आलापिते ही रात्र येथे चांदणी

सूर ओथंबून कंठी कर्दळी भारावल्या
मुग्ध झाडांच्या तळी भांबावल्या या सावल्या

स्वैर एकाकी भ्रमे दिङ्मूढ वेडा काजवा
खिन्न झाला दोडकीच्या स्वप्नपुष्पांचा थवा

साचले पाणी इथे अन् त्यात गोठे चांदणे
आसवांच्या या जिण्याला मौज ना स्वप्नाविणे

योजने लंघून राहे स्वप्न माझे देखणे
सुस्मृतींची चालवितो येथ मी पारायणे

या गवाक्षातून तू मी चंद्र होता देखिला
चुंबनाचा पाठ आम्ही त्याजला होता दिला

ओतिली त्याने सदा हर्षे सुधा सृष्टीवर
तीहुनीही गोड आम्ही वर्षिले सप्तस्वर

रात होता शांत सारी, गाल गालां लाविले
भोगिले ऐश्वर्य सारे स्पर्शसंगीतातले

मेघ वेगे पांगले अन् वायु झाला शीतळ
विश्वही झाले निळे अन् लोचनी आले जळ

आजही ये तेच पाणी दूर तू गे साजणी,
दूर तू, छे ! जिवाला राहसी आलिंगुनी

रात्र गाई भैरवी ही गोड वाटे सुस्वर
आणि अश्रूंतूनही हे दृश्य हो चेतोहर

## मंद असावे जरा चांदणे

### बा. भ. बोरकर

मंद असावे जरा चांदणे, कुंद असावी हवा जराशी
गर्द कुंतली तुझ्या खुलाव्या शुभ्र फुलांच्या धुंद मिराशी

दूर घुमावा तमात पावा, जवळच व्याकुळ व्हावे पाणी
तूहि कथावी रुसुन अकारण सासू-नणदांची गाऱ्हाणी

सांगावे तू दुःख आगळे माझ्यासाठी गिळिले कैसे
आणि आंधळ्या भलेपणी मी तुला केधवा छळिले कैसे

उदासता अन् सुखात, कोठे कौलारावर धूर दिसावा
असे निसटते बघून काही विषाद व्हावा जिवा विसावा

मंद असावे जरा चांदणे, कुंद असावी हवा जराशी
करुणाभरल्या मुकाटपणि अन् तुला धरावे जरा उराशी

## जपानी रमलाची रात्र

बा. भ. बोरकर

तुझे विजेचे चांदपाखरू दीपराग गात
रचीत होते शयनमहाली निळी चांदरात
रतिरत कुक्कुटसा कुंडीवर आरोहुनि माड
चोच खुपसुनी फुलवित होता पंखाचे झाड
अद्‌भुत पंख्यापरि भिंतीवर आंदोलुनि छाया
लावित होती ताप जगाचा नकळत विसराया
धूप उसासत होता कोनी रजताच्या पात्री
विचित्र रेशिमचित्रे होती रसावली गात्री
तुझा पियानो यक्ष जळातिळ होता निजलेला
मनात गुंफित स्पर्शसुखाच्या स्वप्नांचा झेला
अन्‌ म्यूसेची कवने होती माझ्या हातात
प्रतिचरणाला करीत होती धूम्रवेल साथ
जळत उसासत होते त्यासह अंतरात काही
होता चिमणा श्वान लोकरी घोटाळत पायी
तोच वाजल्या तुझ्या सपाता सळसळला घोळ
आलिस मिरवित चालीमधुनी नागिणिचा डौल
करांतुनी तव खिदळत आले स्तनाकार पेले
जळता गंधक पाच उकळती यांहि रंगलेले
अभीष्ट चिंतुनि आम्ही त्यांचे भिडवियले काठ
सुरेहुनी तू गडे भाजिले ओठांनीं ओठ
स्पर्शे तुझिया आणि पियानो थरारला सारा
मजसम त्याच्या कानशिलांच्या झणाणल्या तारा
गंधर्वांच्या दुहिता जमल्या करित पुष्पवृष्टी
हृदय मदाचे मोहोळ झाले जडावली दृष्टी
पोहु लागले तुझ्या रेशमी अलकांतिल मासे
हवा जाहली जड पाऱ्यासम अंगातिल वासे

आणि तरंगत डुलू लागली नौकेपरि शेज
तो कांतीतुन तुझ्या निथळले फेनाचे तेज
नखे लाखिया, दात मोतिया, वैदूर्यी नेत्र
अवयव गमले चपल चिवट की मयवनिचे वेत्र
कात सोडिल्या नागिणिचे ते नवयौवन होते
विळख्याविळख्यांतुनि आलापित ज्वालांची गीते
गरळ तनूतिल गोठुनि झाले अंतरात गोड
कळले का मज जडते देवा नरकाची ओढ
डोळे बांधुनि खेळत होते जीवन मायावी
अंधपणातच वितळत होते भूत आणि भावी
तुझ्या जपानी भाषा-लिपिसम अगम्य सुंदरता
असुनी हाती उरली दुर्लभ आली ना हाता

आजहि तुज शोधिता कधी ती रमलाची रात
पाठीतुनि जंबिया मधाचा घालि काळजात !

## त्या तिथे, पलीकडे, तिकडे

**पु. शि. रेगे**

नेहमीच शोभुन दिसला
पोशाख तुला जो काळा
        लेवून तुझा तो गडे,
            असशीलहि का तू पुन्हा
        त्या तिथे, पलिकडे, तिकडे ?

ठाऊकहि ज्यांना सगळे
ते निळे टपोरे डोळे
        लावून दूर मजकडे,
            असशीलहि का तू तशी
        त्या तिथे, पलिकडे, तिकडे ?

मुइकमळांचे तव हात,
येताच जवळ मी आर्त,
        पसरून तसे ते पुढे,
            असशीलहि का तू उभी
        त्या तिथे, पलिकडे, तिकडे ?

चिरवंचित हृदयापाशी
ठेवून फुले ती बाशी,
        विसरूनहि हासू, रडे,
            असशीलहि का तू पुन्हा
        त्या तिथे, पलिकडे, तिकडे ?

## त्रिधा राधा

**पु. शि. रेगे**

आकाश निळे तो हरी
अन् एक चांदणी राधा—
बावरी
युगानुयुगिची मन-बाधा.

विस्तीर्ण भुई गोविंद
अन् क्षेत्र साळिचे राधा—
संसिद्ध
युगानुयुगिची प्रियंवदा.

जलवाहिनि निश्चल कृष्ण,
वन झुकले काठी राधा—
विप्रश्न
युगानुयुगिची चिरतंद्रा.

## शेवगा

पु. शि. रेगे

दोन प्रहर. निवांत सारे.
श्रमभराने बाजेवरती
        पांगुळलेली तू.
खिडकीबाहेर ढाळितो चवरी
आसुसलेला शेवगा दारचा.

# शुभ्र पांढरी कापुसबोंडे

**भा. रा. लोवलेकर**

शुभ्र पांढरी कापुसबोंडे बहरुनि आली तोडीला
तुझ्यासारखी हसतमाधुरी सखी जिवाच्या जोडीला !

टपोर बोरे जाळीमाजी घोसयुक्त श्रीमंत बरी
निळी, बादली, पिवळी खुलती रानफुले तांबुस गहिरी

पलीकडे मिश्चास सळसळे गर्द ओलसर ऊसमळा
तुझ्या जिवावर मोहनराणी आज पसारा हा सगळा

मोट कुऱ्यावर चुरुचुरु चाले गडी खपे ग दिवसभरी
ओले आले पिकले रानी, केळफुले रमती भ्रमरी

ऊर भरभरे नव्या उमेदी स्वप्नभराने हुंदळती
स्वप्न असे फलदायी करणे खरेखुरे तुझिया हाती

शरन्मेघ चुंबुनी उभेला लाख वैभवे आणि नभी
स्वप्नमेघ चुंबुनी साजणी अमित वैभवे करिसि उभी

मुक्काट येउनि मूर्त तुझी मज रात्रभरी बेचैन करी
आणि पहाटे प्रत्यक्षासी गाठ पडे प्रेमळ गहिरी

जंगलीच मी, वनराणी तू प्रेमाची हंगाम घडी
अखंड सौंदर्ये अमूर्त जगते आज इथे झाली उघडी !

## पालख्या

**मनमोहन**

अबिराच्या उधळण्यातून दोन्ही पालख्या
तशा कुंतलसंभारात गुदमरलेल्या दोघांच्या
श्वासांनी श्वासांच्या पालख्या मिरवताहेत
तुझे केस चवरीसारखेच माझ्यावर.

प्रेमाच्या या पालखीत मी गातो आहे
दोन्ही मुठींत धरलेले केसांचे गोंडे तालात हिसकतो
तुझे स्फुरित अधर आईची आठवण करीत आहेत
मोहाच्या पैलतीरावर पालखी चालली आहे.

चंद्रभागेला आता पूर आलेला आहे
आता माझ्या खांद्यावर तू पालखी दिलीस
केसांचे फटकारे लीलेने तोंडावर मारीत
लवकर चालण्याचा तू मला आग्रह करतेस.

आता तुझे लांबलचक काळे कुरळे केस
हात भाजण्याइतके गरम गरम झाले आहेत.

## पृथ्वीचे प्रेमगीत

**कुसुमाग्रज**

युगामागुनी चालली रे युगे ही
        करावी किती भास्करा वंचना
किती काळ कक्षेत धावू तुझ्या मी
        कितीदा करू प्रीतिची याचना .

नव्हाळीतले ना उमाळे, उसासे
        न ती आग अंगात आता उरे
विझोनी अता यौवनाच्या मशाली
        उरी राहिले काजळी कोपरे !

परी अंतरी प्रीतिची ज्योत जागे
        अविश्रांत राहील अन् जागती;
न जाणे न नेणे कुठे चालले मी
        कळे तू पुढे आणि मी मागुती !

दिमाखात तारे नटोनी थटोनी
        शिरी टाकिती दिव्य उल्काफुले
परंतू तुझ्या मूर्तिवाचून देवा,
        मला वाटते विश्व अंधारले !

तुवा सांडलेले कुठे अंतराळात
        वेचूनिया दिव्य तेजःकण
मला मोहवाया बघे हा सुधांशू
        तपाचार स्वीकारुनी दारुण.

पिसारा प्रभेचा उभारून दारी
        पहाटे उभा शुक्र हा प्रेमळ
करी याचना प्रीतिची लाजुनी लाल
        होऊनिया लाजरा मंगळ.

निराशेत संन्यस्त होऊन बैसे
ऋषींच्या कुळी उत्तरेला ध्रुव
पिसाटापरी केस पिंजारुनी हा
करी धूमकेतू कधी आर्जव !

परी भव्य ते तेज पाहून पुजून
घेऊ गळ्याशी कसे काजवे ?
नको क्षुद्र शृंगार तो दुर्बळांचा
तुझी दूरता त्याहुनी साहवे !

तळी जागणारा निखारा उफाळून
येतो कधी आठवाने वर
शहारून येते कधी अंग तूझ्या—
स्मृतीने उले अन् सले अंतर !

गमे की तुझ्या रुद्ररूपात जावे
मिळोनी गळा घालुनीया गळा
तुझ्या लाल ओठांतली आग प्यावी
मिठीने तुझ्या तीव्र व्हाव्या कळा !

अमर्याद मित्रा, तुझी थोरवी अन्
मला ज्ञात मी एक धूलीकण
अलंकारण्याला परी पाय तुझे
धुळीचेच आहे मला भूषण !

## स्वप्नाची समाप्ती

**कुसुमाग्रज**

स्नेहहीन ज्योतीपरी
        मंद होई शुक्रतारा
काळ्या मेघखंडास त्या
        किनारती निळ्या धारा.

स्वप्नासम एक एक
        तारा विरे आकाशात
विरे रात्र कणकण
        प्रकाशाच्या सागरात.

काढ सखे गळ्यातील
        तुझे चांदण्याचे हात
क्षितिजाच्या पलीकडे
        उभे दिवसाचे दूत.

रानपाखरांचा आर्त
        नाद नच कानी पडे
संपवुनी भावगीत
        झोपलेले रातकिडे.

पहाटेचे गार वारे
        चोरट्याने जगावर
येती, पाय वाजतात
        वाळलेल्या पानांवर.

शांति आणि विषण्णता
        दाटलेली दिशांतून
गजबज गर्जवील
        जग घटकेने दोन !

जमू लागलेले दव
गवताच्या पातीवर
भासतसे भू तारकांच्या
आसवांनी ओलसर.

काढ सखे, गळ्यातील
तुझे चांदण्याचे हात
क्षितिजाच्या पलिकडे
उभे दिवसाचे दूत.

प्राजक्ताच्या पावलाशी
पडे दूर पुष्प-रास
वाऱ्यावर वाहती हे
त्याचे दाटलेले श्वास.

ध्येय, प्रेम, आशा यांची
होतसे का कधी पूर्ती
वेड्यापरी पूजतो या
आम्ही भंगणाऱ्या मूर्ती.

खळ्यामध्ये बांधलेले
बैल होवोनिया जागे
गळ्यातील घुंगुरांचा
नाद कानी येऊ लागे.

आकृतींना दूरच्या त्या
येऊ लागे रूप रंग
हालचाल कुजबूज
होऊ लागे जागोजाग.

काढ सखे गळ्यातील
तुझे चांदण्याचे हात

क्षितिजाच्या पलिकडे
उभे दिवसाचे दूत.

होते म्हणू स्वप्न एक
एक रात्र पाहिलेले
होते म्हणू वेड एक
एक रात्र राहिलेले.

प्रकाशाच्या पावलांची
चाहूल ये कानांवर
ध्वज त्याचे कनकाचे
लागतील गडावर.

ओततील आग जगी
दूत त्याचे लक्षावधी
उजेडात दिसू वेडे
आणि ठरू अपराधी.

## तरीही केधवा

**कुसुमाग्रज**

दोघांत आजला
अफाट अंतर
जुळून पाकळ्या
उडाल्या नंतर—

जीवनावाचून
जळला अंकुर
प्रश्नही राहिला
राहिले उत्तर !

संग्रामी आजला
शोधतो जीवित
उरीचे ओघळ
दाबून उरात—

उठती भोवती
धुळीचे पर्वत
अखंड फिरते
वरून करवत !

वादळी रणात
करणे कोठून
नाजुक भावाचे
लालनपालन—

तरीही केधवा
पडता पथारी
थडगी दुभंग
होतात अंतरी—

आठवे तुझ्या ते
प्रीतीचे मोहळ
आणि हो बिछाना
आगीचा ओहळ !

## त्या तरुतळी विसरले गीत

**वा. रा. कान्त**

त्या तरुतळी विसरले गीत
हृदय रिकामे घेउनि फिरतो इथे तिथे टेकीत !

मुक्या मना मग भार भावना
स्वरांतुनि चमकते वेदना
तप्त रणे तुडवीत हिंडतो ती छाया आठवीत
त्या तरुतळी विसरले गीत !

विशाल तरु तरी फांदी लवली
थंडगार घनगर्द साउली
मनिची अस्फुट स्मिते झळकती तसे कवडसे तीत
त्या तरुतळी विसरले गीत !

हिरवळ-तृप्तिच जशी पसरली
फुले अनामिक त्यात विकसली
निळेभोर अव्याज गगन वर हसते ढग पिंजीत
त्या तरुतळी विसरले गीत !

जवळ टेकडित झरा झाकला
कसा तरी वाहतो खळखळा
निकट जिवाची पुरति न कळली जशी संभ्रमित प्रीत
त्या तरुतळी विसरले गीत !

मदालसा तरुवरी रेलुनी
वाट बघे सखि अधिर लोचनी
पानजाळि सळसळे, वळे ती मथित हृदय कवळीत
त्या तरुतळी विसरले गीत !

पदर ढळे कचपाश भुरभुरे
नव्या उभारित उर थरथरे
अधरी अमृत उतू जाय परि पदरी हृदय व्यथीत
त्या तरुतळी विसरले गीत !

उभी उभी ती तरुतळि शिणली
भ्रमणी मम तनु थकली गळली
एक गीत– परि चरण विखुरले द्विधा हृदयसंगीत
त्या तरुतळी विसरले गीत !

## जोगी

**वा. रा. कान्त**

यांतील तुझे घर वद कुठले ?
बुडता दिस हे नगर गवसले

फिरलो भ्रमलो बिदीबिदीतुनि
साद घातली सदनी सदनी
पडसादहि नच उठले फिरुनी

सुने सुने पथ नेत्रचि भिजले
यांतील तुझे घर वद कुठले ?

धूसर काळी भयाण वसती
मुके गवाक्षी दीप उजळती
प्रतीक्षेत जणु हृदये जळती

बघ पश्चिमेतुनी घन उठले
यांतील तुझे घर वद कुठले ?

दिशा ढगे भारावुन गेल्या
गात्र वादळी हल्ला फुटला
धरिला तरुही पथि उन्मळला

वीजपदर चाटून चालले
यांतील तुझे घर वद कुठले ?

दिवाही न घरि तुवा लाविला
खूण ठेविला नच फुलझेला
का शून्यी बोलविले मजला ?

परतता नगरदारहि मिटले
यांतील तुझे घर वद कुठले ?

## ते न तिने कधि ओळखिले

**बी. रघुनाथ**

ते न तिने कधि ओळखिले
दिले उशाला काळिज ठेवुन स्पंदनात पण ते दुखले

हिरमुसलेली विहिरीकाठी
विहिरित पडल्या पोहऱ्यासाठी
भेट प्रथम ही; घटातून मग तिने हिसळवित चालविले.

पथात शोधित तिची पाउले
फिरत राहिलो देवदेवळे
माग घेत कधि कधि मार्गावर पथदीपापरि मन जळले.

आम्ल फळास्तव आसुसलेली
तिची अडाणी वृत्ति न रुचली,
मधुर फळांचे भावधर्मरस तिज दाखविले, चाखविले.

कधि यात्रेच्या गर्दीमधुनी
तिची टाकिली वाट चुकवुनी
बावरल्या हरिणीस मनोगत स्पर्शजलातुनि कळवियले.

सामसूमल्या अपरात्रीतुन
टिचकविले हळु दार बाहिरुन;
होते जेव्हा परस्परांच्या पिसांत पंछी शहारले.

आवड पाहुन तिची फुलांची
फुलांत यौवन सजवायाची
आज तिच्या वाटेवर अंतर काट्यावरती आंथरले
ते न तिने कधि ओळखिले.

## आठवतं फक्त

**पद्मा**

तू माझ्या केसांवर ओठ टेकले होतेस का ?
आठवत नाही :
पण जाणवतात फक्त दोन चंद्र-सूर्य झगमगणारे
आणि कपाळावर भांगापाशी झिळमिळणारं
जडावाचं फूल.

तू माझ्या डोळ्यांत पाहिलं होतंस का ?
आठवत नाही :
पण आठवतात दोन अथांग समुद्र
ज्यात हसत होती कमळंच कमळं
मला पाकळ्यांत झेलून घेणारी.

तू मला हाक मारली होतीस का ?
आठवत नाही :
पण आठवते एक मालकंसाची धुंद गत
अनावरपणे माझ्या सतारीला छेडून जाणारी

पण....पण तू आलाच होतास का ?
आठवत नाही :
आठवतं फक्त पहाटेचं धुकं आणि...
आणि त्यात अलगद मिसळू पहाणारा
अंधुक अंधुक शुक्रतारा !

## चंद्रकोर

इंदिरा

आठवते प्रेम तुझे :
पूर्ण चंद्र पौर्णिमेचा
तसा तुझा सहवास
झिरझिरी चांदण्याचा !

चांदण्याची दुरावण
आहे तशीच सुंदर
हृदयाच्या काठावरी
टेकलेली चंद्रकोर !

चंद्रकोरीची जखम
ताजी सदा हृदयात;
उजळते तिच्यातून
क्षीण चांदण्याचे रक्त !

## कुब्जा

**इंदिरा**

अजून नाही जागी राधा
अजून नाही जागे गोकुळ;
अशा अवेळी पैलतिरावर
आज घुमे का पावा मंजुळ.

मावळतीवर चंद्र केशरी
पहाटवारा भवती भणभण;
अर्ध्या पाण्यामधे उभी ती
तिथेच टाकुन अपुले तनमन.

विश्वच अवघे ओठां लावुन
कुब्जा प्याली तो मुरलीरव;
डोळ्यांमधुनी थेंब सुखाचे
"हे माझ्यास्तव...हे माझ्यास्तव..."

## येतिल दोनच हिरवी पाती

**इंदिरा**

रुतत चालले तिळातिळाने;
रुतले तळवे, रुतले पाउल,
रुतले पायहि...उभी तशी मी
बावरलेली, त्या वाळूवर...

दिशादिशांची सुटली जाणिव;
क्षितिजाचे हो नयनी काजळ;
हृदयापाशी स्वप्ने ताजी,
लाट वाळुची अन् ओठावर.

येशिल कधि तरि, दिसेल तेव्हा
अफाट वाळू ... उन्हाखालती;
तुझ्या पावला भेटाया परि
येतिल दोनच हिरवी पाती.

# विसरलेली ओळख

**श्रीनिवास पाटणकर**

नयनांच्या तव शांत सागरी लहर विहरते निळी
खुले मम हृदयी कोमल कळी
आनंदाचा नाच चालला नाजुक लहरीसवे
कळीतुन कुसुम उमलले नवे

हृदया लागे कसलीशी मग गोड ओढ अंतरी
नजर तव जादू का मंतरी
उन्मादाने कुसुम उडाले देठापासुन वरी
बुडाले शांत नील सागरी

आता तर ते तरते तुझिया नाजुक नजरेवरी
तयाला तूच कसे सावरी
तव नयनातिल तरल तरंगी फिरता फिरता मला
कशाचे भान नुरे आजला.

चंद्रदर्शने प्रेमसागरा भरती येईल ना
सुखाने घ्याया आंदोलना
खडकावरती मला न देई लाटेवर लोटुनी
रमू दे प्रेमळ आंदोलनी.

प्रेमभरे हृत्कुसुम अर्पितो एक आस अंतरी
तरावे प्रेमप्रवाहावरी
तरत तरत ते अविरत जावे अनाद्यंत अंतरी
न लागो तीरच कल्पांतरी

## शांत सागरी कशास

**संजीवनी**

शांत सागरी कशास उठविलीस वादळे ?

काय हे तुझ्यामुळे
देहभान हरपले
युगसमान भासतात आज नाचरी पळे.

अमृतमधुर बोल एक
श्रवणि जो न पाडिलास
अधिरता भरे जिवात केवढी तयामुळे.

निमिषमात्र लोचनांत
दिव्य तेज दाविलेस
भडकुनी तयेच वन्हि जीव आतला जळे.

पढविल्या वदे वचांस
बद्ध त्या विहंगमात
गायिलेस तू कशास गीत नंदनातले ?

स्वर्ग कल्पनेतला
येइल कधि भूतला
दिवसरात्र अंतरात आस ही उचंबळे,
शांत सागरी कशास उठविलीस वादळे ?

## तू उरतेस

**वि. म. कुलकर्णी**

तापलेला दिवस मावळतो
रात्र अवतरते
जडावर अंधाराची माया पसरते

तुझे माझे
दिसाभराचे, ताणलेले
रागद्वेष
हलके मावळतात ...
आणि
निखळ तू उरतेस
तारकामयी !

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
काव्य
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

कोऱ्या चंद्रकलेची
सळसळ लेवून
मनाच्या दारवंठ्याशी
उभी राहतेस !

## झपताल

### विंदा करंदीकर

ओचे बांधून पहाट उठते... तेव्हापासून झपाझपा वावरत असतेस.
...कुरकुरणाऱ्या पाळण्यामधून दोन डोळे उमलू लागतात;
आणि मग इवल्या इवल्या मोदकमुठींतून तुझ्या स्तनांवर
बाळसे चढते, उभे नेसून वावरत असतेस. तुझ्या पोतेऱ्याने
म्हातारी चूल पुन्हा एकदा लाल होते. आणि नंतर
उगवता सूर्य दोरीवरील तीन मुतेले वाळवू लागतो;
म्हणून तो तुला हवा असतो ! अधूनमधून तुझ्या पायांमधे
माझी स्वप्ने मांजरासारखी लुडबुडत असतात; त्यांची मान
चिमटीत धरून तू त्यांना बाजूला करतेस. तरी पण
चिऊकाऊच्या मंमंमधील एक उरलेला घास त्यांनाही मिळतो.
तू घरभर भिरभिरत असतेस; लहान-मोठ्या वस्तूंमधे
तुझी प्रतिबिंबे रेंगाळत असतात... स्वागतासाठी ‘सुहासिनी’ असतेस;
वाढताना ‘यक्षिणी’ असतेस; भरवताना ‘पक्षिणी’ असतेस;
साठवताना ‘संहिता’ असतेस; भविष्याकरता ‘स्वप्नसखी’ असतेस.
... संसाराच्या दहाफुटी खोलीत दिवसाच्या चोवीस मात्रा
चपखल बसवणारी तुझी किमया मला अजूनही समजलेली नाही.

## प्रेम करावे असे, परंतू ....

**विंदा करंदीकर**

हिरवे हिरवे माळ मोकळे
ढवळ्या ढवळ्या त्यांवर गाई;
प्रेम करावे अशा ठिकाणी
विसरुनि भीती विसरुनि घाई.

प्रेम करावे, रक्तामधले
प्रेम करावे शुद्ध, पशूसम;
शतजन्मांच्या अवसानाने
रक्तामधली गाठावी सम.

प्रेम करावे मुके अनामिक;
प्रेम करावे होउनिया तृण;
प्रेम करावे असे, परंतू...
प्रेम करावे हे कळल्याविण.

## मुक्तीमधले मोल हरवले

**विंदा करंदीकर**

मुक्तीमधले मोल हरवले;
जेव्हा केलिस
गोकुळातली पहिली चोरी
मिसळलास तू काजळकाळा,
आणि गढुळले मी हिम-गोरी.

तुझ्या कृपेचे कृपाण प्याले
कमल होउनी; मधुर-डंखसे
अन् भिजलेल्या पदरामधुनी
गंध सांडला तमपुष्पाचा
तुझ्या अधाशी उग्र नखांवर

तेव्हापासुन साठवते मी
आठवणींच्या परडीमध्ये,
भरदार तुझ्या
छातीवरचे कुरळे पौरुष,
दंडामधली दणकट आशा,
भुवईच्या त्या दटावणीसह.

मुक्तीमधले मोल हरवले
यमुनातीरी;
शब्द हरवले, बनले मोनी
तेव्हापासुन, तेव्हापासुन
साठवते मी आठवणीतच
गोकुळातले दहि-दुध-लोणी.

## साताऱ्याची तऱ्हा

**ग. दि. माडगूळकर**

घोळ निऱ्यांचा पदी अडखळे, जलद चालणे जरा
दिसे ही साताऱ्याची तऱ्हा

तुरुतुरु चालसी नारी, चवड्यांवरी ग
उमटती फराटे पाउलवाटेवरी ग
येतसे कुणी का मागुन मागावरी ग ?
पदराआडच अरधामुरधा लपे तुझा चेहरा
दिसे ही साताऱ्याची तऱ्हा

डोळ्यांत बावळा अजुन नेणतेपणा ग
भाबड्या मुखावर गोंदवणाच्या खुणा ग
डोलतो उरावर मदनाचा पाळणा ग
पाळण्यातले पोर उसविते चोळीचा कोपरा
दिसे ही साताऱ्याची तऱ्हा

सावळी तरी तू गोऱ्याहून गोमटी ग
पट्ट्यात चांदिच्या कशी बसविशी कटी ग ?
थोराड हाड या मुलखाचे शेवटी ग
बुलंद दिसते तुझी इमारत, ठीक चिऱ्यावर चिरा
दिसे ही साताऱ्याची तऱ्हा

जाहली तुला ना चवदा वर्षे पुरी ग
पोवळी उमटली दोन्ही गालांवरी ग
इतक्यात निघे का मुरमातुन बाजरी ग ?
माहित नाही इष्क तुला पण भुइवरल्या पाखरा !
दिसे ही साताऱ्याची तऱ्हा

असतील ओठि तव अजुन उखाणे म्हणी ग
तुज कशी कळावी रंगाची लावणी ग
का उगाच मिटते माझी मग पापणी ग
खरीच मोठी होशिल तेव्हा भेटच या शाहिरा
दिसे ही साताऱ्याची तऱ्हा

राहु हे तोवरी असेच निरसे हसे ग
मी जपून ठेविन आंबट माझे पिसे ग
मंथनी पहा मग लोणी निघते कसे ग
आवडि प्रीतिने तूच पसर त्या लोण्यावर शर्करा
दिसे ही साताऱ्याची तऱ्हा

## या कातरवेळी

**ग. दि. माडगूळकर**

या कातरवेळी पाहिजेस तू जवळी !
दिवस जाय बुडुन पार
ललित नभी मेघ चार
पुसट त्यास जरिकिनार
उसवि तीच सांज खुळी !

शेष तेज वलय वलय
पावे तमि सहज विलय
कसले तरि दाटे भय
येइ तूच तम उजळी !

येइ, बैस, ये समीप
अधरे हे नयन टीप
दोन ज्योति एक दीप
मंद प्रभा मग पिवळी !

## निवांत

**त्र्यं. वि. सरदेशमुख**

निवांत होतो बसलो आपण
जमीन होती नांगरलेली.
जवळच अरणीवरचा आंबा
पाडा येउन लवला होता.

हिरवी तांबुस झाक सुनेरी
रेखित होती मनात रेषा
हिरव्या-कच्च्या ...
कोरित होता रसाल गाभा
तिरपा कप्पा !

सारसबागेमधील घंटा
उठवित होती स्वप्न उद्याचे
नव-रात्रीचे...
... आणिक जवळच
फांदीवरुनी घालित होता
खवट उखाणा
डोमकावळा !

तरिही बसलो निवांत आपण
लुटूपुटीच्या बोलत गोष्टी,
भानच नुरले पुढील-मागिल
त्या प्रहराला दुःखीकष्टी !

## अथ अरण्यकाड

**कृ. ब. निकुंब**

ये ! कोणत्या कांडापासून वाचणार आहोत आपण आज ?
बालकांड संपले आहे. त्यातले स्वर उजळत होते, वेल्हाळ
थेट लखलखत्या कडकडाटापर्यंत शिवधनुर्भंगाच्या !
आता-आताच तर समोर उभी होती
अवनम्र जानकी सलज्ज कटाक्षांच्या कळ्या ढाळीत
—दृष्टी चुकवू नकोस— कांडे संपतात तरी कशी अलगद !
ते नवे दारपरिग्रहाचे दिवस —
एखादी मावळती केशरकाडी तरी उरायची होती !
आणि तो सोहळा युवराज्याभिषेकाचा ?
—पण हेही वाचून झालेच आहे, नाही ?
बरोबर ! अरण्यकांडाला प्रारंभ झाला आहे.
आता मन निःशंक करायला हवे,
निर्धाराची पावले टाकायला हवीत
        दंडकारण्याच्या दिशेने ...
अजून पुष्कळच पाने पुढे जायचे आहे !

## तुले पाहून

**मा. कृ. पारधी**

उन्हाऱ्यात तडकली माती जसी मिर्गानं
तुले पाहून माहा मन गेलं तसं ईरून
घमघमाट सुटे तहि साऱ्या वावरामंधी
हिर्यात माह्यावी तसी भरे गे गुंगी
जोंधऱ्याचे पानं सर्सरा वाजति वाऱ्यानं
जनु माहाच हिर्द हुरहुरलं तुह्या नखऱ्यानं
        कापल्या गवताचं पान टाकते मान
        आन् गडीभऱ्यानं जाने तसंच वारुन
        माहा नोको जिव्हारा टाकू तसा तोडुन
पाहे त्यांच इऱ्यानं हिर्द माहा चीरून !
तुले पाहून माहा मन गेलं कसं ईरून !

वावरात कन्सं फुलावर आले भरून
माह्या मनचा बार ह्यो नोको टाकू झाडून
ये येथ मऱ्यावर बसू गोफनी दोऱ्या
घेऊन, मजेत ललकारू ' होऱ्या होऽऱ्या ! '
तहि पढंल कानांवर पाखरांइची किलबील
आपन करत बसू मंग गोष्टी गुळगूळ
        तू माह्या जिवाची मैना, मी तुहा राघू ;
        पिर्मानं गऱ्याले गरा देऊन बघू
        चोचीले चोच लावून गानं कुजबुजू ;
पिरमाचं पाखरू नोको सोडु रानोरान
तुले पाहून माहा मन गेलं सारं ईरून !

## युगांच्या नंतर

**शरच्चंद्र मुक्तिबोध**

अंधारलेली निवांत खोली
दवारलेली बाहेर वने
शहारलेली आपुली गात्रे
फुलारलेली आपुली मने

मेघांची सुर्मई दाटशी छाया
दूरच्या हिरव्या जंगलावरी
मऊशी पिंगट तिमिरशाल
हळूच वेढते वसुधा सारी !

रिकामा पाणोठा झालासे आता
जंगली कण्हेर ढाळिते फुले
सरसर सोडून वापीत दोर
कुणीशी ओढते लगबगीमुळे

झटका देऊन कळशी वरी
खेचून, गुडघा देऊन शिरी
ठेवून चालली घाईत पोर
श्वासाने उरोज उभार धरी

रोजचे थांबले व्यवहार आज
थांबले बुद्धीचे क्षणैक यंत्र
उत्कट अंधारी विरून जग
उरले तुझ्या नि माझ्यात मात्र

आत्म्यांचे आपुल्या मिळाले नेत्र
युगांच्या नंतर आजच सये,
वोळून आले ग रसांचे मेघ
शून्यशा डोळ्यांत आजच सये

वोळून आलेले रसाचे मेघ
मेघांत लखाखे विजेची धार
पांगुळे प्राण हा जेथच्या तेथ
गळाली ग्रंथीही यंत्राची पार !

वर्षानुवर्षे सहवास जरी
प्राणांचा प्राणास साक्षात्कार
आजच जाहला, एरवी दोघे
यंत्रेच निमूट करू बिगार

आजच्या क्षणीच भेटून फक्त
किशोरी किशोर आपण आहो
वनीच्या हिरव्या मर्मात दाट
फोडतो मयूर उत्कट टाहो !

## तोच चंद्रमा नभात

### शान्ता ज. शेळके

तोच चंद्रमा नभात तीच चैत्रयामिनी
एकांती मजसमीप तीच तूहि कामिनी !

नीरवता ती तशीच धुंद तेच चांदणे
छायांनी रेखियले चित्र तेच देखणे
जाईचा कुंज तोच तीच गंधमोहिनी
एकांती मजसमीप तीच तूहि कामिनी !

सारे जरि ते तसेच धुंदि आज ती कुठे ?
मीहि तोच तीच तूहि प्रीति आज ती कुठे ?
ती न आर्तता उरात स्वप्न ते न लोचनी
एकांती मजसमीप तीच तूहि कामिनी !

त्या पहिल्या प्रीतीच्या आज लोपल्या खुणा
वाळल्या फुलांत व्यर्थ गंध शोधतो पुन्हा
गीत ये न ते जुळून भंगल्या सुरांतुनी
एकांती मजसमीप तीच तूहि कामिनी !

## वेळअवेळाच्या मेळी

**शंकर रमाणी**

वेळअवेळाच्या मेळी
तुझ्या डोळ्यांत डुंबावे;
पुळणीत थोडे थोडे
माझे सुख ओसरावे.

फिक्या जांभुळल्या जळी
भुऱ्या क्षितिजाची भूल;
जागवावी किनाऱ्याने
शुभ्र मोतिया चाहूल.

फक्त काळजाला ठावे
तळी अथांगाचे देणे;
तेथे जपावे पाऊल
ओल्या तलम तंद्रीने.

वेळअवेळाच्या मेळी
तुझ्या डोळ्यांत डुंबावे
भरतीच्या काठावर
थोडे सुख फेसाळावे . . .

# सुनीत

**वसंत बापट**

ध्यावे मी तुज मीपणी मुरवुनी बाहू म्हणूनी दिले
घ्यावे मी तुज शोषुनी म्हणुन का हे ओठही लाभले ?
घ्यावा ध्यास तुझा म्हणून मन हे निर्माण केले असे
हे सारे कळते तुला म्हणुन ते नाकारसी राजसे

वाटे तू मुरलीस पूर्ण परि तू आहेस दूरावरी
घेतो शोषुन मी तरी उरतसे तृष्णा कशी अंतरी ?
तू माझ्यातच विर्घळून इतकी आहेस गे वेगळी
या माझ्या अपुरेपणात फुलते माझ्या व्यथेची कळी

का हे वेड दिल्या घटास भलते : प्राशीन मी सागरा
का ही आस तरी जिवास : उरि मी ठेवीन सारी धरा
होता एक मुखी तुषार पडला... तो काय होता कमी ?
तू होतास दिला सुवर्णकण तो ठेवीन राखून मी

घे घे घेशिल तेवढे... न कधिही घेण्या तुला बंधन
जे आहेस दिले... पुरेल तितुके अक्षय्य तूझे धन

## लावणी चौरंगाची

**वसंत बापट**

मांडला गडे चौरंग, जमवला रंग, उठा श्रीरंग ! लागल्या भुका
झाला उशीर आधिच असा, अहो राजसा, थोडे तरि हसा विसरुनी चुका

तुम्हि अतिथी आला तिथि साधुन नेमकी
रसनेची तुमच्या रुचि मजला ठाउकी
मी करीन सेवा करुन मनासारखी
उघडा तर जड पापणी, करत्ये विनवणी, जागतेपणी लुटा रससुखा

केळीचे कवळे पान शिरा घनदाट
वर सोनमिन्याचे तिळनक्षीचे ताट
नवलाचा रस सातवा वाहतो पाट
वाढली रुमाली घडी, करा तांतडी, सोडा ही अढी, घडी जाय फुका

दुधमांडे भरविन गडे गोड अलवार
हा खवा नरम तांबूस देते हळुवार
विरघळु दे ओठी द्राक्षांचा रसभार
लावून वर्ख केवडा, दुमडुनी कडा, बहुगुणी विडा लावते मुखा

न्हालेल्या केसांवरुनी चालत या हो
या जरिपदराचा वारा झेलत या हो
तुम्हि डाव्या नयनी उजवे बोलत या हो
राघु का राहिला मुका, करा बोलका, रागवू नका, करा कौतुका

## हसऱ्या डोळ्यांत

**सदानंद रेगे**

तिच्या हसऱ्या डोळ्यांत
दिसले ते काजळ.

तिच्या बुजऱ्या केसांत
फसले ते वादळ.

तिच्या मुक्या ओठावर
भिरभिरला तो शब्द.

तिच्या भोळ्या वक्षांवर
दर्वळला तो गंध.

तिच्या गंभीर हास्यात
भिजले ते आर्त.

तिच्या खंबीर मिठीत
जाणवला तो अर्थ.

## तेव्हा एक कर !

**नारायण सुर्वे**

जेव्हा मी या अस्तित्वाच्या पोकळीत नसेन
तेव्हा एक कर,
तू निःशंक मनाने डोळे पूस
ठीकच आहे, चार दिवस धपापेल जीव गदगदेल !
उतू जाणारे हुंदके आवर
कढ आवर, नवे हिरवे चुडे भर
उगीचच चिरवेदनेच्या नादी लागू नको !
खुशाल; खुशाल तुला आवडेल असे एक नवे घर कर
मला स्मरून कर,
हवे तर; मला विस्मरून कर !

## सत्य

**नारायण सुर्वे**

तुझे गरम ओठ : ओठावर टेकलेस तेव्हा,
तेव्हाही रात्र अशीच होती; घुमी.
पलिकडे खडखडणारे कारखाने
खोल्याखोल्यांतून अंथरले बिछाने
मुल्लाचा अखेरचा अल्लासाठी गजर
काटे ओलांडीत चालले प्रहर
भावंडांसह कोनाडा जवळ केला आईने
धुमसत, बिछान्यासह फूटपाथ गाठली बापाने.

तुझे गरम ओठ : खडीसाखर होत गेले तेव्हा
तेव्हाही रात्र अशीच होती ओढाळ
खपत होतो घरासाठीच...
विसावत होतो शीण तुझ्या काठावर
तुझ्या खांद्यावर —
तटतटलीस उरी पोटी
तनु मोहरली गोमटी
एक कौतुक धडपडत आले;
हादरली चाळ टाळांनी, खेळेवाल्यांनी.
वाकलीस खणानारळांनी.

तुझे गरम ओठ : अधिकच पेटत गेले तेव्हा
तेव्हाही अशीच एक रात्र आली नकार घेऊन
पंखांखाली बसलीस चार पिले ठेवून
कोनाडा हळहळला – कळवळला.
'नारायणा' – गदगदला.
'शिंक्यावरची भाकर घे' – पुटपुटला.

'उद्यापासून तिलाही काम बघ बाबा.'
गांगरलो, भोवंडून स्थिर झालो.
तिच्या ओठांवर ओठ टेकवून
बिछान्यासह बाहेर पडलो. त्या रात्री,
तिचे ओठ अधिकच रसाळ वाटले. अधिकच ...

## ओठ टेकते

**अनुराधा पोतदार**

ओठ टेकते... कणाकणावर
घडला होता स्पर्श तुझा.
भाळ टेकते या वस्त्रांवर
खिळला होता गंध तुझा

लोभ सांडते या अंकावर
विरला होता भार तुझा.
स्नेह शिंपते अन् वक्षावर
निवला होता दाह तुझा.

— प्रेम करावे मी माझ्यावर
जडला होता भाव तुझा.

## अभिषेक

**शंकर वैद्य**

या देववरास केळीचे खांब लावून
होताच तू आसनस्थ
तुझा सोनकलश घेऊन पूजेसाठी
तुझ्या सर्वस्वास लागलेली आच
होते गोळा तुझ्या डोळ्यांत ओथंबलेल्या

रसरसत्या कांतीतून उजळतात नीरांजने
तरारतात केसर फुलातले सोत्कंठ
धूपातून दरवळते सुगंधी श्वसन
किणकिणत्या लहरींचा अंगांगी कल्लोळ

तुझ्या रतिसांद्र डोळ्यांतला
हा अभिषेक भोगताना
माझेच सर्वस्व होते अनावर
निर्झरत्या सुखधारा

अभिषिक्त तू
अभिषिक्त मी...

...दिशाकार डोळ्यांत भरलेला आनंद
आनंदकलश ओसंडणारा !

## डहाळी

**सरिता पदकी**

जातोस तू दूर गावी
घर होते सुने सुने
माझ्यापरी दीनवाणे.

वस्तु वस्तु होते मुकी
अगतिक अन् उदास
तुझा घेऊनिया ध्यास.

वाट पहात लोटावा
कसा एक एक दिन
धाक स्वत:ला घालून.

तूही निमग्न व्यापात
धाडितोस चार ओळी
हवा, प्रवास, खुशाली.

शब्द एखादा त्यातच
एखादीच ओळ ओली
अवचित मिठी घाली.

— ओस घरामनावर
लवे नाजुक डहाळी
होय पाखरण खाली !

## तुज आठवते का ?

**मंगेश पाडगावकर**

तुज आठवते का ?...

हातांत हात गुंफून करुन साखळी
धुंदीत भटकणे : वाट सदा मोकळी !
कधि स्तब्धच नुसते पाहत बसणे जळी
तुज आठवते का ?...

कस्तूलेसे घेउनि पान एकदा करी
फिरविलेस माझ्या हळुच पापणीवरी
थरथरत शहारत गेले काही उरी
तुज आठवते का ?...

कधी कातरवेळी घट्ट तसे बिलगुनी
दूरात कुठे तरि खिळवुनिया पापणी
भारावुनि झाले शब्द मूक ज्या क्षणी
तुज आठवते का ?...

हळुहळू तरूंच्या गूढतरल सावल्या
पंखापरि पसरत संथ गहन जाहल्या
दोघांच्या छाया... एकरूप आपुल्या !
तुज आठवते का ?...

## जन्म

**मंगेश पाडगावकर**

मी न घेतले, तरी मिळाले
कधीच मी जे घेउ नये
तूहि दिल्याविण दिलेस सारे
कधी कुणी जे देउ नये

पिचलेल्या जन्मांतुन रुजले
वीजभारले सूर नवे
ऐकण्यास जे व्यथेत मिटले
लोचन राधेचेच हवे

श्याम घनांची उतट अनावर
कासाविस बरसात अशी
काळोखाच्या यमुनेकाठी
धडधडणारी हवा पिशी

मलाच नकळत माझे डोळे
यमुनेतुन वाहत जाती
अंधपणातच चाचपतो मी
फुटल्या जन्माची माती

दान तुझे हे घेण्यासाठी
फुटल्यावाचुन हात कुठे ?
या भरलेल्या रित्या ओंजळित
हिरवा हिरवा जन्म फुटे

## एका पावसाळ्यात

**शिरीष पै**

एका पावसाळ्यात लिहिलेली ही असंख्य प्रेमपत्रे
प्रीतीच्या वर्षावात भिजलेले अनंत आर्द्र शब्द
ही न संपणारी आश्वासने... कोसळताना दिलेला धीर
पावसात चिंब नाहलेली ही विरहाची दीर्घ रात्र
हा दुरावा आकाशभर पसरलेल्या काळ्या मेघासारखा
ओल्या काळोखातून परस्परांना दिलेली ही आर्त हाक
अथांग भिजलेल्या मातीप्रमाणे ही थकलेली गात्रे
थंडगार वाऱ्यासारखी वहात आलेली ही व्याकुळ आठवण
दूर दूर असल्याने जाणवणारा हा मीलनाचा गंध
अन् हळूहळू झिरपणारी ही आसक्तीची तीव्र धार

## जागृतीच्या वृक्षाखाली

म. म. देशपांडे

जागृतीच्या वृक्षाखाली
स्वप्न-पाकळ्यांचा सडा;
ओठांवर रेंगाळतो
स्पर्श ओठांचा तेव्हढा.

हाले काळजाचे पान
येता झुळूक जराशी;
हळुवार कुजबुज
आता बसली तळाशी.

उन्हे आली वर तरी
गात्रांवर स्पर्श-छाया;
चांदण्यात न्हाऊनिया
केस वाळवी दुनिया.

स्वप्नसडा भवताली :
दृष्टी धुंडाळिते वाट;
धुके सरता समोर
जग उघडे अफाट.

क्षण ओढी पुढे पण
मागे पाठ फिरवेना;
सुख सांडले जेथे ती
जागा दूर करवेना !

## दुभंगता उर

**आरती प्रभू**

तूच नव्हे का रात्री एका अंगचोरटी
अंगणातल्या चाफ्याखाली उभी एकटी

हलता राघू सखि दर्वळत्या सोनफुलांतुन
एका रात्री वळले नेत्री घन ओथंबुन

झोपाळ्यासह लखलखता क्षण हलुन हवेचा
तुझिया गात्री एका रात्री तडा विजेचा

एका रात्री हुरहुर नुसती अन् वाऱ्यावर
मन पदरासह चंद्रकलेच्या हो खालीवर

एका रात्री खडकाळीतून छेडित पुरिया
दुरुन जिवावर दाटत आली पाउसछाया

एका रात्री दुभंगता उर झणाणले स्वर
उभ्या घरावर सर्व रात्रभर कोसळली सर.

## देहपूजा

### आरती प्रभू

माझी वस्त्रं तुझी झाली
पंख सारे मिटले ग,
पंख आता मिटले;
चोचीतले उष्टे थेंब
पानी पानी पडले ग
वाजले मी ऐकले ग
वाजले मी ऐकले ...

माझी वस्त्रे तुझी झाली
रंग मात्र फसले ग,
रंग रंग फसले,
डोळे चारी मिटले आणि
ओठ ओठां डसले ग
ओठ ओठां डसले ...

या अवसेच्या रात्री कुठे निघालीस परडी घेऊन?

तृप्त फुले झाली ग,
फुलली तेव्हा सरली;
आता कुठे उरली ग,
गंधपुटे गाली ग,
गंधपुटे गाली ग...

परडीभर तरि मिळेल का ग डोहि कुठे चांदणे?

कुठे कुठल्या झाडाखाली
उभी नको राहू ग,
उभी नको राहू;

अजून त्यांची सळसळ
नाही जिरली ग,
सळसळ नाही जिरली...

माझी वस्त्रे तुझी झाली,
तुझी वस्त्रे वारा झाला,
गात्रांच्या गारा झाल्या;
माझी वस्त्रे भिजली ग,
माझी वस्त्रे भिजली;
दूर तिथे देवळापुढे
दीपमाळ विझली ग
दीपमाळ विझली;
तुझी वस्त्रे कुठे गेली ?
माझी वस्त्रे तुझी झाली
परडीभर चांदण्याने
देहपूजा सजली ग,
देहपूजा सजली...

२५४४१ २५४८० २५१९११८८

## सूर्यास्त

**आरती प्रभू**

जाहला सूर्यास्त राणी, खोल पाणी जातसे,
दूरचा तो रानपक्षी ऐल आता येतसे.

मेघ रेंगाळून गेला क्षितिजरेषी किरमिजी.
वाजती या मंद घंटा कंप त्यांचे गोरजी.

वेळुरंध्री का परंतू जीवघेणी स्तब्धता ?
का समेच्या पूर्विची ही आर्त आहे शांतता ?

काचसा काळोख भोती : त्यातुनी गावातल्या
थेंब जैशा दीपपंक्ती हालती काळ्यानिळ्या.

पारवा शेला तुझा हा : स्पंदने का त्यावरी ?
दूर दृष्टी लागली का ? का तनू ही बावरी ?

धून पर्णी निर्झराची लागली आता भरू,
नेत्र का ओथंबले ग ऽ ? हात हाती ये धरू.

जाहला सूर्यास्त राणी, खोल पाणी जातसे
दूरचा तो रानपक्षी ऐल आता येतसे.

## रंग

### मधुकर केचे

एक रंग झेलू गडे
दोन रंग झेलू
श्रीरंगच झेलू जाता
देह कशी तोलू ?
निळ्या निळ्या आभाळात
चुंबनांची दाटी
त्रिराणीच्या गाली चढे
निळीच रंगोटी.
भिजलेले ओठ माझे
काय कशी बोलू ?
एक रंग झेलू गडे
दोन रंग झेलू.

सावळ्याचा मेघ झडे
विजू माझी खेळे
तुषारले अंग अंग
पाझरले पोळे
मिठीमाजी मिटलेले
डोळे कसे खोलू ?
श्रीरंगच झेलू जाता
देह कशी तोलू ?

अंकुरले गीत लेई
अमृताचा बाणा
फोफावले–अनंताचा
खांदाही ठेंगणा

उरी असे गीत कशी
    तालावरी चालू ?
एक रंग झेलू गडे
    दोन रंग झेलू
श्रीरंगच झेलू जाता
    देह कशी तोलू ?

## मग

**सुरेश भट**

मग माझा जीव तुझ्या वाटेवर वणवणेल !
अन् माझी हाक तुझ्या अंतरात हुरहुरेल !

मी फिरेन दूर दूर
तुझिया स्वप्नात चूर
तिकडे पाऊल तुझे उंबऱ्यात अडखळेल !

विसरशील सर्व सर्व
अपुले रोमांचपर्व
पण माझे नाव तुझ्या ओठांवर हुळहुळेल !

सहज कधी तू घरात
लावशील सांजवात
माझेही मन तिथेच ज्योतीसह थरथरेल !

जेव्हा तू नाहशील,
दर्पणात पाहशील,
माझे अस्तित्व तुझ्या आसपास दरवळेल !

जेव्हा रात्री कुशीत
माझे घेशील गीत,
माझे तारुण्य तुझ्या गात्रांतुन गुणगुणेल !

मग सुटेल मंद मंद
वासंतिक पवन धुंद
माझे आयुष्य तुझ्या अंगणात टपटपेल !

## केव्हा तरी पहाटे

**सुरेश भट**

केव्हा तरी पहाटे उलटून रात्र गेली
मिटले चुकून डोळे हरवून रात्र गेली

कळले मला न केव्हा सुटली मिठी जराशी
कळले मला न केव्हा निसटून रात्र गेली

सांगू तरी कसे मी वय कोवळे उन्हाचे ?
उसवून श्वास माझा फसवून रात्र गेली !

उरले उरात काही आवाज चांदण्याचे...
आकाश तारकांचे उचलून रात्र गेली !

स्मरल्या मला न तेव्हा माझ्याच गीतपंक्ती
मग ओळ शेवटाची सुचवून रात्र गेली !

आता कुशीत नाही ती चंद्रकोर माझी...
( हलकेच कूस माझी बदलून रात्र गेली )

अजुनी सुगंध येई दुलईस मोगऱ्याचा
गजरा कसा फुलांचा विसरून रात्र गेली ?

## बाई-माणूस

**आनंद यादव**

लावत जा रोज कुक्कू आणून कसं बी;
न्हाई तर लावीन खुरपं मारून.
—पन्नास येळा सांगिटलं
माझं पायांत घाल म्हणून.

आगं, मी बापय-माणूस हाय;
मला कसली लाज नेसायला फाटकं
बाई-माणूस हाईस तू
फेड बघू ते जुण्यार दाटकं.

बाजारात इकून बाळी शेळी
उद्या आण सोडवून डोरलं
आणि अंग भरूनशान तुला
याक घे लुगडं थोरलं.

— मला नगं आता भाकरी
आताच प्यालोय मी पाणी
तूच खा पॉट भरूनशान
थानचं मूल हाय सोन्यावाणी !

## लवत लवत घन

**वसंत सावंत**

लवत लवत घन ...
माझ्या जवळुन
गेला आज सकाळी
पिळून आल्या
मनिच्या तारा
घुमसत नव भूपाळी

तटतटली यमुना – दोघांतच –
जळ भरले – तुटले पिळ आतिल
दो नयनांतिल
दिशाकिनारे
बुजुनि धुक्यातच गेले
डोळ्यांमधले काजळ माझ्या
ओठांवरती आले ...

लवत लवत घन
जळ ओथंबुन ...

## याच दिशेने

**अंजली ठकार**

याच दिशेने चल म्हणालास –
नेसल्या वस्त्रानिशी आले;
तुझ्या ओंजळीतले पाणी
आपखुषीने प्याले.

याच दिशेने जायचे खरे
पण फुटलेत फाटे दहा;
कुठे जायचे ठरव बाबा
कुठे खोदायची सांग गुहा.

खांद्याला बांधले बिऱ्हाडबाजले
( तूच रचलेला सारा ग्रंथ )
कुशीत आंदुळते तुझेच ओझे,
जोजवते आहे संथ संथ

पैंजण फेकलेस केव्हाच वाटेत;
' का ' म्हणून विचारतोस पुन्हा.
तू मी उतू गेलो आणि
काळजांना फुटला पान्हा.

## ओठांवरती कधी टेकले कळले नाही ओठ

**दिलीप चित्रे**

ओठांवरती कधी टेकले कळले नाही ओठ
दिवसाचे पण फूल गळाले उरे रात्रिचा देठ
मनात माझ्या रात्र. वळे पण कोठे प्रणयी रस्ता ?
कशास तुटते आणि आतडे ? हाही काय शिरस्ता ?
अंधाराला जपणाऱ्या मज उत्तर सुचले नाही
देहातच तू—चित्र. थरारत. मुग्ध. चांदणे देही.
लज्जेच्या वस्त्रात झाकुनी गुरफटशील धुक्यात
अनबुझ माझे अजून जगणे मला मृत्युची भ्रांत !

कधी स्वरांच्या लहरी व्हाव्या आणी आत विराव्या
विरता विरता वृत्ती साऱ्या शून्याला स्पर्शाव्या
तुझ्यात आणिक मृत्यूमध्ये एकच येथे साम्य
सौंदर्यातुन निरास होतो संज्ञेचाहि अगम्य.
ओठांवरती कधी टेकले कळले नाही ओठ.
मिठीत माझ्या चूर. जगाचे काठ जाहले राठ.

## गझल

**दिलीप चित्रे**

“ न इथे कुणी न तिथे कुणी न जलाशयातहि सावली
चाहूल तरि या अंतरी मज मुग्ध ही का लागली ?

न इथे कुणी न तिथे कुणी नच पर्णपुंजहि वाजतो
न कळे कसा विजनातही स्मरतो निरंतर नाद तो !

झुळकांतुनी झुळकांतुनी वाहे विनाश निरंतर
फुलली फुले गळती हळू मातीत होतो संचय.

माझ्या कशा या पापण्या न कळे क्षणी ओलावल्या
न इथे कुणी न तिथे कुणी न जलाशयातहि सावल्या... ”

“ हसलीस तू अन् आसवे पुसण्यास वारा तत्पर
हरवून तू बसलीस गे संवेदनेचा तो शर...

ही वायुनिर्भर चुंबने ही आर्त निर्मल शांतता
क्षणमात्र ही क्षणमात्र ही न जलाशयातहि सावल्या...

न इथे कुणी न तिथे कुणी हा शिशिर स्तब्ध अनादि गे
गळतो अनामिक बहर हा या आपुल्या हातांत गे... ”

## सोन्याच्या मोहरा

**ग्रेस**

गेले उकरून घर,
नाही भिंतींना ओलावा;
भर ओंजळी चांदणे,
करू पाचूचा गिलावा.

आण लिंबोणी सावल्या,
नाही आढ्याला छप्पर;
वळचणीच्या धारांना
लावू चंद्राची झालर.

पाय-ओढल्या वाळूची
आण तेव्हाची टोपली;
कधी खेळेल अंगणी
तुझी-माझीच सावली ?

गेले उकरून घर
जाऊ धुक्यात माघारा,
कधी पुरून ठेवल्या
आणू सोन्याच्या मोहरा.

## अर्थ

**ग्रेस**

वाळूची घरकुले मोडलेल्या शापांचे शैशव;
विस्मयाच्या उत्कंठेचे वरदान घेऊन
उभे असते तुझ्या डोळ्यांच्या किनाऱ्यावर.
दुथडी भरून वाहत असते तुझे मातीचे घर
कसल्याशा आवेशाच्या उन्मेषपूर्ण
उल्हासात.
काठाकाठाने चालावे तरीही पाय भिजतात...
विखुरलेल्या शब्दांचे अर्थ मी गोळा करून
आणले असतात...

## फुलात न्हाली पहाट ओली

**ना. धों. महानोर**

फुलात न्हाली पहाट ओली, क्षितिजावरती चंद्र झुले
नभात भिजल्या केशरियाचे रंग फुलांवर ओघळले
रंग फुलांवर ओघळताना असे जुईला लदबदले
गालावरचे निळे गोंदणे पदराभवती घुटमळले
निळ्या तिच्या डोळ्यांत कथाई, कुणा कुणाच्या आठवणी
एक झोपडी साक्षीमधली करीत बसली साठवणी
अशी झोपडी बोलघेवडी पांथस्थाचा पाय अडे
दाट जोंधळ्या रानामधला हुरडा पाहुन भूल पडे
आज तिने कुठल्या सजणाला दूर नभातुन बोलविले
भरात येउन नग्न शरीरी उघड्यावरती भोग दिले
काचोळीची गाठ सावरित हळू तयाला सांगितले
तिचिया पोटी पाचघडीचे लख्ख चांदणे अवघडले

फुलात न्हाली पहाट ओली, कळीत केशर साकळते
गंधवतीच्या मनात राजस एक पाखरू भिरभिरते !

## घन ओथंबुन येती

**ना. धों. महानोर**

घन ओथंबुन येती
वनात राघू फिरती
पंखावरती
सर ओघळती
झाडांतुन झडझडती.

घन ओथंबुन झरती
नदीस सागरभरती
डोंगरलाटा
वेढित वाटा
वेढित मजला नेती

घन ओथंबुन आले
पिकात केसर ओले
आडोशाला
जरा बाजुला
साजण छेलछबीला
घन होऊन बिलगला

## पतझड

**गुरुनाथ धुरी**

बागेतील संध्याकाळ
दुर्लक्षित त्या नेहमीच्या कोपऱ्यात
एका बाकावर तू, मी कित्येक वर्षांनी
अकल्पित पुन्हा.

' किती जोराचा वारा ' मध्येच म्हणतेस
केस आवरतेस.
खरोखरीच जोराचा वारा. पानं भरारा
भिरभिरत खाली येणारी.
नुसती वाळलेली पानं. पाचोळा.
पतझडीचा करकरीत नाद ऐकत
पतझडीत बसून असतो. निमूट.

' निघू ' दोघेही एकदम म्हणतो. उठतोच.

वाटेवर पानांचा खच.
पायांखाली दबलेल्या पानांचा
करकरीत नाद येतो. येत राहतो.

## मनुष्यहीन किनाऱ्यावर

### वसंत आबाजी डहाके

मागे अगदी पाठीशी लागून मर्त्यांचं महानगर,
समोर अगदी कानाशी मनाशी वाजतोय समुद्र
एक समुद्रच ओळखीचा माणूस आहे ह्या मला परक्या शहरात
जो तुझ्यातून माझ्यात वाजतोय, जसं आपण ऐकलेलं जॅझ
अत्यंत एकट सायंकाळी.
ही समुद्रातून आलेली संध्याकाळ :
जसं समुद्राच्या हातांत गिटार आहे आणि त्यातून किनाऱ्यावर
फैलावत जातंय संध्याकाळचं गाणं.

किनाऱ्यावर आपल्या जुन्या आयुष्याचे कागद, बावलेली फुलं, पाचोळा.

भराभर शुभ्र फेसावर तरंगत जातंय तुझंमाझं
तुझंमाझं बोलणं न बोलणं एकमेकांत पाहणं...
आत्ता थोड्या वेळापूर्वी तुझी पावलं ओल्या वाळूवर
चालत गेली माझ्या किनाऱ्यावर.
मी तुझ्या मनात वाजणारा समुद्र.
एक तूच ओळखीची आहेस मनुष्यहीन किनाऱ्यावर.

||मराठी प्रेमकविता || १३९ ||

## पळस

**प्रभा गणोरकर**

काळ्या मातीचे ओसाड शेत तुडवीत गेलो आपण
तेव्हा बाजूच्या स्मशानातल्या थडग्यांशेजारचा
तो खुरटा पळस लक्षातच आला नव्हता.
चालत राहिलो आपण निर्जन धूळभरल्या रस्त्यांवरून दूरच दूर
विटांच्या भट्ट्या, ते एकटे शिवालय नि उजाड टेकड्या ओलांडीत
माझ्या हाती भूतकाळाची राख. पाय दमलेले, डोळ्यांत
माध्यान्हीच्या सूर्याची भगभग.
'आता चालवत नाही. कुठे तरी ही रखरख शांतवणारा
हिरवा ओलावा हवाय,
कुठे तरी ह्या वणवणीला अंत आहे ह्याचा निदान दिलासा तरी–'
माझे पाय नुसते दमलेले, डोळ्यांत दुखरा थकवा
तेव्हा तुझ्या शांत डोळ्यांतले निःशब्द आश्वासन लक्षातच नव्हते आले
क्वचित् उमटणाऱ्या शब्दांतून कळत होती
आतापर्यंतची तगमग, गारठून टाकणाऱ्या भयाण वास्तवात तुलाही
एक उजळ उबदार किनारा हवा होता.
अजून माझ्या मनात वाजणाऱ्या पावलांची धडधड
लक्षातच आली नव्हती.
त्याच रस्त्याने तसेच चालत तसेच मूक परतलो —
तेव्हा हिरव्या मखमली देठांवर लाल ज्योती तोलून
पळस नृत्यमुद्रेत उभा होता.

✣

# कवि-काल-सूची

‘ मराठी प्रेमकविता ’ मध्ये ज्या कवींच्या कविता संकलित केलेल्या आहेत, त्यांपैकी बहुतेक कवींच्या पूर्ण नावांची, त्यांच्या काळाची आणि ज्या कवितासंग्रहांतून त्यांच्या कविता निवडलेल्या आहेत, त्या संग्रहांच्या नावांची नोंद या पुस्तकातील क्रमानुसार येथे केली आहे :

**केशवसुत / कृष्णाजी केशव दामले** १८६६–१९०९
‘ केशवसुतांची कविता ’.

**नारायण वामन टिळक** १८६५–१९१९
‘ टिळकांची कविता ’.

**चंद्रशेखर / चंद्रशेखर शिवराम गोऱ्हे** १८७१–१९३७
‘ सुगी ’ ( संकलन ).

**बी / मुरलीधर नारायण गुप्ते** १८७२–१९४७
‘ फुलांची ओंजळ ’.

**भास्कर रामचंद्र तांबे** १८७४–१९४१
‘ तांबे यांची समग्र कविता ’.

**विनायक / विनायक जनार्दन करंदीकर** १८७२–१९०९
‘ विनायकांची कविता ’.

**दत्तात्रय भिमाजी रणदिवे** १८८०–१९२९
‘ रणदिवे यांची कविता ’ ( भाग २ ).

**नरहर शंकर रहाळकर** १८८२–१९५७
‘ पुष्पांजली ’.

**जयकृष्ण केशव उपाध्ये** १८८३–१९३५
‘ पोपटपंची ’.

**विनायक दामोदर सावरकर** १८८३–१९६६
‘ सावरकरांची कविता ’.

**गोविंदाग्रज / राम गणेश गडकरी** १८८५–१९१९
‘ वाग्वैजयंती ’.

**श्रीनिवास रामचंद्र बोबडे** १८८९–१९३४
‘ श्रीनिवास रामचंद्र बोबडे यांची कविता ’.

**बालकवि / त्र्यंबक बापूजी ठोमरे** १८९०–१९१८
‘ बालकवींची कविता ’.

**माधव / माधव केशव काटदरे** १८९२–१९५८
‘ कवी माधव यांची कविता ’.

**गिरीश / शंकर केशव कानेटकर** १८९३–१९७३
‘ उषा ’ ( संकलन ).

**माधव जूलियन / माधव त्र्यंबक पटवर्धन** १८९४–१९३९
‘ गज्जलांजली ’, ‘ तुटलेले दुवे ’, ‘ स्वप्नरंजन ’.

**अज्ञातवासी / दिनकर गंगाधर केळकर** १८९६–
‘ अज्ञातवासींची कविता ’.

**आनंद / वि. ल. बरवे** १८९८–१९४८
‘ महाराष्ट्र-रसवंती ’, भाग ३ ( संकलन ).

**मनोरमा / मनोरमा श्रीधर रानडे** १८९६–१९२६
‘ श्री-मनोरमा ’.

**एकनाथ पांडुरंग रेंदाळकर** १८९८–१९२०
‘ रेंदाळकरांची कविता ’ ( प्रथम खंड ).

**केशवकुमार / प्रल्हाद केशव अत्रे** १८९८–१९६९
‘ गीतगंगा ’.

**यशवंत / यशवंत दिनकर पेंढरकर** १८९९–१९८६
‘ यशोगिरी ’.

**अनिल / आत्माराम रावजी देशपांडे** १९०१–१९८२
‘ फुलवात ’.

**निशिगंध / रामचंद्र श्रीपाद जोग** १९०३–१९७७
‘ जोत्स्नागीत ’.

**वामन नारायण देशपांडे** १९०३–१९७५
‘ आराधना ’.

**सीताराम बाळकृष्ण जोशी** १९०४–१९३३
‘ वनमाला ’.

**भवानीशंकर श्रीधर पंडित** १९०६–१९७८
‘ उन्मेष आणि उद्रेक ’.

**अनंत आत्माराम काणेकर** १९०५–१९८०
‘ चांदरात आणि इतर कविता ’.

**गणेश हरी पाटील** १९०६–
‘ रानजाई ’.

**सोपानदेव चौधरी** १९०७–१९८२
‘ सुगी ’ ( संकलन ).

**रॉय किणीकर** १९०७–१९८२
‘ उत्तररात्र ’.

**दामोदर अच्युत कारे** १९०९–१९८५
‘ नंदादीप ’.

**गजानन लक्ष्मण ठोकळ** १९०९–१९८४
‘ मीठभाकर ’.

**बाळ सीताराम मर्ढेकर** १९०९–१९७६
‘ मर्ढेकरांची कविता ’.

**नागोराव घनश्याम देशपांडे** १९०९–
‘ शीळ ’, ‘ अभिसार ’.

**बाळकृष्ण भगवंत बोरकर** १९१०–१९८४
‘ दूधसागर ’, ‘ चित्रवीणा ’.

**पुरुषोत्तम शिवराम रेगे** १९१०–१९७८
‘ दोला ’, ‘ गंधरेखा ’, ‘ हिमसेक ’.

**भालचंद्र रामचंद्र लोवलेकर** १९११–१९४५
‘ लोवलेकरांची कविता ’.

**मनमोहन / गोपाळ नरहर नातू** १९११–
‘ आदित्य ’.

**कुसुमाग्रज / विष्णू वामन शिरवाडकर** १९११–
‘ विशाखा ’.

**वामन रामचंद्र कांत** १९१३–
‘ रुद्रवीणा ’, ‘ वेलांटी ’.

**बी. रघुनाथ / भगवान रघुनाथ कुलकर्णी** १९१३–१९५३
‘ पुन्हा नभाच्या लाल कडा ’.

**पद्मा / पद्मा विष्णू गोळे** १९१३–
‘ आकाशवेडी ’.

**इंदिरा / इंदिरा नारायण संत** १९१४–
‘ शेला ’, ‘ मेंदी ’.

**श्रीनिवास पाटणकर** १९१५–१९३६
‘ प्राजक्ताची फुले ’.

**संजीवनी / संजीवनी रामचंद्र मराठे** १९१६–
‘ संसार ’.

**विनायक महादेव कुलकर्णी** १९१७–
‘ पाऊलखुणा ’.

**विंदा करंदीकर / गोविंद विनायक करंदीकर** १९१८–
‘ धृपद ’, ‘ मृद्‌गंध ’.

**गजानन दिगंबर माडगूळकर** १९१९–१९७७
‘ जोगिया ’, ‘ चैत्रबन ’.

**त्र्यंबक विनायक सरदेशमुख** १९१९–
‘ उत्तररात्र ’.

**कृष्ण बळवंत निकुंब** १९२०–
‘ अभ्र ’.

**माधव कृष्ण पारधी** १९२०–
‘ मराठी कविता ’ ( संकलन ).

**शरच्चंद्र माधव मुक्तिबोध** १९२१–१९८६
‘ नवी मळवाट ’.

**शान्ता ज. शेळके** १९२१–
‘ तोच चंद्रमा ’.

**शंकर रामाणी** १९२२–
‘ आभाळवाटा ’.

**वसंत बापट / विश्वनाथ वामन बापट** १९२२–
‘ अकरावी दिशा ’, ‘ सेतू ’.

**सदानंद रेगे** १९२३–१९८२
‘ गंधर्व ’.

**नारायण गंगाराम सुर्वे** १९२६–
‘ माझे विद्यापीठ ’.

**अनुराधा पोतदार** १९२७–
‘ आवर्त ’.

**शंकर वैद्य** १९२८–
‘ कालस्वर ’.

**सरिता मंगेश पदकी** १९२८–
‘ चैत्रपुष्प ’.

**मंगेश केशव पाडगावकर** १९२९–
‘ जिप्सी ’, ‘ उत्सव ’.

**शिरीष व्यंकटेश पै** १९२९–
‘ एका पावसाळ्यात ’.

**म. म. देशपांडे** १९२९–
‘ वनफूल ’.

**आरती प्रभू / चिंतामणि त्र्यंबक खानोलकर** १९३०–१९७६
‘ दिवेलागण ’, ‘ जोगवा ’, ‘ नक्षत्रांचे देणे ’.

**मधुकर बापूराव केचे** १९३२–
‘ पुनवेचा थेंब ’.

**सुरेश श्रीधर भट** १९३२–
‘ रंग माझा वेगळा ’.

**आनंद यादव** १९३५–
‘ हिरवे जग ’.

**वसंत लाडोबा सावंत** १९३५–
‘ स्वस्तिक ’.

**अंजली ठकार** १९३६–
‘ तुलसीदल ’.

**दिलीप पुरुषोत्तम चित्रे** १९३८–
‘ कविता १९६० ’.

**ग्रेस / माणिक गोडघाटे** १९४०–
‘ संध्याकाळच्या कविता ’.

**ना. धों. महानोर** १९४२–
‘ रानातल्या कविता ’, ‘ वही ’.

**गुरुनाथ धुरी** १९४२–
‘ ग्लोरिया ’.

**वसंत आबाजी डहाके** १९४२–
‘ योगभ्रष्ट ’.

**प्रभा गणोरकर** १९४५–
‘ व्यतीत ’.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

## आमची संग्राह्य प्रकाशने

निवडक गंगाधर गाडगीळ

संपादक : **डॉ. सुधा जोशी**

साहित्यप्रेमी रसिक हो !

**गंगाधर गाडगीळ**

पावसाआधीचा पाऊस

**शान्ता ज. शेळके**

दलित आत्मकथन

संपादक : **प्रा. नलगे–डॉ. पानतावणे**

दलित रंगभूमी

संपादक : **डॉ. भालचन्द्र फडके**

गाळ आणि आभाळ

**केशव मेश्राम**

खेकडे आणि खेकटी

**भीमराव कुलकर्णी**

नागरी परंपरेचे लोकाविष्कार

**डॉ. एस्. एस्. भोसले**

लावण्ययात्रा

**अरुणा ढेरे**

साक्षी

**मानसी कणेकर**

---

कव्हर : बॉम्बे सर्वोदय प्रेस, मुंबई १६.

केशवसुत
बालकवी
गोविंदाग्रज
भा.रा.तांबे
बी
माधव जूलियन
बा.सी.मर्ढेकर
कुसुमाग्रज
अनिल
बा.भ.बोरकर
ना.घ.देशपांडे
पु.शि.रेगे
ग.दि.माडगूळकर
इंदिरा
विंदा करंदीकर
आरती प्रभु
ग्रेस
ना.धों.महानोर
रॉय किणीकर
मनमोहन
दिलीप पुरुषोत्तम चित्रे
नारायण सुर्वे
सुरेश भट
मंगेश पाडगावकर
वसंत बापट
चंद्रशेखर
वसंत आबाजी डहाके
संजीवनी
अनंत काणेकर